
म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. १४८८



# शांतिपर्वातील कथा



स. मा. गर्गे

REFBK-0013131

# शांतिपर्वांतील कथा

( शांतिपर्वांतील कथांचें निवेदन
आणि राजधर्माचें विवेचन )

लेखक :

स. मा. गर्गे

REFBK-0013131

REFBK-0013131

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 73937
ग्रंथ शाखा ठाणे

मूल्य : ३·५०

प्रकाशक :
मराठवाडा साहित्य परिषद्
औरंगाबाद.

(C) सर्व हक्क लेखकाकडे

आवृत्ति १ ली : नोव्हें. १९६३

मुखपृष्ठ : सालकर

मुद्रक : जयहिंद प्रिंटिंग प्रेस
मालक : भारत मुद्रक आणि
प्रकाशक लिमिटेड, सराफा,
औरंगाबाद.

# प्रास्ताविक

शांतिपर्वांत भीष्माचार्यांनी धर्मराजाला राजधर्म निवेदन केला आहे आणि त्याचा अर्थ विशद करण्यासाठी अनेक ठिकाणी अत्यंत मार्मिक व उद्बोधक कथांचा आश्रय घेतला आहे. त्यांतील कांही कथा अत्यंत त्रोटक आहेत तर कांही अत्यंत पाल्हाळिक व प्रदीर्घ आहेत. काटेकोरपणे त्यांना कदाचित् कथेच्या व्याख्येंतहि बसवितां येणार नाही. कांही कथा तर केवळ पौराणिक रूपकांसारख्या कांहीशा गूढ भाषेंत सांगितल्या आहेत. या कथांपैकी ज्यांना राजकीय तत्त्वांचा स्पर्श झाला आहे आणि ज्यांतून कांही निःसंदिग्ध राजकीय अर्थ व्यक्त होऊं शकेल अशा अकरा कथांची मी येथे निवड केली आहे. या कथांतील कल्पना, संवाद, प्रसंग इत्यादि सर्व शक्यतोवर मूळ ग्रंथाला अनुसरून जसेच्या तसे कायम ठेवले आहेत. कथांचा आविष्कार आकर्षक पद्धतीने करण्यासाठी त्यांना आधुनिक भाषेचा व निवेदनपद्धतीचा पेहराव चढविण्यापलीकडे मी अधिक कांहीहि केलेलें नाही. अर्थात् असें करीत असतां त्यांचा मूळ आशय बदलूं नये आणि त्यामागील राजकीय तत्त्वांचा अर्थविपर्यास होऊं नये याची जास्तींत जास्त काळजी घेतली आहे.

पण कथानिवेदन हें कांही शांतिपर्वाचें उद्दिष्ट नाही आणि वैशिष्ट्यहि नाही. केवळ अर्थविशदीकरणाचें साधन म्हणून कथांचा उपयोग केला आहे. त्यांची तात्त्विक भूमिका समजण्यासाठी राजधर्माचें विवेचन लक्षांत घेतलें पाहिजे. म्हणून, शेवटच्या प्रकरणांत शांतिपर्वांतील राजधर्माचा परिचय करून दिला आहे.

व्यक्तीच्या जीवनांत काय किंवा राष्ट्राच्या जीवनांत काय असा एखादा क्षण येतो, प्रसंग उद्भवतो, की त्या वेळीं कर्तव्य आणि अकर्तव्य यासंबंधी मनांत संभ्रम उत्पन्न होतो. परस्पर विरोधी दिशांना नेणाऱ्या मार्गांच्या मध्यावर उभा राहिलेला माणूस, त्यांपैकी कोणता मार्ग पत्करावा याचा निर्णय घेऊं शकत नाही. हा मार्ग कीं तो मार्ग, अशी त्याची द्विधा

मनोवृत्ति बनते. त्याचें गोंधळलेलें मन हतबुद्ध होऊन जातें. त्याची विचारशक्ति पांगळी बनते. मानसिक सामर्थ्य डळमळीत झालेला असा मनुष्य असहायपणे पलायनवाद पत्करतो. महाभारतांत असे दोन प्रसंग वर्णिलेले आहेत : पहिला प्रसंग अर्जुनाच्या जीवनांत उद्‌भवला आहे आणि दुसरा प्रसंग धर्मराजाच्या आयुष्यांत निर्माण झाला आहे.

भारतीय युद्धाच्या आरंभी अर्जुनाच्या मनाची अवस्था संभ्रमित झाली होती. समरभूमीवर आपल्याभोवती निकटचे आप्त आणि मित्र पाहून त्यांच्याशीं युद्ध करणें त्याच्या मनाला प्रशस्त वाटेना. 'युद्ध कीं युद्धत्याग ?' विलक्षण पेचप्रसंग त्याच्या मनापुढे उभा राहिला.

युद्धसमाप्तीनंतर असाच प्रसंग धर्मराजापुढे उभा राहिला. युद्ध जिंकलें आणि राज्यप्राप्तीहि झाली; पण त्यामुळे समाधान वाटण्याऐवजी मनांत अशांतताच अधिक वाढली. आप्तांचा आणि मित्रांचा संहार केल्यानंतर रक्तरंजित हातानें राज्याचा उपभोग घेण्यांत कसला आनंद ! 'राज्य कीं राज्यत्याग ?' परस्पर विरोधी विचारांच्या कात्रींत त्याचें मन सांपडलें.

अर्जुनाच्या मनाची संमोहावस्था श्रीकृष्णांनी नाहीशी केली. युद्ध करणें हेंच कसें कर्तव्यकर्म ठरतें हें त्याला पटवून दिलें. त्याला कार्यप्रवण केलें. त्यासाठीच भगवद्‌गीतेचा जन्म झाला. धर्मराजाच्या मनाची अशांतता भीष्माचार्यांनी दूर केली. त्यासाठी त्यांना शांतिपर्वाचा ग्रंथप्रपंच करावा लागला. त्यांतील राजधर्माचें महत्त्व लक्षांत घेऊन धर्मराजाने राज्य करणें हें आपलें कर्तव्य मानलें. राज्यत्याग करून वनांत जाण्याची कल्पना सोडून दिली. पलायनवादावर कर्तव्यवादाने जय मिळविला. निवृत्ति आणि निराशा यांनी ग्रासलेलें त्याचें मन कार्यप्रवृत्त आणि आशावादी बनलें. कर्माकर्माचा संभ्रम निघून गेला. राज्यावर बसून प्रजापालनाचें कर्तव्य पार पाडण्यास त्याची मनोभूमिका तयार झाली. शांतिपर्वाचें हें मर्म आहे.

शांतिपर्वांत सांगितलेलीं सर्व राजकीय तत्त्वें आणि राजकीय व्यवहार विसाव्या शतकांत जशींच्या तशीं उपयुक्त ठरतील, असें मानणें भोळसट-

पणाचें तरी ठरेल किंव सनातनी दुराग्रहीपणाचें तरी ठरेल. पण त्याचबरोबर कांही विचारमूल्यें चिरंतन स्वरूपाचीं असतात हेंहि विसरतां येणार नाही. अशा स्थलकालातीत मूल्यांची नव्या परिस्थितींत चर्चा झाली, उजळणी केली तर ती इष्टच असते. उदाहरणार्थ, शांतिपर्वांत एके ठिकाणी म्हटलें आहे, 'धर्महि सामर्थ्यावर अवलंबून असतो. ज्याप्रमाणें धूम्र वायूच्या अधीन असतो, त्याप्रमाणे धर्म सामर्थ्याच्याच अनुरोधाने चालत असतो. सामर्थ्यशून्य राजाला अपमान आणि अपकीर्ति सहन करावी लागते. राज्य आणि सामर्थ्य हीं एकरूपच आहेत. हें सामर्थ्य सैन्याचें असतें; कोषाचें असतें आणि राजनीतीचें असतें.' सद्यःस्थितीच्या संदर्भांत यावर निराळें भाष्य करण्याची गरज नाही. भीष्माचार्यांनी राजसत्तेच्या संदर्भांत सांगितलेलें हें तत्त्व आधुनिक लोकसत्तेलाहि उपयुक्त ठरणारें आहे. लोकसत्तेचें संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठीहि सैन्य, कोष आणि मुत्सद्दीगिरी यांची नितांत गरज असते.

भुकेच्या पोटीं अनीतीचा, अराजकाचा जन्म होतो, हें विदारक सत्य 'क्रांति' या कथेंत विश्वामित्राच्या रूपाने मूर्तिमंत व्यक्त झालें आहे. आणि सत्ता प्राप्त होईपर्यंत नम्र असलेली व्यक्ति, ती प्राप्त होतांच सत्तामदानें कृतघ्न बनते, स्वार्थी बनते हें 'सत्ता' या कथेंतील मर्म, श्वानाच्या स्वरूपांत स्पष्ट झालें आहे. 'परचक्र' या कथेंतील मूषकाचें भाषण म्हणजे परराष्ट्रनीतीवरील उत्कृष्ट भाष्य आहे. 'मित्र कोण व शत्रु कोण, हें बारकाईने ओळखलें पाहिजे असें शास्त्रकार सांगतात. संकटाच्या वेळींच खरी कसोटी लागते. कालगतीने मित्र शत्रु होतात आणि शत्रूहि मित्र बनतात. आपल्यावर विश्वास न ठेवणाऱ्यावर विश्वास ठेवूं नये, हें कोणालाहि समजण्यासारखें आहे. पण ज्याचा आपल्यावर विश्वास असेल त्याच्यावरहि अतिविश्वास ठेवूं नये.' मूषकाच्या तोंडून वदविलेलें हें सूत्र परराष्ट्रांशीं वर्तन ठेवावयाच्या संदर्भांत सांगितलेलें आहे.

शांतिपर्वांत राजधर्म, आपद्धर्म आणि मोक्षधर्म अशीं तीन उपपर्वें आहेत. पहिल्या दोन उपपर्वांतील कथांचा आणि विवेचनाचा परामर्श या पुस्तकांत घेतला आहे; आणि तोहि मराठी वाचकांसाठी; संस्कृत पंडिता-

साठी नव्हे. कारण शांतिपर्वासंबंधी संशोधनपर प्रबंध लिहिण्याचा हा प्रयत्न नाही. त्यांतील संस्कृत शब्दांचे अर्थभेद, निरनिराळ्या आवृत्त्यांतील पाठभेद, त्यावरून निघणारे निष्कर्ष, कालनिर्णय इत्यादि विषयांचा मी खल केलेला नाही. यापूर्वी भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनी महाभारताच्या उपसंहारांत इतर अनेक विषयांबरोबर राजधर्माचेंहि विवेचन केलें आहे. गणेश विष्णु चिपळूणकर आणि मंडळी यांनी प्रकाशित केलेल्या शांतिपर्वांत विवेचन नाही, पण केवळ भाषांतर म्हणूनहि मराठी वाचकांच्या दृष्टीनें तें प्रचंड कार्य महत्त्वाचें आहे. पण त्यापूर्वीहि, म्हणजे जवळ जवळ शंभर वर्षांपूर्वी ( इ. स. १८६९ ) सरदार रघुनाथराव विठ्ठल विंचूरकर यांनी शांतिपर्वांतील राजधर्माचे 'स्वदेशीय लोकहितार्थ' केलेलें 'महाराष्ट्र भाषें'तील भाषांतर, या विषयाचें औत्सुक्य व्यक्त करण्यास पुरेसें आहे.

या संग्रहांतील कथा, प्रथम मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे प्रकाशित होणाऱ्या 'प्रतिष्ठान' मासिकांत प्रसिद्ध झाल्या. त्यांत आणखी कांही कथांची भर घालून व शेवटी राजधर्माची चर्चा करून पुस्तकरूपाने आता प्रसिद्ध होत आहे.

कथा लिहून घेण्याचें आणि त्या प्रकाशित करण्याचें सर्व श्रेय माझे मित्र आणि प्रसिद्ध साहित्यिक श्री. न. शे. पोहनेरकर आणि प्रा. भगवंत देशमुख यांनाच आहे. तसेच त्या आकर्षक स्वरूपांत प्रसिद्ध करण्यासाठी जयहिंद प्रेसचे व्यवस्थापक श्री. ज. रा. बर्दापूरकर यांनी घेतलेल्या परिश्रमाचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. मी या सर्व मित्रांचा ऋणी आहे.

१२०५।४ शिवाजीनगर, पुणें ४. स. मा. गर्गे

वि. सू. 'क्रांति' या कथेचा पृष्ठक्रम चुकून निराळा पडला आहे. अनुक्रमाप्रमाणे ही कथा ६५ पृष्ठापासून सुरू होते.

सर्वे त्यागा राजधर्मेषु दृष्टा सर्वाः दीक्षा राजधर्मेषु युक्ताः ।
सर्वा विद्या राजधर्मेषु चोक्ताः सर्वे लोका राजधर्मे प्रविष्टाः ।।

राजधर्मांत त्यागाचीं सर्व स्वरूपें व्यक्त होतात. सर्व संस्कार राजधर्मांत एकत्र झाले आहेत. सर्व विद्या राजधर्माशीं संघटित झाल्या आहेत आणि सर्व समाजजीवन राजधर्मांत केंद्रित झालें आहे.

शांति. अ. ६३·२९.

न रक्षति प्रजाः सम्यग्यः स पार्थिव तस्करः ।

जो राजा प्रजेचें रक्षण करीत नाही तो चोरच समजावा.

शांति. अ. १३९·१००.

नित्योद्विग्नाः प्रजा यस्य करभार प्रपीडिताः ।
अनर्थैर्विप्रलुप्यन्ते स गच्छति पराभवम् ।।

ज्या राजाची प्रजा कराच्या भाराखाली दडपून गेल्यांमुळे नेहमी उद्विग्न मनःस्थितींत असते, त्या राजावर अनर्थ कोसळून त्यांत तो पराभूत होतो.

शांति. अ. १३९·१०९

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **प्रास्ताविक-** | | १ ते ४ |
| **शांतिपर्वांतील कथा-** | | ९ ते ७२ |
| अशांतिपर्व | (अ. ७) | |
| राजा | (अ. ६७) | |
| राजदंड | (अ. २३) | |
| परचक्र | (अ. १३८) | |
| सत्ता | (अ. ११६) | |
| अमात्य | (अ. ८२) | |
| राजाचें शील | (अ. १२४) | |
| क्रांति | (अ. १४१) | |
| राजसेवक | (अ. १११) | |
| प्रजा | (अ. ५९) | |
| राज्य | (अ. ५९) | |
| **शांतिपर्वांतील राजधर्म-** | | ७३ ते ९९ |
| **मूल्यमापन-** | | १०० ते १०३ |

प्रा. भगवन्त देशमुख

आणि

श्री. जगन्नाथराव बर्दापूरकर

या मित्रांच्या अकृत्रिम स्नेहभावनेस–

स. मा. ग.

# प्रकाशकाचें पान

भारताच्या प्राचीन परंपरेंत रामायण आणि महाभारत हे दोन अमर इतिहासग्रंथ आहेत. मानवी जीवनाच्या संपूर्ण अंगोपांगांवा यांत विचार आलेला असून अध्यात्म, मानवता आणि लोकव्यवहार यांचें अभंग अधिष्ठान त्याला लाभलेलें असल्यानें त्याची गोडी आणि महती आजतागायत होती तशीच आहे

प्रपंचापासून परमार्थ, व्यवहारापासून कर्मयोगापर्यंत त्यांत सर्व गोष्टी आलेल्या आहेत. अर्थात् राजनीति देखील त्यात अंतर्भूत आहेच हें सांगण्याची आवश्यकता नाही.

जीवनांत कांही सिद्धान्त, तत्त्वें, मूल्यें हीं अमर असतात. व्यवहारांत देखील आपणाला याचा प्रत्यय आल्यावांचून राहात नाही. मात्र प्रत्येक वेळीं त्यांची मांडणी नवीनपणाने आणि परिस्थितिप्राप्त अशा प्रकाराने करावी लागते म्हणजे समाजाचें धारण बरोबर होऊन तो गतिशील व प्रगतिमान बनतो.

श्री. स. मा. गर्गे यांनी महाभारताच्या शांतिपर्वातील राजधर्माशीं संबंधित अशा कांही कथा निवडल्या आणि 'प्रतिष्ठान' मधून त्या यथावकाश प्रसिद्धहि झाल्या. त्यांनी निवडलेल्या कथांचा सांगाडा कोणताहि असला तरी त्यांतील अमर तत्त्वें राष्ट्राच्या जीवन-इतिहासांत नेहमीच मार्गदर्शन करूं शकतील इतक्या तोलामोलाचीं निश्चितच आहेत.

प्रस्तुतच्या प्रकाशनानें जुन्या-नव्या विचारवंतांना एकसारखाच आनंद होईल हा आम्हांला विश्वास आहे.

श्री. गर्गे यांच्या या कथा प्रकाशित करतांना परिषदेला आनंद होतो. त्यांनी या प्रकाशनाची अनुमति दिल्यामुळेच हा योग आलेला आहे. यासाठी त्यांना धन्यवाद.

**न. शे. पोहनेरकर**

अध्यक्ष,

मराठवाडा साहित्य परिषद्

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36308 वि: निबंध
क्रमांक ... नों दि: 9-8-58
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
93939
(स्थळ प्रत)

# अशांतिपर्व

धर्मराज – सर्व पृथ्वी जिंकली. पण विजयाचा आनंद मिळत नाही. मनाला शांति लाभत नाही. लोभाच्या प्रेरणेने ज्ञातीचा भयंकर संहार केला. राज्यलोभाने कर्णाला मारलें. गुरुजनांचा नाश केला. त्या युद्धाच्या स्मृतींने देखील मनाचा दाह वाढत आहे. कापसाच्या राशीला जाळणाऱ्या अग्नीप्रमाणे त्या स्मृति माझे अवयव न् अवयव होरपळून काढीत आहेत. अमंगल अशा मांसाचा अभिलाष करणाऱ्या श्वानाप्रमाणे आम्हांला राज्यसुखाचें आमिष इष्ट वाटलें. आम्हीच सर्व लोकांच्या नाशाला कारणीभूत झालों. पण युद्धामुळे आमचे मनोरथ पूर्ण झाले नाहीत. आणि कौरवांच्याहि इच्छा पूर्ण झाल्या नाहीत. आमचाहि उत्कर्ष नाही आणि त्यांचाहि उत्कर्ष नाही. आम्ही अनेक शूरांना ठार केलें. पापकर्म केलें. जगांतील सुंदर वस्तूंचा नाश केला. क्रोधाच्या भरांत कौरवांचा वध केला. त्यामुळे क्रोध शमला. पण त्याची जागा शोकाने घेतली.

अर्जुना ! आपल्या हातून भयंकर पातक घडलें आहे. अशा स्थितींत राज्य करणें मला योग्य वाटत नाही. तूंच राज्य कर. मला राज्य नको, सुख नको आणि सत्ताहि नको. मी तुम्हां सर्वांचा निरोप घेऊन वनांत निघून जातों. तपश्चर्या आणि ज्ञानप्राप्ति हेंच माझें यापुढचें जीवन.

अर्जुन – आश्चर्य वाटतें ! आपला संकल्प म्हणजे विचारशक्ति नष्ट झाल्याचेंच लक्षण आहे. जीवनांतून, परिवारांतून आणि राज्यांतून असें पलायन करावयाचें होतें, तर युद्धाचा एवढा खटाटोप कशाला केला ? अनेक पृथ्वीपतींचा वध कशाला केला ? आणि आता वनांत जाण्याचा अधर्म कशाला करता ? त्याने का सुख लाभणार आहे ? अरे ! ज्याला धर्म म्हणतात त्याचा आरंभच मुळी द्रव्यापासून होतो. या लोकांत दारिद्र्य हें महापातक आहे. तू राज्य सोडून दारिद्र्य पत्करण्यास कां तयार व्हावें हेंच मला समजत नाही. दारिद्र्य पत्करण्यांत कसला मोठेपणा ? निर्धनतेची प्रशंसा कशासाठी ? महापातकी आणि महादरिद्री हे दोन्ही अभिन्न असतात. द्रव्यापासूनच सर्व क्रियांचा आरंभ होतो. द्रव्याच्या योगानेच धर्म, काम आणि स्वर्ग यांची प्राप्ति होते. ज्याच्याजवळ द्रव्य असेल त्यालाच पौरुष आणि पांडित्य, मित्र आणि बंधु हीं सर्व लाभतात. हत्तीच्या साहाय्यानेच इतर हत्ती पकडतां येतात. द्रव्यानेच द्रव्य मिळतें. कुलीनपणा, धर्मवृद्धि यांमागे द्रव्याची उष्णता असते. निर्धनाला इहलोक नाही आणि परलोकहि नाही. पर्वतांतून नदीचा उगम होतो, त्याप्रमाणे द्रव्यापासून धर्माची उत्पत्ति होते.

पृथ्वी जिंकली यांत आनंद मानावयाचा सोडून दुःख कसलें मानतोस ! पृथ्वीच्या लोभानेच द्रव्यलाभ होईल. पृथ्वी जिंकणें हा आपला धर्म आहे. तिचा उपभोग घेणें, तिला संपन्न करणें हें तुझें कर्तव्य आहे. तें तू पार पाडलें नाहीस, तर तुला राज्यासंबंधी कर्तव्यच्युतीचें पाप लागेल.

धर्मराज – मला पटत नाही हें ! मी राज्याचा स्वीकार करणार नाहीं. मला पृथ्वी नको. राज्य नको आणि द्रव्यहि नको. घोर तप करून शरीर

कृश करण्यासाठी माझा निश्चय झाला आहे. अत्यंत क्षुद्र कारणाने आणि अत्यंत स्वार्थी इच्छेने राजे लोक इतरांना बद्ध करतात. मला तें दुष्ट राज्य नको आणि त्याचा उपभोगहि नको.

भीम – धर्मा ! तुझे विचार विपरीत वाटतात. अर्थज्ञान न करून घेतां वेदांची घोकंपट्टी करणाऱ्या वैदिकाची बुद्धि नष्ट होते. तशी तुझी बुद्धि नष्ट झाली आहे. तुझे हे विचार युद्ध सुरू होण्याच्या अगोदर कां सांगितले नाहीस ? आम्ही कोणाचा वध तरी केला नसता.

ही पृथ्वी सर्व प्राण्यांचें अन्न आहे, असें विद्वान् लोक समजतात. तिचा उपभोग घेतलाच पाहिजे. विहीर खणावी आणि पाणी न पितां चिखल अंगाला फासून चालते व्हावें, तशी तुझी कृति वाटते. वृक्षावर चढून मध मिळवावा आणि तो न चाखतांच फेकून द्यावा. क्षुधेने पीडित होऊन अन्न मिळवावें आणि तें जागचे जागींच ठेवून त्याच्या शेजारीं मरून पडावें, असें आहे तुझें वर्तन !

पण त्यांत तुझी तरी कसली चूक ? तुझ्यासारख्या मंदबुद्धीच्या सामर्थ्यशून्य माणसाचें नेतृत्व पत्करलें ही आमचीच चूक झाली. तूं वनांत निघून जाण्याचा विचार करीत आहेस, पण बुद्धिमान माणसें अशा संन्यासाचें नांवहि काढीत नाहीत. क्षत्रियाने संन्यास घेणें म्हणजे धर्माचा अतिक्रम करणें होय. अरे ! संन्यासाच्या योगाने राजाला सिद्धि मिळत नसते. कर्म केल्यावांचून सिद्धि नाही. कर्म केलें पाहिजे ! शौर्याने कर्म केलें पाहिजे ! फलाच्या उपभोगासाठी कर्म केलें पाहिजे.

धर्मराज – तुझा युक्तिवाद मला पटत नाही. मी मनाशीं निश्चय केला आहे तोच खरा.

नकुल – प्रथापुत्रा ! हें काय तूं डोक्यांत घेऊन बसला आहेस ? राज्याचा त्याग करून मूर्खाप्रमाणे अरण्यांत जाऊन राहतो तो कसला त्यागी ? राजाच्या दुर्बलतेमुळे, अनवधानाने किंवा अज्ञानाने प्रजेचें रक्षण होत नसेल तर तो कसला राजा ? लुटारूंपासून, आक्रमकांपासून प्रजेचें संरक्षण करण्यास जो राजा समर्थ नसतो त्याला कलीच म्हटलें पाहिजे !

धर्मराज – तूंहि अर्जुन आणि भीमाप्रमाणेच मला उपदेश करीत आहेस. पण आतां त्याचा उपयोग नाही. माझा निश्चय ठाम आहे.

सहदेव – धर्मा! बाह्यवस्तूंच्या त्यागाने मोक्ष मिळतो असें तुला वाटतें तरी कसें? बाहुबलाने आपण पृथ्वी जिंकली आहे. जो राजा पृथ्वीचा उपभोग घेत नाही त्याचें जीवित निष्फल आहे.

धर्मराज – अंहं! मला मान्य नाही!

द्रौपदी – हे वीरा! तुझ्या चमत्कारिक निर्णयाने तूं आमच्या अंतःकरणावर प्रहार करीत आहेस. नेभळ्या मनुष्याला पृथ्वीचा उपभोग मिळत नाही. ज्याच्या हातीं शासनशक्ति नाही तो क्षत्रिय शोभत नाही. त्याला प्रजा मानीत नाही. दुष्टांना नष्ट करणें, सज्जनांना संरक्षण देणें, आणि संग्रामांतून पलायन न करणें हाच क्षत्रियांचा धर्म. ज्याला क्षमा आणि क्रोध, दान आणि ग्रहण, भीति आणि निर्भयता, निग्रह आणि अनुग्रह यांचें तारतम्य राखतां येतें तोच धर्मवेत्ता. तूं पृथ्वीचें दान मिळविलें नाहीस. युद्ध करून तुला तिची प्राप्ति झाली आहे. अशा स्थितींत तिचा त्याग करणें तुला शोभत नाही. तुझ्या या वेडेपणामुळे सर्व पांडवांना वेड लागण्याची पाळी आली आहे. तुझा निश्चय बदल. न्यायाने राज्य कर आणि प्रजेचें संरक्षण करून आपलें कर्तव्य पार पाड.

अर्जुन – धर्मराजा! माझ्या विचाराकडे पुन्हा एकदा लक्ष दे! राजानेच अरण्यांत निघून जावयाचें ठरविल्यावर जगाचें शासनकार्य तरी कसें चालणार? आणि मग जगांत धर्म, नीति ही कशी टिकणार? शासनशक्ति हीच प्रजेचें शासन करते. तीच सर्वांचें संरक्षण करते. लोक निद्रावश झाले तरी शासनशक्ति जागरूक असते. शासनशक्ति हाच धर्म. दण्डच (शासनशक्ति) सर्व धर्माचें, अर्थाचें आणि कामाचें संरक्षण करतो. तूं त्याचा स्वीकार कर आणि लोकव्यवहारांकडे लक्ष दे. दण्डशक्तीने लोकांचें संरक्षण केलें नाही तर सर्वनाश ओढवेल. दण्ड हा नीतीचा आधार आहे. दण्ड उभारला नाही तर श्वान आणि कावळे यांचें फावेल. राज्य धर्माने संपादन केलेलें असो अथवा अधर्माने, त्याविषयी शोक करीत बसण्याचें कारण नाही.

लोकव्यवहार चालविण्यासाठी राज्याचें संरक्षण केलेंच पाहिजे म्हणून मीं पुन्हा तुला सांगतों, तूं दण्डाचा स्वीकार कर आणि प्रजेचें संरक्षण कर.

व्यास – अर्जुन सांगतो तें खरें आहे. जो राजा राष्ट्राचें संरक्षण करीत नाही, त्याला राज्यांत घडणाऱ्या पातकाचा स्वीकार करावा लागतो. शत्रूंचा निग्रह केलाच पाहिजे. प्रजेला उपद्रव होणें हें राजाला लांछनास्पद आहे.

धर्मराज – तुम्हां सर्वांचें म्हणणें मी ऐकलें. पण मला हें राज्य आणि त्यांतील उपभोग सुखाचे वाटत नाहीत. इंधन जास्त घातलें म्हणजे अग्नि अधिक भडकतो. तसेंच सत्तेच्या लोभाचें आहे. आपण पृथ्वी जिंकली; पण पृथ्वीने आपलें कल्याण जिंकलें. आपली मनःशांति नष्ट केली. महायुद्धांत झालेल्या हानिमुळे मला अत्यंत शोक होत आहे. पतिविरहाने दुःखित झालेल्या अनेक स्त्रियांचे आर्त स्वर माझ्या कानीं येत आहेत. वृद्ध माता-पित्यांचे आक्रोश मला ऐकूं येत आहेत आणि अनेक बालकांचे करुण स्वर हृदयाचा थरकांप करीत आहेत. मला हें सर्व सहन होत नाही. त्या सर्वांच्या दुःखांना युद्धच कारणीभूत झालें ना ? आणि युद्ध कशासाठी केलें ? राज्यप्राप्तीच्या लोभानेच ना ! हे सर्व विचार मला अस्वस्थ करीत आहेत.

व्यास – या सर्व विवेचनांत तुला राजधर्माचा विसर पडला आहे असें दिसतें. पण लक्षांत ठेव, गृहस्थाश्रमाचा त्याग करून अरण्यांत जाणें तुला विहित नाही. धुरेचा बैल ज्याप्रमाणे धुरेचा भार आपल्या मानेवर घेतो, त्याप्रमाणे राज्याचा भार तूं आपल्या शिरावर घेतलाच पाहिजे. क्षत्रियाचें तें कर्तव्यच आहे. यज्ञ, विद्या, दंडधारण, प्रजेचें संरक्षण, द्रव्याचें अर्जन आणि दान हींच राजाचीं पवित्र कर्मैं होत. बिळांमध्ये राहणाऱ्या मूषकांना ज्याप्रमाणे सर्प भक्षण करतो, त्याप्रमाणे शत्रूशीं विरोध न करणाऱ्या राजाला ही भूमि ग्रासून टाकते. तुला राजधर्माचा विसर पडला आहे. तो तूं चांगला समजून घे. तो समजून घेण्याची तुझी इच्छा आहे का ?

धर्मराज – होय ! माझ्या मनाचा गोंधळ उडाला आहे. मला धर्म आणि

अधर्म, कर्तव्य आणि अकर्तव्य समजून घेतलेंच पाहिजे.

व्यास - मग तुला त्यासाठीं पितामह भीष्माकडे गेलें पाहिजे. तो एकच महापुरुष राजधर्माचें खरेंखुरें मर्म सांगूं शकेल.

## राजा

धर्मराज – पितामह ! मी गोंधळून गेलों आहे. युद्धाची भीषणता मला सतत भेडसावीत आहे. माझें मन शांतपणे विचार करूं शकत नाही. रणक्षेत्रावरील युद्ध जिंकलें, पण मनांत उद्भवलेलें भावनांचें तुंबळ युद्ध जिंकणें अशक्य झालें आहे. डोळ्यांपुढे अंधार दिसत आहे. धर्माधर्मांचा विवेक करतां येत नाही. बुद्धि निराधार बनली आहे. राजधर्माचीं प्राथमिक तत्त्वेंहि मला सुचत नाहीत. राजा हा शब्द कसा प्रचारांत आला ? त्याची महती कां व कशी वाढली ? सामान्य माणसाप्रमाणेच दिसणाऱ्या राजाला लोक आदर कां दाखवितात ? राजाचे बाहु आणि बुद्धि इतर माणसांच्या बाहु आणि बुद्धीप्रमाणेच असतांना त्याचें वर्चस्व अनेक शूर आणि बुद्धिसंपन्न माणसांवर कां असावें ? तो प्रसन्न असला की लोकहि प्रसन्न असतात आणि तो चिंताग्रस्त बनला की लोकांच्या मनांतहि चिंतांचे डोंगर उभे राहतात. राजाचें एवढें महत्त्व कशासाठी मानावयाचें ? राजाच्या

अस्तित्वाचें आणि सामर्थ्याचें रहस्य मला सांपडत नाही. राजाची उत्पत्ति कशी झाली, त्याचें कर्तव्य काय, राजाशिवाय समाज जगूं शकत नाही की काय ? अशा एक ना दोन अनेक शंकांनी माझ्या मनांत गोंधळ उत्पन्न केला आहे.

भीष्म – धर्मा, तूं मला अनेक प्रश्न विचारले आहेस. राजा आणि राजधर्म, दंड आणि दंडनीति या सर्वांचा इतिहास तुला समजावून द्यावयाचा आहे. पण त्यासाठी तुला प्रथम शांतचित्त झालें पाहिजे. भावनांच्या आहारीं गेलेल्या मनुष्याचा विवेक सुटतो आणि विवेक सुटला की ज्ञानसाधना अशक्य होते. तुझें मन गोंधळून गेलें आहे. राजधर्म कीं वानप्रस्थ असा विकल्प तुझ्या मनांत उद्भवला आहे. आयुष्यांतील अत्यंत महत्त्वाच्या क्षणीं तुझा बुद्धिभेद होत आहे. प्रथम तूं प्रक्षुब्ध भावनांना आवर घाल. आणि एक महत्त्वाचें सूत्र लक्षांत ठेव. वनांत जाऊन धर्मपालन करणाऱ्यापेक्षा राज्य करून प्रजापालनाचें कर्तव्य करणारा शंभरपट श्रेष्ठ असतो. कारण सर्व ज्ञानाची उत्पत्तीच मुळी राजधर्मापासून झाली आहे. ज्याप्रमाणे हत्तीच्या पावलांत सर्व प्राण्यांचीं पावलें लीन होतात; त्याप्रमाणे राजधर्मामध्ये सर्व धर्मांचा अंतर्भाव होतो. इतर सर्व धर्मांचें आचरण थोडें व फलहि थोडें. पण ज्याचें आचरणहि मोठें आणि ज्यापासून कल्याणहि मोठें होण्याची शक्यता तो केवळ राजधर्मच आहे. राजाची धर्मशील दंडनीति नष्ट झाली, तर सर्व विद्या रसातळाला जातील. ज्ञानाचें वसतिस्थान अशा सर्व धर्मांचा क्षय होईल.

धर्म – आपल्या या सर्व विवेचनावरून राजाची आवश्यकता कां आहे, हें मला तितकेंसें स्पष्ट समजलें नाही. तसेंच कोणत्या विशिष्ट परिस्थितींत तो अस्तित्वांत आला हेंहि लक्षांत आलें नाही.

भीष्म – राष्ट्राला कोणी तरी नियंता असलाच पाहिजे. म्हणून राजाची प्रतिष्ठापना करणें आवश्यक आहे–नव्हे–राष्ट्राचें तें एक मुख्य कर्तव्य आहे. राष्ट्राला नियंता नसेल तर तें राष्ट्र दुर्बल बनेल. सर्व बाजूंनी त्याला शत्रु वेढतील. तेथे धर्म टिकणार नाही. प्रजा आपसांत भांडूं लागेल. सर्वत्र अराजक माजेल. अशी अराजकाची अवस्था अत्यंत

वाईट. अराजकापेक्षा परकीय राजा पुरवला. अराजक राष्ट्रामध्ये जीवन कंठणें अशक्य असतें. ज्या राष्ट्राला राजा नाही त्या राष्ट्रांतील द्रव्य आणि स्त्रिया यांचा अपहार होतो. तेथे पुरुषांना दास केलें जातें. सबल दुर्बलांना नष्ट करतात. दुष्ट लोक दुसऱ्यांचीं वाहनें, वस्त्रें, अलंकार हरण करतात. धर्माचें आचरण करणाराला शासन होतें. माता, पिता, आचार्य आणि वृद्ध यांचा सन्मान होत नाही. शेतीचा व्यवसाय व व्यापार नष्ट होऊं लागतात. विवाहाचें अस्तित्व नाहींसें होऊं लागतें सुबत्ता नाहीशी होते. गौळीवाडे ओस पडतात. लोक संत्रस्त आणि निराश बनतात. यज्ञमंडप कोसळून पडतात. विद्यालयें ओस पडतात. अशा भयग्रस्त अवस्थेंत सर्व समाजाचें अस्तित्व धोक्यांत येतें. राज्यांत दुर्भिक्ष माजून लोक वाट फुटेल तिकडे पळायला लागतात. सर्वत्र मात्स्य-न्याय सुरूं होतो.

राजाच्या भीतीमुळे प्रजा एकमेकांना भक्षण करूं शकत नाही. लोक आपल्या घरांचीं दारें सताड उघडीं ठेवून निर्भयपणें निद्रा करूं शकतात. समाजाचे व्यवहार सुरळीतपणे चालतात. विद्या आणि यज्ञ यांना संरक्षण मिळतें. निसर्ग फुलतो आणि प्रजा सुखी होते. म्हणून राजा आणि राजधर्म यांचें अस्तित्व अपरिहार्य आहे. राज्य-शकटाचें जूं आपल्या मानेवर घेऊन मोठ्या सामर्थ्याने राजा प्रजा-पालन करूं लागतो तेव्हा लोक सुखी असतात. त्याच्या अस्तित्वा-वरच सर्वांचें अस्तित्व अवलंबून आहे. राजा हा प्रजेचें विशाल, विकसित आणि प्रौढ असें अंतःकरण आहे. प्रजेची प्रगति, प्रतिष्ठा आणि सुखसाधन तोच आहे. अशा राजाची उत्पत्ति कशी झाली हें तूं समजून घेतलेंस तर तुला राजधर्माविषयी अनेक गोष्टी समजूं शकतील.

* * *

असा एक कालखंड होता की, ज्या वेळीं राज्य नव्हतें व राजाहि नव्हता, दंड नव्हता आणि दंडास पात्र असा कोणी मनुष्य नव्हता. लोक धर्माच्या साहाय्याने एकमेकांचें संरक्षण करीत असत. राजाची किंवा

राज्याची गरजच नव्हती. लोक स्वतंत्र होते, निर्भय होते आणि एकमेकांना साहाय्य करीत होते.

पण ही अवस्था क्रमाक्रमाने नष्ट होत गेली. लोकांच्या मनांत स्वार्थ आणि मोह यांनी प्रवेश केला. स्वार्थामुळे इतरांविषयी द्वेष वाटूं लागला. आणि मोहामुळे ज्ञानाचा लोप झाला. त्यांतूनच धर्मनाशाचीं बीजें फोफावलीं. कर्तव्यबुद्धि निघून गेली. दोष आणि निर्दोष यांतील भिन्नता लक्षांत येईना. विद्यांचा नाश झाला, यज्ञकार्यें बंद पडलीं. वृष्टि थांबली. अज्ञान आणि भीति हींच सर्वत्र पसरलीं. या अवस्थेचा उबग येऊन सर्व लोक एकत्र जमले. त्यांनी आपसांत असा नियम केला की, कठोर भाषण करणारा, निर्दयतेने शिक्षा देणारा, दुसऱ्याचें द्रव्य हरण करणारा, पर-स्त्रीची अभिलाषा धरणारा असा जो कोणी असेल त्याचा त्याग केला पाहिजे. सर्व वर्णांना विश्वास उत्पन्न करण्यासाठी सारखेच नियम करून त्याप्रमाणे लोकांनी वागलें पाहिजे.

पण या नियमांचें पालन अनेकांकडून झालें नाही. पुन्हा लोकांचा छळ होऊं लागला. लोकांना आपल्या जीवितरक्षणाची काळजी वाटूं लागली. ते चिंताग्रस्त झाले, दुःखी आणि भयभीतहि झाले. त्या संकटांतून बाहेर कसें पडावें असा त्यांच्यापुढे प्रश्न उभा राहिला. ते सर्वजण ब्रह्म-देवाला शरण गेले आणि म्हणाले, 'हे भगवन्! आम्हांला कोणी अधिपति नाही, कोणी नियंता राहिलेला नाही. त्यामुळे आमचा सर्वनाश होत आहे.'

'आमचें द्रव्य हरण केलें जात आहे.'

'आमचें जीवन सुरक्षित नाही.'

'आमच्या स्त्रियांची सुरक्षितता राहिली नाही.'

'दुःख आणि चिंता यांनी आम्हांला वेढलेलें आहे.'

'आम्हांला राजा पाहिजे.'

'आम्हांला अधिपति पाहिजे.'

'आम्हांला शासनकर्ता पाहिजे.'

'तो आमचें पालन करण्यास समर्थ असावा.'

'आमच्याकडून त्याचा बहुमान व्हावा अशी त्याची योग्यता असावी.'

'तो शूर असावा.'

'तो राजधर्म जाणणारा असावा.'

ब्रह्मदेवाने लोकांचें म्हणणें शांतपणे ऐकून घेतलें. त्यालाहि लोकांच्या मागणीमागील गरज पटली. पण राजा कोणाला करावें, असा प्रश्न त्याच्यापुढे उभा राहिला. त्याने विचार केला आणि लोकांचें अधिपतित्व स्वीकारण्याची मनूला आज्ञा केली.

परंतु मनूने ती आज्ञा अमान्य केली. अधिपति होणें त्याला पसंत पडलें नाही.

मनु म्हणाला, 'राज्य करणें म्हणजे पाप आहे असें मला वाटतें. आणि त्यांतहि सदैव असन्मार्गाने वागणाऱ्या मनुष्यांवर राज्य करणें म्हणजे तर महान् पाप. मला हें राज्यपद नको.'

मनूचें उत्तर ऐकून लोक त्याला म्हणाले, 'तूं भिऊं नको. राज्यांत पाप घडलें तर तें त्याच्या कर्त्याला लागेल. तुझ्यावर त्याचा भार पडणार नाही. तुझें द्रव्यभांडार समृद्ध असावें म्हणून आम्ही तुला साहाय्य करूं. पन्नास पशूंपैकी एक पशु, सुवर्णाच्या पन्नास भागांपैकी एक भाग आणि धान्याचा दशमांश आम्ही तुला अर्पण करूं. कन्यांच्या विवाहांसंबंधी विवाद उत्पन्न झाला तर त्या तुलाच अर्पण करूं. शस्त्रांनी सुसज्ज असे राज्यांतील प्रमुख लोक तुझ्या आज्ञेप्रमाणे वागतील. शत्रूचा पराभव करण्यासाठी लोकांकडून सैन्य आणि संपत्ति तुला मिळेल. म्हणून हे मनु, तूं आमचा राजा हो आणि आमचें संरक्षण कर. तुझा सदैव जय असो.'

मनूने लोकांचें म्हणणें मान्य केलें. तो महापराक्रमी वीर मोठें सैन्य घेऊन राज्य करण्यासाठी निघाला. त्याचा सर्वत्र सन्मान होऊं लागला. त्याच्या राज्यांत सर्व प्रजा स्वधर्मावर लक्ष ठेवून वागूं लागली. पापाचरण करणाऱ्यांना मनूने वठणीवर आणलें. प्रजेंत सुखसमृद्धि आणि सुरक्षितता निर्माण केली.

लोकांना राजा मिळाला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36308 वि: निबंध
क्रमांक 901464 नों. दि: 12-5-86

# राजदंड

व्यास – राजा आणि राजदंड अभेद्य असतात. राजदंड हीच राजाची शासनशक्ति. ज्या राजाला राजदंड पेलण्याचें सामर्थ्य नसतें तो प्रजेच्या पापाचा धनी होतो. आणि स्वतःबरोबर प्रजेच्याहि नाशास कारणीभूत ठरतो. शत्रूला विरोध न करणारा राजा आणि प्रवास न करणारा ब्राह्मण या दोघांनाहि भूमि ग्रासून टाकते. बिळामध्यें सतत राहणाऱ्या मूषकाला सर्प भक्षण करतो; त्याप्रमाणे राजदंडाचें सामर्थ्य उपयोगांत न आणणाऱ्या राजाला शत्रु नष्ट करून टाकतात. म्हणूनच राजाच्या सर्व कृत्यांमध्ये दंडधारणाचें कृत्य सर्वश्रेष्ठ मानलें जातें. दंडधारणामुळेच राजाला सिद्धि प्राप्त होते.

धर्म – दंडधारणाचें एवढें माहात्म्य आहे काय? यापूर्वी दंडधारणामुळे एखाद्या राजाला सिद्धीची प्राप्ति झाली आहे काय?

व्यास – होय. सुद्युम्नाने राजदंडाचा योग्य वेळीं न्याय्य उपयोग केला. आणि त्याला उत्कृष्ट प्रकारची सिद्धि प्राप्त झाली.

धर्म – मग मला त्याची कथा ऐकावयाची आहे.

* * *

बाहुदा नदीच्या कांठीं दोन सुंदर आश्रम होते. महर्षि शंख आणि महर्षि लिखित यांचीं तीं वसतिस्थानें होतीं. अत्यंत रम्य आणि पवित्र असें नदीचें पात्र आणि त्याच्या शेजारच्या त्या तपोवनांत या दोन बंधूंचें वास्तव्य. अशा अनन्य संयोगामुळे त्या भूमीचें सौंदर्य आणि शुचिता अनेक पटींनी वाढली होती. त्या दोघांचें बंधुप्रेम, सत्यप्रियता आणि शुद्ध आचरण यांचा प्रभाव त्या भूमीवर सर्वत्र व्यक्त होत होता. आश्रमांतील वेदाभ्यासाने आसमंत दुमदुमून जात होतें. नदीच्या तीरावरील फुललेल्या निसर्गसौंदर्याला पारावार नव्हता. त्या दोघांचे आश्रम निराळे असले तरी त्यांचीं हृदयें एक होतीं. त्यांचें बंधुप्रेम अद्वितीय होतें. आश्रमाभोवतीं फलपुष्पांनी बहरलेले वृक्ष होते. लता-वेलींनी त्यांच्या आश्रमांची शोभा अधिकच वाढविली होती. शांतता, प्रसन्नता आणि रम्यता यांचा अपूर्व संगम त्या वातावरणांत झालेला होता.

आश्रमांत चाललेला वेदघोष सर्वत्र निनादत होता. समिधांच्या धूम्र-वलयांनी वायु-मंडळांतील दूषित हवा नष्ट होत होती. विद्या, विनय आणि चारित्र्य यांचें मूर्तिमंत प्रतीक म्हणून सर्व जण शंख-लिखिताची प्रशंसा करीत असत.

त्या दिवशीं अनध्याय होता. आश्रमाभोवतीं सर्वत्र शांतता होती. वेदघोष ऐकूं येत नव्हता. दैनंदिन व्यवहाराला खंड पडला होता. सर्वत्र कसें स्तब्ध, शांत होतें. शंख कांही कामानिमित्त आश्रमाबाहेर गेला होता. त्याच्या आश्रमांत कोणीहि नव्हते. तीन प्रहरची वेळ. लिखित सहज आपल्या आश्रमाबाहेर आला. समोरच्या पर्णराजीकडे त्याचें लक्ष गेलें. त्यांतील कांही वृक्ष मधुर फळांनी बहरले होते. फळांचा रंग, मोहकता आणि पक्वता यांनी लिखिताच्या मनांत तीं फळें खाण्याची अनिवार इच्छा उत्पन्न झाली. पण तीं मिळायचीं कशीं? कारण तीं शंखाच्या आश्रमाच्या आवारांत होतीं ना!

लिखिताला मोह आवरला नाही. तो त्या आवारांत गेला आणि कांही रसाळ फळें तोडून त्यांचा आस्वाद घेऊं लागला. वडील बंधूंची अनुज्ञा न घेतां त्याच्या आश्रमाच्या परिसरांत जाऊन आपण फलाहार करीत आहोंत याचेंहि त्याला भान राहिलें नाही.

तेवढ्यांत शंख तेथे आला. लिखिताचें वर्तन त्याला आवडलें नाही. त्याने विचारलें, 'तुला हीं फळें कोणाकडून मिळालीं?'

लिखित घाबरला. वडील बंधूजवळ जाऊन त्याने वस्तुस्थिति सांगितली आणि त्याची क्षमा मागितली. पण शंखाचें मन शांत होण्याऐवजी अधिकच संतप्त झालें. मुद्रा रागीट बनली. बंधूची मनःस्थिति लिखिताच्या लक्षांत आली. तो म्हणाला, 'असा रागावूं नकोस. तुझ्या आश्रमाच्या परिसरांतील, या समोरच्या वृक्षाचींच फळें मी खात आहे. त्यासाठी तुझी अनुज्ञा घ्यावयास हवी होती. पण ती न घेण्यांत माझी चूक झाली. मला क्षमा कर !'

शंख म्हणाला, 'अनुज्ञा न घेतां तूं हीं फळें भक्षण करीत आहेस. याचा अर्थ तूं चोरी केली आहेस असा होत नाही काय?'

लिखित म्हणाला, 'होय. खरोखर मी चोरी केली आहे. त्यासाठीं मला तूं हवी ती शिक्षा कर.'

शंख म्हणाला, नाही ! मी तुला शिक्षा करूं शकणार नाहीं. तूं चोरी केली आहेस आणि या अपराधाबद्दल शिक्षा करण्याचा अधिकार राजाला आहे. कोणत्याहि अपराधाबद्दल फक्त राजाच शिक्षा करूं शकतो.'

लिखिताने आपल्या बंधूची पुष्कळ विनवणी केली. पण त्याचा उपयोग झाला नाही. शंखाने त्याला पुन्हा निक्षून सांगितलें, 'अपराध्याला शिक्षा करणें राजाचें कर्तव्य असतें. राजा दंडधारी आहे. शासन करणें अथवा न करणें याचा त्यालाच अधिकार आहे. मला कांहीहि करतां येणार नाही. आणि मी कांही करूंहि नये. तूं राजाकडे जा आणि चोरी केल्याचें त्याला स्पष्ट सांग. तूं असेंहि म्हण की, 'हे राजा, मी चौर्यकर्म केलें आहे. त्याला योग्य असेल ती शिक्षा मला दे.'

शंखाचें निर्वाणीचें भाषण ऐकून लिखित थोडा वेळ स्तब्ध राहिला. नंतर त्याला आपल्या बंधूचें म्हणणें पटलें. तो लगेच सुद्युम्न राजाकडे गेला.

धर्मशील आणि कर्तव्यदक्ष राजा म्हणून सुद्युम्नाची सर्वत्र ख्याति होती. लिखितासारखा श्रेष्ठ महर्षि आपल्याकडे आला आहे असें द्वारपालांच्या तोंडून ऐकतांच राजा सुद्युम्न अमात्यांना बरोबर घेऊन त्याला सामोरा गेला. सन्मानाने त्याला उच्च आसनावर आग्रहपूर्वक बसविलें.

राजा म्हणाला, 'हे भगवन् ! आज आपण इकडे कोणत्या हेतूने आलां आहांत. आपलें अभीष्ट समजूं द्या. मी तें लगेंच पूर्ण करीन.'

'राजा, माझी इच्छा पूर्ण करीन असें तूं मान्य केलें आहेस तें एका अर्थीं बरेंच झालें. तुला आता आपल्या वचनापासून माघार मात्र घेतां येणार नाही.'

'पण आपलें उद्दिष्ट काय तें तर कळूं द्या.'

'मी चोरी केली आहे. मला माझ्या अपराधाबद्दल शासन कर.'

'चोरी ! आणि आपण !'

'होय, मीच ! माझ्या ज्येष्ठ बंधूंच्या आश्रमाच्या परिसरांतील वृक्षाचीं मी फळें खाल्लीं आणि तींहि बंधूंच्या अनुमतीवांचून. या अपराधाबद्दल मला शासन हवें आहे आणि तें करण्याचा तुलाच अधिकार आहे.'

'महर्षि, दंड करण्याविषयीं राजा हाच प्रमाण असतो हें आपलें म्हणणें राजनीतीला धरूनच आहे. हा माझा अधिकार मान्य केला म्हणजे आपल्या अपराधाला शिक्षा न देण्याचा अधिकारहि माझाच आहे, हेंहि आपल्याला मान्य करावें लागेल. आपण धर्मनिष्ठ आहांत. आपलें आचरण शुद्ध आहे. म्हणून मी आपल्या प्रस्तुतच्या कृत्याला अनुमति देतों. म्हणजे मग शिक्षा देण्याचा प्रश्नच उरत नाही. आता आपण आपली दुसरी इच्छा सांगा. आपली आज्ञा मानण्यास मी सदैव तयार आहें.'

'राजा, माझी दुसरी कांहीहि इच्छा नाही. मला काय हवें आहे तें मी सांगितलें. मी चोरी केली आहे आणि चोराचा करच्छेद करणें ही त्यावरील शिक्षा आहे. ती तूं मला कर. राजधर्माचें हें सूत्र तुला उल्लंघन करतां येणार नाही. तेव्हा विलंब न करतां तूं माझे हात तोड.'

राजा निरुत्तर झाला. त्याला शिक्षा करण्याशिवाय दुसरा उपाय उरला नाही. त्याने लिखिताचा करच्छेद केला. आणि आपलें कर्तव्य पार पाडलें.

लिखित दुःखित अंतःकरणानें आपल्या बंधूंकडे गेला आणि त्याला म्हणाला, 'आतां मला शासन झालें आहे; तूंहि क्षमा कर. आपल्या धाकट्या बंधूवर रागावूं नकोस.'

शंख गहिंवरला आणि शांतपणें म्हणाला, 'मी तुझ्यावर रागावलों

नाही आणि तुला दोषहि देत नाही. तुझ्या हातून धर्माचा अतिक्रम घडला. धर्मबाह्य वर्तनाबद्दल प्रायश्चित्त मिळणें आवश्यक असतें. तुझे सुंदर हात विच्छिन्न झाल्याबद्दल मला अत्यंत दुःख होत आहे. तूं आता बाहुदा नदीच्या प्रवाहांत जा. देव, ऋषि आणि पितरांना यथाविधि तर्पण कर. त्यामुळे तुझ्या अंतःकरणांतील मालिन्य नष्ट होईल. तूं पुनः पवित्र होशील.'

शंखाचें भाषण ऐकून लिखित नदीच्या प्रशांत प्रवाहाकडे गेला. त्याने स्नान केलें आणि तर्पणासाठी आपले हात पाण्यांत घातले. त्याबरोबर त्याचे दोन्हीहि हात पुन्हा सुंदर कमलांप्रमाणें दिसूं लागले.

लिखित सद्‌गदित झाला. आपल्या बंधूंकडे परत येऊन तो म्हणाला, 'तुझ्या तपाचा एवढा प्रभाव असतांना तूंच मला यापूर्वी कां पवित्र केलें नाहीस ? मला राजाकडे कशाला पाठविलेस ?'

शंख म्हणाला, 'मी केलें तेंच योग्य होतें. माझ्या तपाचा किंवा सामर्थ्याचा या ठिकाणी उल्लेख करण्याचीहि गरज नाही. कोणत्याहि परिस्थितींत तुला शासन करण्याचा अधिकार माझा नाही. अपराध्याला शासन करणें हा सर्वस्वीं राजाचा अधिकार आहे. राजदंड हातीं असणाऱ्याचा तो अधिकार आहे. त्याचा उपयोग माझ्यासारख्या प्रजाजनाने करणें म्हणजे अराजकाला आरंभ करण्यासारखें आहे. अपराध कितीहि क्षुल्लक असो आणि अपराधी कितीहि श्रेष्ठ असो, अपराध्याला शिक्षा ही झालीच पाहिजे आणि तीहि राजदंडाच्या साहाय्यानें. म्हणूनच मला कर्तव्यकठोर बनावें लागलें. आणि राजा सुद्युम्नानेहि तुझी प्रतिष्ठा विचारांत न घेतां राजधर्मपालनाचें कर्तव्य केलें.'

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 36308 वि: निबंध
क्रमांक 901484. नों: दि: 28870

# परचक्र

धर्मराज – पितामह, तुम्ही आतापर्यंत मला राजनीतीचीं किती तरी बहुमोल तत्त्वें सांगितलीं आहेत. तरी अद्याप माझ्या मनांतील सगळ्या प्रश्नांचा आणि शंकांचा निरास झालेला नाही.

भीष्म – भारता, कोणत्या शंकेमुळे तुझें मन गोंधळून गेलें आहे तें मला सांग. मी तुझें समाधान अवश्य करीन.

धर्म – समोरासमोर शत्रु आला तर त्याचें पारिपत्य कसें करावयाचें हें मी जाणतों. तसेंच, एकाच दिशेने अनेक शत्रूंनी संघटितपणें आक्रमण केलें तर त्याला कसें तोंड द्यावयाचें याचेंहि ज्ञान मला आहे. पण अनेक शत्रूंनी एकाच वेळीं वेढा दिला तर त्यांत कसा विजय संपादन करावयाचा, यासंबंधीची युद्धनीति मला माहीत नाही. अशा परचक्राच्या वेळीं राजाने कसें वागावें, हें मला आपल्याकडून समजून घ्यावयाचें आहे. राजा संकटांत सापडला म्हणजे, त्याचे अनेक जुने शत्रु त्या संधीचा फायदा घेण्याचा अवश्य प्रयत्न करतील. अशा

वेळीं राजानें शत्रु कोणाला करावें, मित्रत्व कोणाशीं जोडावें, युद्ध कोणाशीं करावें, संधि कोणाशीं घडवून आणावा? माझ्या प्रश्नांचा रोख असा की, निरनिराळ्या शेजारील राज्यांशीं राजानें कोणत्या वेळीं कसें वागावें, याचें रहस्य मला आपणाकडून जाणून घेण्याची इच्छा आहे.

भीष्म – तुझा प्रश्न राजनीतीच्या एका महान् तत्त्वावर आधारलेला आहे. तूं सांगितलेल्या परिस्थितींत यशस्वी होण्यासाठी केवळ शौर्य पुरेसें पडणार नाही. तसेच, केवळ बुद्धीनेहि सुटका होणार नाही. त्यासाठी देशकाल परिस्थिति पाहून आणि कर्तव्याकर्तव्याचें तारतम्य राखूनच राजानें वर्तन केलें पाहिजे. प्रसंगीं शत्रूशीं मित्रत्व करावें लागतें व कांही प्रसंगीं मित्रहि शत्रु बनलेले असतात. एक सूत्र असें लक्षांत ठेव की, राजकारणांत कोणतीच परिस्थिति कायम नसते. ज्यांच्यावर विश्वास ठेवणें आवश्यक असेल त्यांच्यावर विश्वास ठेवला पाहिजे. पण त्याबरोबरच कोणत्या शत्रूशीं संधि केला असता परिणामीं हिताचें ठरेल हेंहि सुज्ञ राजानें अचूक हेरलें पाहिजे. हित साधण्यासाठी प्रसंगीं शत्रूशींहि संधि करावा. अरे! कोणत्याहि परिस्थितींत जीवि-ताचें रक्षण हें झालें पाहिजे. अज्ञानानें अथवा अविचारानें जो राजा कोणत्याच प्रसंगीं शत्रूशीं संधि करावयास तयार नसतो त्याला राजनीति मुळीच समजली नाही असें म्हटलें पाहिजे. उलट, सारासार विचार करून जो शत्रूशीं संधि करतो आणि प्रसंगानुसार मित्राशींहि विरोध दर्शवितो त्याची राजनीति फलदायक ठरल्याशिवाय राहात नाही.

धर्म – आपण सांगितलेलीं सूत्रें उपयुक्त आहेत यांत शंकाच नाही. पण यासंबंधी एखादा प्रसंग उदाहरणादाखल आपण विशद करून सांगावा अशी माझी इच्छा आहे.

भीष्म – तुला मी सांगितलेल्या तत्त्वांचें स्पष्टीकरण हवें आहे असेंच म्हण ना! त्यासंबंधी मी कांही प्राण्यांची एक कथाच तुला सांगतों. ती कथा एखाद्या राज्यालाहि लागूं पडूं शकेल.

* * *

त्या वनांत एक प्रचंड वटवृक्ष होता. मेघासारखा आकार आणि विशाल फांद्यांचा विस्तार यामुळे त्या वटवृक्षाचें व्यक्तित्व भव्य बनलें होतें. अनेक लतावेलींच्या जाळ्यांनी तो वेढलेला होता. अरण्यांतील किती तरी हिंस्र पशु त्याच्या आश्रयाला राहात असत. अनेक चित्रविचित्र पक्ष्यांनी त्याच्या पर्णराजींची शोभा वाढविली होती. त्याच्या गर्द छाये-खाली किती तरी पशुपक्ष्यांनी विश्रांति घेतली असेल. पशुपक्ष्यांचें तें एक नगरच होतें म्हणा ना!

त्या वृक्षाच्या बुंध्याशीं एका बिळांत पलित नांवाचा मूषक राहात होता आणि एका फांदीवर लोमष नांवाच्या मार्जाराने बरींच वर्षें वस्ती केलेली होती. त्या दोघांचें मित्रत्व असण्याचा सुतराम् संभव नव्हता. अनेक पिढ्यांचे ते एकमेकांचे शत्रूच होते. वृक्षाच्या खाली दररोज रात्रीं एक पारधी जाळें पसरवून ठेवत असे. अंधाऱ्या रात्रीं कांही अजाण मृग आणि तत्सम निरुपद्रवी प्राणी त्या जाळ्यांत अडकून पडत. सकाळीं आपली मिळकत घेऊन जातांना तो पारधी नेहमीच खुषींत असे.

दुर्दैव बिचाऱ्या त्या मार्जाराचें, जाळ्याच्या जवळून जाण्याची त्याला दुर्बुद्धि सुचली. आणि एक पाऊल पुढे टाकलें तों त्या जाळ्यांत अडकून पडला. त्यांतून सुटण्यासाठी मार्जाराची चाललेली धडपड दुरून मूषकाला दिसत होती. आपला वैरी जाळ्यांत अडकला आहे हें पाहून मूषकाला अतिशय आनंद झाला. बिळाच्या बाहेर येऊन जाळ्याच्या जवळपास तो फिरूं लागला. तेवढ्याने त्याचें समाधान झालें नाही. मार्जाराच्या समोर बसून ते मूषकराज हसत हसत एक मांसखंड कुरतडून खाऊं लागले.

पण तेवढ्यांत उजव्या बाजूला त्याची नजर गेली आणि भीतीने त्याच्या हृदयाचा थरकांप उडाला. अरे बापरे! प्रत्यक्ष शत्रु थोड्या अंतरावर उभा होता! नकुल कसला, तो प्रत्यक्ष काळच म्हटला पाहिजे. चकाकणारी तजेलदार कांति आणि गुंजेसारखे लाल डोळे. त्याची चपलता तर विलक्षण होती. मूषकाचा वास आल्यामुळे तो त्याचा शोध काढीत त्या जाळ्यापासून थोड्या अंतरापर्यंत आला होता. पण मूषकाबरोबर मार्जारहि त्याला दिसला. आणि मग पुढे येण्याचें धैर्य त्याने केलें नाही. होता तेथेच तो थबकला. आपला जन्माचा वैरी संकटांत सापडला आहे

म्हणून जरा कोठे आनंद होत आहे न होत आहे तोंच नकुलाच्या रूपाने एक नवेंच संकट आपल्यापुढे उभें असल्याची जाणीव मूषकाला झाली.

पण त्याचें दुर्दैव तेवढ्यावरच थांबलें नाही. संकटांतून मुक्त करण्यासाठी त्याने परमेश्वराकडे वर पाहिलें तोंच वरच्या फांदीवर आणखी एक हाडवैरी बसलेला त्याला दिसला. फांदीवर बसलेला दिवांध भेसूर नजरेने मूषकाकडे पाहात होता.

एकीकडे नकुल आणि दुसरीकडे दिवांध, अशा दोन भयंकर शत्रूंच्या कचाट्यांत सापडल्यामुळे मूषकाची भीतीने गाळण उडाली. एकाच वेळीं अनेक शत्रूंनी त्याला वेढलें. चमत्कारिक दैवगतीने तो भयचक्रांत सापडला. चोहोंकडे त्याला मृत्यूचें दर्शन होऊं लागलें. त्या तडाख्यांतून आपली सुटका होईल असें त्याला वाटेना.

क्षणभर विचारशक्ति नष्ट झाल्यासारखें त्याला वाटलें, पण तेवढ्यांत एक सुंदर कल्पना त्याच्या डोक्यांत विद्युल्लतेप्रमाणे चमकून गेली. तो प्रतिभेचा क्षण म्हणजे त्याच्या जीवितरक्षणाचा एक महत्त्वाचा क्षण होता. कसलेंहि संकट असो त्यांतून जीविताची सुटका करतां आली तरच मनुष्याच्या बुद्धीचा उपयोग. मूषक विचार करूं लागला : उजव्या बाजूला गेलों तर नकुल क्षणार्धांत झडप घालील. आणि डाव्या बाजूला सरकलों तर दिवांध झर्रकन् उचलून नेईल. आणि समोरच्या मार्जाराचे पाश तुटले तर– तर काय ? – मार्जार तत्काळ गट्ट करून टाकील. मग काय करावयाचें ? खूप विचार केल्यानंतर त्याने मार्जाराशीं मैत्री जोडावयाचें ठरविलें पिढ्यान् पिढ्या शत्रु असलेल्याशीं संधि करावयाचा, ही कल्पना प्रथम त्याच्या मनाला रुचेना. पण त्याशिवाय दुसरा मार्ग सापडेना. तीन शत्रु तीन दिशेला त्याचा जीव घेण्यास टपले होते. तारतम्याने मार्जाराशीं दोस्ती करणें त्याला सोयीचें वाटलें. शत्रु का असेना, पण तो पूर्वपरिचयाचा आहे. त्याच्याशीं दोस्ती केली तरच बाकीच्यांना फसवितां येईल. शिवाय ज्ञानसंपन्न शत्रु ज्ञानशून्य मित्रापेक्षा अधिक योग्य, असें थोरांनीहि सांगून ठेवलें आहेच की. आणि आता तर काय प्रत्यक्ष जीवावरच बेतलें आहे.

प्रथम मूषक सामोपचारपूर्वक मार्जाराच्या जवळ गेला. आणि

म्हणाला, 'हें बघ, आपण एकमेकांचे शत्रु असलों तरी या वेळीं दोघेहि संकटांत सापडलों आहों. त्यांतून निभावून जाण्यासाठी आपण एकमेकांना मदत केली पाहिजे. तूं मला मारणार नसशील तर या संकटांतून तुला सोडविण्याची मी एक नामी युक्ति सुचवितों. हें बघ, एकीकडे नकुलाचे तीक्ष्ण दात दिसत आहेत आणि दुसरीकडे त्या फांदीवर जिभल्या चाटीत दिवांध बसला आहे. त्यांपैकी कुणाच्याहि तावडींत सापडून मी ठार होऊं शकेन आणि माझ्या मृत्यूनंतर कांही तासांनी सूर्याच्या किरणाबरोबरच तो पारधी येथे येईल व त्याच्या हातून तुलाहि यमाच्या भेटीला जाण्याखेरीज दुसरा मार्ग उरणार नाही. यावरून आपल्या दोघांच्याहि संकटांची कल्पना तुला सहज येईल. तूं पंडित आहेस आणि सज्जन आहेस. सुज्ञाला अधिक सांगण्याची गरज नाही. एवढेंच सुचवितों की माझ्या साहाय्यावांचून तुला हे पाश तोडतां येणार नाहींत.'

मार्जार म्हणाला, 'खरें आहे तुझें. तुझ्या विचारीपणाविषयी आणि चातुर्याविषयी माझी खात्री पटली आहे. मी जिवंत राहावें अशी तुझी इच्छा असल्याचें ऐकून तर मला फारच आनंद होत आहे. तुझें कल्याण असो. पण मित्रा, एकाच वेळीं तुझी आणि माझी या संकटांतून मुक्तता कशी होणार हें मात्र मला नीटसें स्पष्ट झालें नाहीं.'

मूषक – त्याचा विचार करून ठेवला आहे मी. तूं मला अभय दे की मी तुझे पाश तोडून टाकतों. हा संधि तुला मान्य आहे काय ?

मार्जार – सुंदर कल्पना ! मला हा संधि मान्य आहे. ताबडतोब कामाला लाग. अधिक विचार करीत बसूं नको.

मूषक – पण मी तुझ्यावर संपूर्ण विश्वास ठेवूं ना ? खरें पाहतां आपण दोघेहि एकाच वृक्षाच्या परिसरांत राहतों. तेव्हां आपण एकमेकांवर विश्वास ठेवला पाहिजे. ही मैत्री करण्याची वेळ आहे. वेळ निघून गेल्यावर कोणतीहि गोष्ट करणें सुज्ञपणाचें ठरत नाही. तेव्हा मी म्हणतों त्याला तुझी संमति आहे ना ?

मार्जार – अलबत् ! जें समयोचित असेल तें कृत्य मी अवश्य करीन. तुझे उपकार व्यर्थ जाणार नाहीत. माझा सारा अहंकार पार गळून गेला आहे. माझी तुझ्यावर अत्यंत भक्ति जडली आहे. या वेळीं मी तुझा

हितकर्ता आहें आणि आज्ञाधारक शिष्यहि आहें. मी तुला शरण आलों आहे.

मूषक – मित्रा, तूं प्रसंग बरोबर ओळखलास. आता त्यांतून निभावून कसें जावयाचें तें मी तुला सांगतों.

मार्जार – तुझी युक्ति ऐकायला माझे कान कसे आतुर झालेले आहेत. सांग, सांग. मी काय करूं तें लवकर सांग.

मूषक – हें बघ, आता मी तुझ्याजवळ येऊन बसतों. चकचकीत बाणाच्या तीक्ष्ण टोकाप्रमाणे दात असलेल्या नकुलाची मला फार भीति वाटते. तुझ्या कुशींतच माझें संरक्षण होईल. माझा वध मात्र करूं नकोस. आपल्या वचनाला जागलास तर मी सत्याची शपथ घेऊन सांगतों, तुझे पाश पाहतां पाहतां तोडून टाकीन. त्यांतून तूं मुक्त झालास म्हणजे नकुलाला पळतां भुई थोडी होईल. आणि तें दुष्ट दिवांध झाडाच्या डोलींत दडून बसेल.

मार्जार – मला तुझी योजना संपूर्णतः मान्य आहे. तुझ्याच कृपेने माझी या प्राणघातक संकटांतून मुक्तता होणार आहे. आपला संधि पाळायला मी बांधलेलों आहे असें समज. तुझे उपकार मी आजन्म विसरणार नाहीं.

मूषकाने लगेच तुरुतुरु धावत जाऊन मार्जाराच्या कुशींत आश्रय घेतला. मातेच्या संनिध मुलाने बसावें तेवढ्या विश्वासाने मूषक मार्जाराला बिलगून बसलें. मार्जार आणि मूषक इतक्या सलगीने आणि प्रेमाने वागूं शकतात, ही कल्पनाच विस्मयकारक होती. अग्नि आणि जल यांनी एकत्र राहावें किंवा प्रकाश आणि अंधार यांचें अस्तित्व एकाच वेळीं पाहावयास मिळावें इतकी ती विलक्षण घटना होती.

आणि नेमकी तीच घटना नकुल आणि दिवांध यांचे सर्व मनोरथ ढासळून पाडायला कारणीभूत ठरली. हाताशीं आलेली शिकार कांहीतरी दैवी चमत्काराने निसटून जावी आणि मग घोर निराशा पदरांत पडावी तशी त्या नकुलाची व दिवांधाची अवस्था झाली. बिचारे मोठ्या आशेने जिभल्या चाटीत आले होते पण दोन हाडवैऱ्यांचा मिलाफ झालेला पाहून शेवटी त्यांना हात हलवीत परत जावें लागलें. मूषकाने एक समाधानाचा

सुस्कारा सोडला आणि मार्जाराचे पाश तोडून टाकण्यास सुरुवात केली. त्याचें काम मंदपणे चालू होतें. मार्जाराला जाळ्यांतून केव्हा मोकळें होईन असें झालें होतें. तो म्हणाला, ‘ अरे जरा घाई कर. तुझें काम झालें म्हणून तूं माझ्या कामाची चालढकल चालविली आहेस का? दिवस उगवायच्या आंत पाश तोडून झाले नाहीत तर पारधी मला पकडून नेल्याशिवाय राहणार नाही.’

मूषक – तूं कांही काळजी करूं नकोस. तुला गोंधळून जायचें कांहीच कारण नाही. प्रसंगाचें महत्त्व माझ्या चांगलें लक्षांत आहे. कालघटिका त्वरेने धावत आहे आणि निशादेवीची गति वाढत आहे, याची मला कल्पना आहे. योग्य वेळीं योग्य तो परिणाम निश्चित घडून येईल. तूं निश्चित राहा.

मार्जार – पण, तुझें काम किती सावकाश चाललें आहे बघ.

मूषक – कसेंहि चालू दे. तुझ्या जीवाला धक्का पोंचणार नाही याची खात्री बाळग.

मार्जार – एवढें मला भरघोस आश्वासन देतोस, पण कृति मात्र उलट चालली आहे.

मूषक – हें बघ मित्रा, खरें सांगूं का तुला ! तूं रागावणार तर नाहीस ना? योग्य वेळ येण्यापूर्वीच मी तुला मुक्त केलें तर माझी अवस्था काय होईल ? एवढा तूं भुकेलेला ! तुझ्याकडून मला मुळीच धोका पोहोंचायचा नाही असें मी कसें समजूं? तेव्हा योग्य काळाची वाट पाहा. एवढेंच मी तुला तूर्त सांगूं इच्छितों. चकाकणारा परशु खांद्यावर टाकून झपाझप पावलें टाकीत येणारा तो उग्रमूर्ति पारधी दिसला रे दिसला की लगेच तुझे पाश तुटले असें समज. तूं पाशमुक्त झालास की पारध्याच्या भीतीने प्रथम आपल्या निवासस्थानाकडे धूम ठोकशील. माझ्यावर झडप घालायला तुला सुचायचें देखील नाही. खरें ना हें ? माझ्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तोच क्षण महत्त्वाचा आहे.

मार्जार – म्हणजे तूं माझ्यावर अविश्वास दाखवितोस तर ! अरे, तुझा–माझा मित्रत्वाचा संधि झाला आहे ना? मग अशा वेळीं पूर्वीची वैरभावना मनांत तरी कां आणतोस? कदाचित् पूर्वी कधी अज्ञानाने

माझ्या हातून कांही चूक झाली असेल तर क्षमा कर व या वेळीं जलद गतीने हें जाळें कुरतडून टाक.

मूषक – मित्रा, तुझ्या मनाची अवस्था मी ओळखतों. माझी आणि तुझी मैत्री झाली आहे हें खरें, पण ती केवळ समान संकटाच्या दडपणामुळेच ना? केवळ भीतीने ज्याने आपल्याशीं संधि केला आहे अशा मित्रापासून फार सावध राहिलें पाहिजे. अरे, ही राजनीति आहे. सापाच्या तोंडांत हात दिल्यानंतर तो सोडवून घेईपर्यंत फारच सावधगिरी बाळगली पाहिजे. माझें हें म्हणणें तुलाहि पटल्याशिवाय राहणार नाही. आपल्यापेक्षा अधिक बलवानांशीं मैत्री केल्यानंतर फारच संभाळून वागलें पाहिजे. मैत्रीचें एक रहस्य सांगू का तुला? कोणीच कोणाचा मित्र नसतो आणि कोणीच कोणाचा शत्रु नसतो. जीवनांत येणाऱ्या बऱ्यावाईट प्रसंगांमुळे कोणी मित्र बनतात, तर कोणी शत्रु बनतात. आपलें काम झालें म्हणजे मित्रत्व टिकेलच असें नाही. नीतिसूत्रांत सांगितलेंच आहे की, कोणतेंहि कार्य पूर्णपणे न करतां त्याचें कांही तरी अवशिष्ट मागे ठेवलें पाहिजे. आतां हेंच बघ ना! तूं पाशांत अडकलास म्हणून माझी मनधरणी करूं लागलास. आणि मी दोन्ही दिशांनी शत्रूंच्या पाशांत अडकलों म्हणून तुझ्याशीं संधि केला. प्रसंग ओळखून तूं मला जवळ केलेस, तसेंच वेळ येतांच मी तुला मुक्त करीन.

मार्जार – अरे पण केव्हा? तो पारधी आल्यावर–

मूषक – नाही. मी या पाशाचे आतापर्यंत पुष्कळच तंतु तोडले आहेत. आतां फक्त एकच बाकी राहिला आहे. पारधी समोर दिसला की जाळ्याचा शेवटला तंतु तुटलाच म्हणून समज.

मार्जार आणि मूषक यांचें भाषण चालूंच होतें. मार्जार अस्वस्थ होत होता आणि मूषक पारध्याची चाहूल लागते कीं काय याकडे लक्ष देत होता. पूर्वेला उषा फांकत होती. सूर्यप्रकाश धरणीचें रूप पालटीत होता. सगळीकडे सोनेरी वातावरण पसरलें होतें आणि तेवढ्यांत पारध्याच्या पावलांचा आवाज ऐकूं आला. त्याची ती राक्षसी मुद्रा हाकेच्या अंतरावर दिसूं लागली. त्याचीं भयंकर कुत्रीं जिभल्या चाटीत पारध्याच्या मागे–

पुढे धांवत होतीं. मार्जाराची नजर तिकडे वळली आणि तो अर्धमेला झाला. अत्यंत काकुळतीला येऊन मूषकाला तो म्हणाला, 'मूषका, अजून तुला दया येत नाही का रे? तो बघ काळसर्प नजीक येत आहे. आता तूं काय करणार?'

मूषक – मी होय. हें बघ असें करणार—

असें म्हणून मूषकाने पाशाचा शेवटला तंतु तोडला. लगेच मार्जाराने वृक्षाकडे धूम ठोकली. मूषकाकडे पाहण्याचीहि त्याला शुद्ध राहिली नाही. मग त्याला मारण्याची कल्पना तर दूरच राहिली.

आपली युक्ति इतक्या अचूक पद्धतीनें सफल झाली हें पाहून मूषक तडक आपल्या बिळाकडे निघून गेला.

पारधी आशेने आला आणि तें तुटकें जाळें गुंडाळून हिरमुसला होऊन निघून गेला.

संकट निघून गेलें. मार्जाराने झाडाच्या फांदीवरून खाली उडी मारली आणि बिळाच्या तोंडाशीं जाऊन तो उभा राहिला. त्याने मूषकाला हाक मारली व म्हणाला, 'मित्रा, तूं मला जीवदान दिलें आहेस. आपण दोघे आता कायमचे मित्र बनलों. तुझें चातुर्य खरेंच प्रशंसनीय आहे. तुझ्या सामर्थ्यामुळेच आज मला जग दिसत आहे. बाहेर ये. माझ्या घरीं चल. मी तुझा सत्कार करूं इच्छितों. तूं माझा उपकारकर्ता आहेस. तुला माझा संशय तर येत नाही ना? माझी कृतज्ञता बुद्धि नष्ट झाली आहे असें तुला वाटतें काय? माझ्या जिवाची शपथ घेऊन सांगतों की, माझ्याकडून तुला कसलाच धोका पोंचणार नाही. तूं बुद्धिमान आहेस. तुझें कौशल्य कल्पनातीत आहे. तेव्हा तूं माझा अमात्य व्हावास अशी माझी इच्छा आहे.'

मूषक – तूं माझें स्तुतिस्तोत्र गायिलेंस तें मी ऐकलें. त्याबद्दल मी तुझा आभारी आहें. पण मित्र कोण व शत्रु कोण हें बारकाईने ओळखलें पाहिजे असें शास्त्रकार सांगतात. संकटाच्या वेळींच खरी कसोटी लागते. कालगतीने मित्र शत्रु होतात व शत्रूहि मित्र बनतात. याबाबतींत माझें एक सूत्र ठरलें आहे. आपल्यावर विश्वास न ठेवणाऱ्यावर विश्वास ठेवूं नये, हें कोणालाहि समजण्यासारखें आहे. पण ज्याचा

आपल्यावर विश्वास असेल त्याच्यावरहि अतिविश्वास ठेवूं नये. आतां आपलेंच उदाहरण बघ ना! मी तुला प्रिय असल्याचें सांगत आहेस. पण त्याचें कारण तरी काय रे? त्यामागे तुझा मुळीच स्वार्थ नाही असें म्हणतां येईल का? मेघाच्या आकाराप्रमाणें प्राण्यांचे स्वभावहि क्षणोक्षणीं बदलत असतात. तेव्हा बाह्य आकारावर न जातां प्रसंगानुसार वागणें हाच शहाणपणा. खरें म्हणजे तूं माझा स्वभावतःच शत्रु. पण तुझें संकट निवारण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं होतें म्हणूनच आपण मित्र झालों ना? मैत्रीचें कार्य संपलें. त्यामुळे तुझ्या जन्मजात स्वभावांतील शत्रुभाव जागा होणें अगदी स्वाभाविक आहे. आता तुला माझा उपयोग फक्त भक्षणासाठीच होण्यासारखा आहे. मी तुझें भक्ष्य आहें आणि तूं माझा भोक्ता. मी दुर्बल आहें आणि तूं बलवान आहेस. आपल्या दोघांत कोणतेंच साम्य नाही. म्हणून आता आपला संधि व्हायचा नाही. मायावी भाषा न करता तूं येथून तात्काळ निघून जाणें यांतच मी केलेल्या उपकाराची फेड झाली असें समज. स्वस्थपणे घरीं जा. आणि कृतज्ञ असलास तर मनांत माझें कल्याण चिंतीत जा. मी तुझ्यासाठी हवें तें करीन. पण जीवित मात्र देणार नाही. जगांतील सर्व वस्तु परत मिळतात पण जीवित परत मिळत नाही.

मार्जार – मी मित्रद्रोह करणार नाही असें परोपरीने सांगूनहि त्यावर तुझा विश्वास बसत नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे.

मूषक – विश्वास ठेवण्याचा प्रसंग उद्‌भवला तर मी पुन्हा जरूर विश्वास ठेवीन. पण कारणावांचून शहाणा मनुष्य शत्रूच्या जवळ जात नाही हें लक्षांत असूं दे. आचार्य शुक्रांनी असें म्हटलें आहे की, बलाढ्य शत्रूंशीं संधि करावा, पण त्या संधीचें काम संपलें की नंतर मात्र त्यावर विश्वास ठेवूं नये.

बिचारा मार्जार थकला. आणि तेथून निघून गेला. आपल्या कुटिलतेची मात्रा येथे लागू पडत नाही, हें त्याच्या फार उशिरां लक्षांत आलें. मूषक खरा मुत्सद्दी होता. म्हणून तर त्याच्यासारख्या यःकश्चित दुर्बळ प्राण्याने एकाच वेळीं तीन आघाड्या सांभाळून तीन बलाढ्य शत्रूंच्या

तावडींतून आपली मुक्तता करून घेतली. ही गोष्ट मूषकाच्या मुत्सद्देगिरीची मूर्तिमंत साक्षच होती. स्वार्थी मार्जाराच्या ती लक्षांत यावयास हवी होती. पण तें शक्य नव्हतें. कारण शास्त्रकारांनीच म्हटलें आहे की, स्वार्थी माणसांची अगोदर बुद्धि जाते आणि तो भुकेने व्याकुळ झाला म्हणजे त्याचें तारतम्यहि नष्ट होतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६३०४ विः निबंध
क्रमांक १०१४१६४ नों. दि.

# सत्ता

धर्मराज – हे महाज्ञानी पितामहा, आपण प्रजापालनासंबंधी केलेलें विवेचन मला मान्य आहे; तसेंच एकट्या राजाला प्रजापालनाचीं सर्व कार्यें पूर्ण करतां येणार नाहीत, असे जें आपण म्हणालांत तेंहि मला पटूं शकतें. पण ज्यांच्या साहाय्याने हीं कार्यें पार पाडावयाचीं ते कशा प्रकारचे असले पाहिजेत, याविषयी मला कांही खूणगांठ समजून घ्यावयाची आहे. राजाच्या सान्निध्यांत अनेक भृत्य असतात. पण त्यांतील कोणाला गुणसंपन्न समजावयाचें याची मला नीटशी कल्पना आली नाही. कोणत्या प्रकारच्या व कोणत्या कुलांत उत्पन्न झालेल्या लोकांना बरोबर घेऊन प्रयाण करावें, हें मला सांगा.

भीष्म – भारता, कोणाचेंहि साहाय्य न घेतां एकट्या राजाला राज्य करतां येणें शक्य नाही. त्याला द्रव्य मिळवितां येणार नाही आणि मिळविलेलें संरक्षण करतां येणार नाही. ज्या राजाचे मंत्री कुलीन, राजाशीं एकनिष्ठ, बुद्धिमान, चतुर आणि ज्ञानपारंगत आहेत अशाच राजाला

राज्य निर्वेधपणे करतां येतें. ज्यांच्याकडे कोषाची वृद्धि करण्याची कामगिरी सोपविलेली असते ते विश्वासू आणि सदैव संतुष्ट असले पाहिजेत. द्रव्यलोभाने इतरांस त्यांनी वश होतां कामा नये. धान्याच्या कोठाराचें संरक्षण करण्यासाठी अशाच लोभशून्य आणि संग्रहतत्पर सेवक नेमलेले असावे.

धर्म – राजाच्या सत्तेशीं स्पर्धा करणारे जे कोणी प्रयत्न करतील त्यांच्याशीं वागतांना कांही निराळी कुशलता दाखवावी लागेल काय?

भीष्म – होय तर! अशा सत्तास्पर्ध्यांना अतिशय जागरूकपणे कह्यांत ठेवलें पाहिजे. एकदा सत्ता मिळूं लागली की तिचा लोभ मर्यादेंत राहात नाही. लोभाने अतिलोभाची प्रवृत्ति वाढते आणि सत्तेने सत्तामद चढूं लागतो. अशा वेळीं सत्ता कशी मिळाली याचाहि विसर पडत जातो. त्यासंबंधी मी एक प्राचीन कथा सांगतों. तिच्यांतील मर्म लक्षांत घे.

* * *

त्या महामुनींचें वास्तव्य एका घनदाट अरण्यांत होतें. सामान्य जनांचा त्या ठिकाणी प्रवेश होणें कठीणच.

महामुनि महान् तपस्वी, शांतिसंपन्न आणि शुचिर्भूत होते. ते ज्ञानसंपन्न होते, तसेच सर्वबुद्धिहि होते. त्यांचा आश्रम म्हणजे अनेक पशु–पक्ष्यांचा मेळावाच असे. आश्रमाच्या परिसरांत सर्व जातींचे पशु–पक्षी आपले भेदभाव विसरून एकत्र येत. वाघ–सिंहासारखे क्रूर, हत्तीसारखे मदोन्मत्त आणि चित्त्यासारखे रक्तपिपासू प्राणी त्या आश्रमाजवळ आल्यावर आपलें क्रौर्य विसरून जात असत. भयानक गेंडे आणि अस्वलें यांनाहि आपल्या स्वभावांतील क्रूरता विसरावयास लावणारी ही भूमि होती. ते सर्व प्राणी महामुनींच्या चरणांजवळ नत होत. त्यांचे कुशल विचारून आपापल्या निवासस्थानीं परत जात.

त्या सर्व प्राण्यांमध्ये एक श्वानहि होतें. तें मात्र महामुनींचा आश्रम सोडून कोठेहि जात नसे. भक्तिवान् आणि निष्ठासंपन्न शिष्यासारखी त्याची वागणूक होती. सौजन्य आणि शालीनता याचा जणूं मूर्तिमंत

आविष्कार त्या श्वानाच्या ठिकाणीं झाला आहे असें वाटत असे. तें अहोरात्र महामुनींच्या सान्निध्यांत रमून जाई. महामुनीवर त्याची उत्कट भक्ति जडली होती.

एकदा काय झालें, त्या अरण्यांत दूरचा कोठला तरी एक रक्तभक्षक चित्ता आला. त्याला तहान लागली होती आणि तो भुकेनेहि व्याकुळ झाला होता. त्याने आपला विक्राळ जबडा पसरला, जमिनीवर शेपूट आपटलें, आणि आपले लालबुंद डोळे श्वानावर रोखून धरले.

चित्त्याचे ते भयंकर डोळे आणि झेप घालून ठार मारण्याचा पवित्रा पाहिल्याबरोबर श्वान गर्भगळित झालें. तें थरथर कांपू लागलें. हा काळ आपल्याला गट्ट करील अशी त्याची खात्री झाली. तें महामुनीला शरण गेलें आणि म्हणालें, 'महामुनि! माझें रक्षण करा, हा क्रूर चित्ता माझा वध करूं इच्छीत आहे. त्याच्यापासून मला वांचवा. आपल्या प्रसादाने मी निर्भय होईन असें करा. आपण सर्वज्ञ आहांत आणि सर्वसामर्थ्यशालीहि आहांत, मला या प्राणसंकटांतून सोडवा.'

महामुनींनी श्वानाच्या जीवावरचा प्रसंग ओळखला आणि त्याने आतापर्यंत केलेल्या भक्तीची जाणीवहि त्यांना झाली. त्यांनी श्वानाला अभय दिलें आणि लगेंच त्याचें चित्त्यांत रूपांतर केलें. महामुनि म्हणाले, 'हे श्वाना! या चित्त्यापासून तुला मृत्यु येणार नाही. हा पाहा तुझा श्वानाचा आकार जाऊन तूं चित्ता झाला आहेस.' महामुनींनी असें म्हटल्याबरोबर त्या श्वानाची अंगकांति सुवर्णासारखी झाली, आणि काळ्या ठिपक्यांनीं त्याचें शरीर हुबेहूब चित्त्यासारखें बनलें. तेंहि अरण्यांतून आलेल्या चित्त्यासारखें जमिनीवर शेपूट आपटून लालबुंद डोळ्यांनी पाहूं लागलें. त्याचें तें रूप पाहिल्याबरोबर जबडा पसरून बसलेल्या चित्त्याने क्षणार्धांत तेथून पळ काढला. तें श्वान चित्त्याच्या स्वरूपांत वनामध्यें निर्भयपणाने फिरूं लागलें.

कांही दिवसांनंतर एक विक्राळ वाघ तेथे आला. त्याला पाहिल्याबरोबर चित्तारूप श्वानाची पुन्हा गाळण उडाली.

क्षुधेमुळे शरीर वाकलेला आणि तीक्ष्ण दाढा असलेला तो वाघ आपलें भक्षण करणार या कल्पनेनेच श्वान थरथर कांपू लागलें. तें धावतच

पुन्हा महामुनीला शरण गेलें. सहवासामुळे महामुनि श्वानावर अत्यंत प्रेम करीत असत. त्यांनी तोडीस तोड म्हणून त्याला वाघ बनविलें. परअरण्यांतून आलेल्या वाघाने आपल्यासमोर आपल्यासारख्याच बलाढ्य वाघाला पाहिलें आणि त्यानें मागल्या पावलीं अरण्याचा रस्ता धरला.

वाघ बनल्यानंतर तें श्वान मांसभक्षण करूं लागलें. त्याची मूळची सात्त्विकवृत्ति नष्ट झाली. महामुनींच्या सहवासांत असतांना मांसाला स्पर्श न करणारें श्वान त्यांच्याच प्रसादाने वाघ बनल्यानंतर रक्तपिपासू झालें. अरण्यांतील प्राण्यांना भक्षण करण्याची त्याची लालसा वाढतच गेली. तें निर्भयपणें अरण्यांत सर्वत्र संचार करूं लागलें. अरण्यांतील पशु-पक्षी भक्षण करावयाचे आणि पुन्हा महामुनींच्या पर्णकुटीजवळ जाऊन विश्रांति घ्यावयाची असा त्याचा नित्यक्रम बनला.

असेंच एके दिवशीं तें विश्रांति घेत पडलें असता प्रचंड मेघाप्रमाणे दिसणारा मस्त हत्ती तेथें आला. त्या मदोन्मत्त हत्तीला पाहतांच वाघाची पांचावर धारण बसली, हत्तीचें विशाल मस्तक-पिंड, शुभ्र दात आणि मेघासारखा गडगडाट ऐकून त्या व्याघ्ररूप श्वानाने महामुनींकडे पळ काढला. मुनींनी आपल्या वाघाला प्रचंड हत्ती बनविलें. आपल्यासारखाच बलशाली आणि धिप्पाड हत्ती समोर पाहून अरण्यांतून आलेल्या हत्तीने निमिषार्धांत पलायन केलें. हत्तीरूपी श्वानाला अतिशय आनंद झाला. त्याला आपलें सामर्थ्य वाढल्याची जाणीव झाली. तो कमलवनांत आनंदानें राहूं लागला. आश्रमाच्या परिसरांत त्याचे असेच अनेक दिवस निघून गेले.

कांही काळानंतर त्या ठिकाणी गिरीकंदरांतून महाभयंकर सिंह आला. मानेवर विपुल आयाळ आणि आरक्त डोळे पाहिल्याबरोबर हत्तीरूपी श्वानाची पूर्वीसारखीच अवस्था झाली. पण या खेपेलाहि मागच्या प्रसंगाप्रमाणेच महामुनींनी त्याला आशीर्वाद दिला आणि पाहतां पाहतां हत्ती बनलेल्या त्या श्वानाचें रूपांतर वनराजांत झालें. अर्थातच अरण्यांतून आलेल्या सिंहाने तेथून पळ काढला.

असाच आणखी एक प्रसंग येऊन सिंह बनलेल्या श्वानाला शरभाशीं सामना देण्याची कठीण वेळ आली. सर्व प्राण्यांची हिंसा करणारा, रक्तभक्षक, आठ पाय व ऊर्ध्वदृष्टि असलेला बलाढ्य शरभ महामुनींच्या

आश्रमाजवळ आला; शरभाचें तें अकाळ-विकाळ रूप आणि प्रचंड गर्जना ऐकून सिंह बनलेल्या श्वानाची गाळणच उडाली. आता तो भयंकर प्राणी आपल्याला जिवंत सोडणार नाही अशी त्याची खात्री झाली, तें पुन्हा महामुनींना शरण गेलें. महामुनींनी आपल्या सिंहाला अतिसमर्थ शरभ बनविलें. आपल्यासमोर आपल्याएवढाच क्रूर आणि बलाढ्य प्राणी पाहिल्याबरोबर अरण्यवासी शरभ तेथें थांबलाच नाही.

महामुनींच्या कृपेने आणि सामर्थ्याने यःकश्चित् श्वान प्रथम चित्ता, नंतर वाघ, हत्ती, सिंह आणि शेवटी अरण्यांतील सर्वश्रेष्ठ असें शरभ बनलें. पायरी–पायरीने त्याच्या सामर्थ्याची वाढ झाली. त्याचें क्रौर्यहि वाढत गेलें. त्याची रक्तपिपासा अनिवार बनली. त्याबरोबरच त्याचे मूळ सद्‌गुण नष्ट होत गेले. सात्त्विक स्वभावाची जागा तामसी वृत्तींने घेतली. विचारांना विकारांचें स्थान मिळालें. किंबहुना, त्याची विचारशक्तीच नष्ट झाली. त्याला वाटूं लागलें, आपण या सर्व जगांत अजिंक्य आहोंत. जगांतील कोणतीहि शक्ति आपली बरोबरी करूं शकणार नाही. त्याचा अहंकार बळावला. त्या अहंकाराच्या भरांत त्याला आपल्या मूळ स्वभावाचें भान उरलें नाही. त्याची क्रूरता वाढत गेली. दुष्टपणाला मर्यादा उरली नाही. आणि या सर्वांबरोबरच त्याची कृतज्ञता बुद्धीहि नष्ट झाली.

अरण्यांत आपल्यापेक्षा कोणीहि श्रेष्ठ नाही अशी त्याची मनोमन खात्री पटली; पण तेवढ्यांत त्याला महामुनींची आठवण झाली. त्यांच्या सामर्थ्याच्या जाणीवेने क्षणभर तें चमकलें. पण क्षणभरच! लगेच त्याला महामुनीहि आपल्या सामर्थ्यापुढे सामान्य वाटूं लागले. त्याने विचार केला, एवढा एक ऋषि संपविला म्हणजे मग आपल्याला कोणीहि प्रतिस्पर्धी उरणार नाही. आपणच या विशाल अरण्याचे सर्वाधिकारी बनूं. ही कल्पना त्याच्या मनांत दिवसेंदिवस बळावत गेली.

एके दिवशीं महामुनींच्या आश्रमाशेजारीं तें फिरत होतें. महामुनींना गट्ट करून टाकण्याचा त्याने बेत केला होता.

महामुनि अंतर्ज्ञानी होते. त्यांनी श्वानाचीं पावलें ओळखलीं. त्याची राक्षसी महत्त्वाकांक्षा त्यांच्या लक्षांत आली. त्यांनी श्वानाला समोर बोलाविलें. त्याच्याकडे दृष्टि रोखून ते म्हणाले, 'तुझ्या मनांतील डाव मी

ओळखला आहे. तुझी सत्तालालसा माझ्या पूर्णपणे लक्षांत आली आहे. तूं श्वानापासून शरभापर्यंत चढत्या श्रेणीने सामर्थ्यशाली बनत गेलास. तुझ्याविषयी वाटणाऱ्या स्नेहामुळेच मी तुला प्रत्येक वेळीं शक्ति पुरवीत गेलों. वस्तुतः तूं यःकश्चित् श्वान. चित्त्याच्या आणि वाघाच्या किंवा हत्तीच्या आणि सिंहाच्या श्रेष्ठतर कर्तृत्वाशीं तुला कधीतरी बरोबरी करतां आली असती काय? पण मी तुला सामर्थ्य दिलें आणि प्राणसंकटाशीं झुंज देण्याचें बळ पुरविलें. पण एवढें झाल्यानंतर आता तुझ्या मनांत माझाच वध करण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे. कृतघ्नतेची ही परमावधीच म्हटली पाहिजे. ज्याच्यापासून सामर्थ्य मिळालें त्या प्रेरक शक्तीलाच नष्ट करण्याची तुझी ही वृत्ति अक्षम्य आहे. ज्या पायऱ्यांवरून तूं वर चढत गेलास त्या नष्ट करण्याचें धाडस तुझ्या मनांत उद्भवलें आहे. आज तुला अरण्याचें नेतृत्व मिळालें आहे; पण तें नेतृत्व मिळण्याची मूळ शक्ति कोणती हें तूं पार विसरून गेला आहेस. ज्या शक्तीच्या आशीर्वादाने तूं सर्वाधिकारी बनलास, त्या शक्तीलाच भक्षण करण्याचे कृतघ्न विचार तुझ्या मनांत शिगेला पोहोंचले आहेत. तुझ्या अहंकाराची परमावधि झाली आहे. तुला त्याबद्दल प्रायश्चित्त मिळालेंच पाहिजे. ज्याने तुला शरभ बनविलें तो पुन्हा क्षुद्र श्वानाच्या पातळीवर आणून बसवूं शकणार नाही असें का तुला वाटतें? पण अहंकाराने विकृत झालेल्या तुझ्या बुद्धीला एवढा विचार सुचण्याची शक्यता नाही. तूं दुष्ट आहेस, ग्राम्य आहेस, तसेंच सत्ताबलाने मत्त होणारा आहेस. कृतघ्ना! तूं पुन्हा श्वान होशील!'

महामुनींच्या तोंडून हे शब्द बाहेर पडतांच त्या शरभाचा तत्काळ शक्तिपात झाला आणि तो पूर्वीसारखाच दुबळा श्वान बनला.

# अमात्य

राजाचा कोष रिता झाला की त्याची सत्ता संपली असें समजायला हरकत नाही. सैन्यबल, द्रव्यबल आणि बुद्धिबल हीं राजाचीं तीन महान् सामर्थ्यें असतात. त्यांपैकी शत्रूचे हेर सैन्याला पोखरीत असतात. हलक्या बुद्धीचे लोक राजाची बुद्धि पोखरीत असतात. आणि अमात्यवर्ग राजाचें द्रव्यबल नष्ट करीत असतो. अशा अमात्यांपासून कसें सावध राहावयाचें यासंबंधीं भीष्माचार्यांनी एक सुंदर कथा सांगितली आहे.

* * *

त्या वेळीं राजाक्षेमदर्शी कोसल देशाचा अधिपति होता. एके दिवशीं एक श्रेष्ठ मुनि त्याच्याकडे आला. कालकवृक्षीय त्याचं नांव. सत्यवक्ता आणि स्पष्टवक्ता म्हणून सर्वत्र त्याची ख्याति होती. राज्यांत कोठे काय चाललें आहे हें समजून घेण्याची त्याची तीव्र इच्छा असे. राजा कसा

वागतो, त्याचे अमात्य राजकारणाचीं सूत्रें कशीं हलवितात, राजाचा सेवकवर्ग किती निष्ठेने कार्य करतो, सैन्याचें सामर्थ्य कसें आहे इत्यादि अनेक गोष्टी समजून घेण्यासाठी तो मुनि देशभर संचार करीत असे. पण या बातम्या त्याला कशा समजावयाच्या ? त्याच्याजवळ एक सुंदर साधन होतें. एका पिंजऱ्यांत त्याने एक काकपक्षी धरून ठेवला होता. मुनीला काकविद्या अवगत होती. तो काक त्याला भूत, भविष्य आणि वर्तमान सांगत असे. राज्यांतील सर्व लोकांचीं, अधिकाऱ्यांचीं आणि अमात्यांचीं दुष्कृत्यें त्याला समजूं लागलीं. अमात्य द्रव्याचा अपहार करीत असलेले त्याला दिसले. राजकर्मावर नियुक्त केलेले अधिकारी राजाचा कोष पोखरीत असलेले दिसले. मुनीला हें पाहवलें नाही. राजाला या सर्व प्रकारांची जाणीव करून द्यावी अशी त्याची इच्छा होती. स्वार्थी सेवकांच्या लीला राजांना समजल्या पाहिजेत असें त्याला वाटत होतें.

एके दिवशीं तो मुनि राजदरबारांत गेला. 'मी सर्वज्ञ आहें,' अशी घोषणा करीत त्याने दरबारांत प्रवेश मिळविला. त्याला त्रिकाल-ज्ञानाचें सामर्थ्य देणारा काकहि त्याच्याबरोबर होता.

दरबारांत पोहोंचल्याबरोबर त्या मुनीने प्रथम राजदर्शन घेतलें आणि नंतर सभोवती बसलेल्या दरबारी–मंडळीकडे दृष्टिक्षेप टाकला. कोण, कोणतें दुष्कृत्य करतो याचें त्याला ज्ञान होतें. मौल्यवान अलंकार घातलेला मुख्यअमात्य त्यानें पाहिला आणि त्याला सांगितलें, 'अरे, तूं राजकोषाचा अपहार केला आहेस आणि ही गोष्ट अमुक, अमुक मनुष्याला माहीत आहे. तरी या गोष्टीचा तूं विचार कर.'

मुनीचें भाषण ऐकून अमात्य संतप्त झाला. त्याने रुष्ट होऊन मुनीकडे पाहिलें. त्याची ती क्रुद्ध दृष्टि पाहून मुनि म्हणाला, 'अमात्या, संतापूं नकोस. मी जें कांही बोललों तें सत्य आहे. माझा काक कांहीहि असत्य सांगणार नाही. त्याला सर्वांचीं रहस्यें समजतात. कोणी कितीहि गुप्तपणें कृत्य करो, तें त्याला समजल्याशिवाय राहात नाही. आजपर्यंत माझा काक कधीहि असत्य बोलला नाही.'

एवढें बोलूनच मुनि थांबला नाही. इतर श्रेष्ठ मंत्र्यांकडे पाहूनहि त्याने स्पष्टपणे आपले विचार बोलून दाखविले, 'राजाच्या कोषाचा तुम्ही

सगळे अपहार करीत आहांत,' असें त्याने बजावलें. खरें असलें तरी अप्रिय गोष्ट कोणाला आवडेल ? प्रत्यक्ष राजदरबारांत आणि राजासमोर झालेला अपमान त्यांना सहन झाला नाही. आपल्या गुप्त रहस्यावर अशा प्रकारें यःकश्चित् एका मुनीने एवढा झगझगीत प्रकाश टाकावा हें त्यांना रुचलें नाही. राजकोषाचा अपहार ते करीत होते ही गोष्ट निश्चित. पण म्हणून का तें भर दरबारांत सांगावयाचें ?

ज्यांचे त्या दुष्कृत्यांत हात बुडालेले होते ते सर्व चडफडूं लागले. सूड घेण्याची भावना त्यांच्या मनांत झपाट्याने वाढत गेली. काय करावें याचा ते विचार करूं लागले. इतर वेळीं एकमेकांचे प्रतिस्पर्धी असलेले, किंबहुना परस्परांचे शत्रु असलेले ते श्रेष्ठ राजसेवक संघटित झाले. कसेंहि करून त्या 'दुष्ट' कावळ्याला उपद्रव करावयाचें त्यांनी ठरविलें.

मुनि राजासमोर जें कांही सांगावयाचें तें सांगून लगेच दरबारांतून निघून गेला. त्याच्या त्या त्रिकाल काकपक्ष्याचा पिंजराहि बरोबर होता.

आता काय करावयाचें ? अमात्य आणि इतर राजसेवक विचार करूं लागले. एकाच्या डोक्यांतून शक्कल निघाली आणि ती सर्वांना पसंत पडली. रात्रीची वेळ होती. मुनि त्या वेळीं गाढ झोपीं गेला होता. जवळच काकपक्ष्याचा पिंजरा होता. अमात्यांनी त्या पक्ष्यावर बाण सोडले. पक्षी बाणानें विद्ध झाला. अमात्यांचें काम संपलें. ज्या पक्ष्याच्या सांगण्यावरून मुनीनें राजदरबारांत अमात्यांचा अपमान केला होता त्या काकपक्ष्याचें अस्तित्वच त्यांनी संपविलें.

दुसरे दिवशीं मुनि सकाळींच जागा झाला. प्रथम त्याची दृष्टि काकपक्ष्याच्या पिंजऱ्यावर गेली. त्याला तें दृश्य पाहून अतिशय वेदना झाल्या. आपला त्रिकालज्ञ मित्र पिंजऱ्यामध्ये बाणांच्या तीक्ष्ण टोकांनी विदीर्ण झाल्याचें पाहून मुनीला कमालीचें दुःख झालें. काय प्रकार घडला आणि त्यामागें कोणाचा हात असावा याची त्याला चांगली कल्पना आली. तो तसाच उठला व त्याने राजाची भेट घेतली.

मुनि म्हणाला, 'राजा, तुझी आज्ञा असेल तर तुला चार हिताच्या गोष्टी सांगतों.'

'मुनिराज ! त्यासाठी माझी आज्ञा कशाला हवी ? आपण अवश्य

सांगा. माझ्या हिताची आपण एवढी काळजी घेत आहांत हें पाहून मला कितीतरी समाधान वाटत आहे. तेव्हा आपण अवश्य सांगा.'

'पण त्यासाठी माझी एक अट आहे.'

'काय आहे आपली अट ?'

'मला अभय पाहिजे.'

'एवढेंच ना ! मी आपल्याला आश्वासन देतों. आपल्याला कांहीहि इजा पोहोंचणार नाही.'

'राजा तुझा विजय असो. पण मला अद्यापि भीति वाटते. कांही गोष्टी सत्य असल्या तरी अप्रिय असण्याचा संभव असतो आणि त्यामुळे त्या न आवडून कोणी रागावूं नये अशी माझी अपेक्षा आहे.'

'आपण कांहीहि चिंता करूं नका. हे ब्रह्मनिष्ठा, आपणाला वाटेल तें बोला. माझ्या हिताचें असेल तें मी अवश्य स्वीकारीन.'

'तुझ्या राष्ट्रामध्ये दुष्ट कोण आहेत आणि चांगले कोण आहेत याची माहिती मी मिळविली आहे. तुझे हितकर्ते कोण आहेत आणि तुझा नाश करण्यासाठी कोण टपलेले आहेत याचें मला चांगलें ज्ञान आहे. तुला कोणाकडून धोका पोहोंचण्याची भीति आहे याचीहि मला चांगली कल्पना आहे. आणि ही सर्व माहिती तुला सांगण्यासाठीच मी येथें आलों आहे.

हे राजा, सेवा करणें हा दोष आहे असें आचार्यांनी पूर्वीच सांगितलें आहे. राजाची सेवा करणें हें तर पाप असून जे केवळ अगतिक असतात त्यांचीच ती गति आहे. राजाशीं मैत्री ठेवणेंहि फार धोक्याचें असतें. 'अशी मैत्री म्हणजे केवळ विषारी सर्पाशींच मैत्री,' असें म्हणतात. राजाला पुष्कळ शत्रु असतात आणि अनेक मित्रहि असतात. त्याच्या आश्रयाने उपजीविका करणाऱ्यांना त्या सर्वांपासूनच भीति असते. एवढेंच नव्हे, तर त्याला राजाकडूनहि भीति असते. म्हणूनच राजाची सेवा करणें महान् कठीण कर्म आहे असें म्हटलें जातें. तो प्रसन्न ठेवला तर देवतेप्रमाणे सर्व मनोरथ पूर्ण करतो आणि तो क्रुद्ध झाला तर, अग्नीप्रमाणे समूळ दग्ध करून टाकतो.

राजा, तूं आपले हितकर्ते कोण आणि शत्रु कोण याविषयींचें ज्ञान संपादन कर. तुझ्या द्रव्याचा अपहार करण्याविषयी तत्पर असणारे जे

कोणी आहेत त्यांनीच माझ्या कावळ्याचा वध करून आपलें वैर साधलें. तुझा विनाश व्हावा आणि नंतर आपणाला राज्य मिळावें, अशी त्यांची इच्छा आहे. त्यांचें कार्य तुझ्या सेवक मंडळीशीं स्नेह केल्यानेच साध्य होईल. तेव्हा अशा स्थितींत येथे राहणें माझ्या जीवितास धोक्याचें वाटतें. कारण या राज्यांत तुलाहि विश्वास ठेवतां येणें शक्य नाही; मग मला कसें शक्य आहे ? सत्कृत्य आणि दुष्कृत्य या दोन्हींची योग्यता तुझ्या राज्यांत सारखीच आहे. म्हणूनच सुज्ञ मनुष्याने येथे वास्तव्य करणें योग्य ठरणार नाही.

तूं विषारी सर्पाने वेढलेल्या विहिरीसारखा झाला आहेस. अनेक श्वान, गिधाडें आणि कोल्हे यांच्या वर्तुळांत सांपडलेल्या राजहंसाप्रमाणे तुझी अवस्था झाली आहे. लवकर पेट घेणाऱ्या गवताच्या योगाने भयंकर दावाग्नि भडकावा आणि त्यांतच चांगल्या बहरलेल्या वृक्षाची आहुति पडावी, तशी तुझी गत होण्याचा मला संभव वाटतो. तुझें राज्य म्हणजे अनेक निरपराध प्राण्यांचा वध करण्यासाठी पसरलेलें एक मोटेंच जाळें बनलेलें आहे. बरें, वाईट पशूपक्षी त्यांत केव्हा सापडतील याचा नेम राहिलेला नाही. आणि या सर्वांचें कारण म्हणजे तूं ज्यांना अत्यंत विश्वासु समजतोस, ते तुझे अमात्यच होत. ते तुझ्याशीं प्रतारणा करतात. पण ही गोष्ट तुझ्या लक्षांत येत नाही. एका अर्थाने तुझ्या निवासस्थानांत अनेक सर्प राहात असून त्यांच्या विषारी जिव्हेची तुला कल्पना आलेली नाही.

या सर्व गोष्टींची कल्पना देण्यासाठीच मी तुझ्या राज्यांत राहिलों. मला अतिशय सावधपणे राहावें लागलें. तुझें हित इच्छिणाऱ्या व्यक्तींचा तुझे अमात्य द्वेष करतात. पण एवढें माहीत असूनहि मी तुझ्या येथे राहिलों; तें केवळ तुझ्याभोवती जमलेल्या परिवाराची परीक्षा पाहण्यासाठी. राजा जितेंद्रिय आहे काय? त्याची अमात्य मंडळी त्याच्या आज्ञेप्रमाणे वागते काय? तुझ्या सेवकांना तूं प्रिय आहेस काय? आणि तुला तुझी प्रजा प्रिय आहे काय? हें सर्व मला पडताळून पाहावयाची इच्छा होती. माझ्या या मुक्कामांत दोन्ही प्रकारांचे अनुभव आले आहेत. तुझ्या सदाचरणाविषयी माझी खात्री पटली. पण त्याचबरोबर तुझ्या अमात्यांचें स्वार्थी वर्तनहि मला पाहावयास मिळालें. मी तुझ्यावर लुब्ध झालों आहे.

यामुळेच तुझे स्वार्थी सेवक माझा द्रोह करूं लागले. म्हणूनच मी यापुढे इथे राहणें योग्य नाही. जखमी झालेल्या सर्पाची ज्याप्रमाणे भीति बाळगावी लागते, त्याचप्रमाणे सूडबुद्धीने व्यथित झालेल्या अंतःकरणाचीहि भीति बाळगावी लागते. तें केव्हा उलटेल याचा नेम नसतो. म्हणून मी आता निघून जाणार.'

राजा म्हणाला, 'ब्राह्मणश्रेष्ठा, तूं निघून जाण्याचा विचार सोडून दे आणि माझ्या राजमंदिरांत येऊन राहा. तुझा द्रोह करणाऱ्यांचा मी त्याग करीन. तुझा बहुमान करावयाची माझी इच्छा आहे. माझ्या हातून राज्याचें शासनकार्य कसें चालेल, याचें मला मार्गदर्शन कर मी कोणत्या साधनांचा उपयोग करूं म्हणजे माझ्या अमात्यांचें कारस्थान उघड होईल आणि माझें सामर्थ्य वाढूं लागेल ?'

मुनि म्हणाला, 'त्यासाठी प्रथम तूं क्रमाक्रमाने अमात्यांचे एक एक अधिकार काढून घे. त्यामुळे आपोआपच त्यांचें सामर्थ्य कमी होत जाईल. यानंतर त्यांच्याकडून एखादा मोठा अपराध घडला म्हणजे त्यांपैकी एकेकाला वेगळें करून नष्ट करून टाक. सर्वांना एकदम नष्ट करून टाकण्याची मात्र उतावळी करूं नको. या गोष्टी तूं अतिशय सावधपणे पण कांहीशा कठोरपणे केल्यास तर हळूहळू कारस्थानें तर उघडकीस येतीलच पण त्याबरोबर तुझें सामर्थ्यहि वाढूं लागेल. राजाने सर्वांत महत्त्वाची गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे आणि ती म्हणजे खरा विश्वासु कोण आणि विश्वासाचें ढोंग करणारा कोण, हें त्याला ओळखतां आलें पाहिजे.'

◆

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3६30८ वि: निबंध
क्रमांक १०।४।६४ नों दि ११८७

## राजाचें शील

राजाला सैन्यबल हवें. बुद्धिबलाशिवाय त्याचें चालणार नाही. आणि द्रव्यबल तर राज्याचा आधार होय. पण केवळ एवढ्यानेच राजा सर्वसमर्थ होईल काय? पृथ्वीवरील थोर राजांजवळ एवढींच सामर्थ्यें होतीं काय? कीं राजाला आणखी कांही गुणांची आवश्यकता असते? धर्मराजाच्या मनांत असे अनेक प्रश्न उत्पन्न झाले. त्याला त्याचीं उत्तरें नीटशीं सापडेनात. म्हणून त्याने आपली शंका भीष्माचार्यांना बोलून दाखविली. भीष्माचार्य प्रसन्नपणें हंसले. जणूं काय ते अशा प्रश्नांची अपेक्षाच करीत होते. त्यांना या प्रश्नांचीं उत्तरें देतांना विशेष आनंद झाला असावा असें त्यांच्या सहास्य मुद्रेवरून स्पष्ट होत होतें.

भीष्म– तुझा प्रश्न मूलगामी आहे. किंबहुना सर्व प्रश्नांचा प्रश्न आहे. राजाला अनेक गुण लागतात. विविध गुणांच्या समुच्चयाने त्याचें सामर्थ्य वाढत जातें. प्रजापालनाच्या कार्यांत तो दक्ष, धैर्यसंपन्न आणि कार्यनिष्ठ असला पाहिजे. त्याला काळाचा प्रभाव समजला पाहिजे.

त्याची धारणाशक्ति असाधारण असावी आणि तो क्षमाशीलहि असावा. प्रजेचें हित हेंच त्याचें सर्वश्रेष्ठ कार्य. लोकांचें रंजन करणारा म्हणून तर त्याला राजा म्हणायचें. पण या सर्व गुणांच्या मुळाशीं एक महान् गुण आहे आणि राजाच्या ठिकाणी त्याचा प्रभाव नसेल तर तो खऱ्या अर्थानें श्रेष्ठ सत्ताधीश म्हणवून घेण्यास पात्रच ठरूं शकणार नाही.

धर्म– असा कोणता तो महान् गुण आहे ?

भीष्म– शील! राजा शीलसंपन्न असला पाहिजे. राजाचें शील गेलें की त्याचीं सर्व सामर्थ्येंहि सोडून जातात. सत्य, सदाचार, संपत्ति या सर्वांचा मुख्य आधार शील असतें. शीलाने त्याग केल्याबरोबर राजा प्रल्हादाची कशी दयनीय अवस्था झाली याचा एक प्रसंग मी तुला सांगतों.

* * *

फार प्राचीन काळची कथा आहे. दैत्यकुलोत्पन्न राजा प्रल्हाद अत्यंत शीलसंपन्न होता. त्यानें कोणाचाहि कधी द्रोह केला नाही. त्याचें दातृत्व तर प्रसिद्धच होतें. आपल्या प्रत्येक कृतीने इतरांचें हित झालें पाहिजे अशी त्याची दृष्टि होती. शीलाच्या सामर्थ्यावरच त्यानें देवेंद्राचें राज्य काढून घेतलें आणि तो त्रैलोक्याचा धनी बनला. इंद्राला इंद्रपद सोडावें लागलें. महाज्ञानी इंद्रावर मोठा बिकट प्रसंग ओढवला. तो विचार करूं लागला : माझें श्रेष्ठपद प्रल्हादाला कसें प्राप्त झालें, हें समजत नाही. विचार करून त्याची बुद्धि थकली. पण प्रल्हादाच्या विशेष गुणांचा शोध लागला नाही.

तो बृहस्पतीकडे गेला आणि म्हणाला, 'जगांत सर्वश्रेष्ठ काय आहे, हें जाणण्याची मला इच्छा आहे.' बृहस्पतीने इंद्राला मोक्षप्राप्तीस उपयुक्त अशी माहिती सांगितली आणि 'हीच काय ती सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे,' असें म्हटलें.

पण इंद्राचें तेवढ्याने समाधान झालें नाही. तो पुन्हा म्हणाला, 'याहूनहि श्रेष्ठ असें काय आहे ?'

बृहस्पतीने त्याला शुक्राकडे जाण्याचा सल्ला दिला.

इंद्र शुक्राकडे गेला आणि त्यालाहि तोच प्रश्न विचारला.

शुक्राने त्याला उत्कृष्ट ज्ञानाची प्राप्ति करून दिली. पण त्यामुळेहि इंद्राचें समाधान झालें नाही. त्याने पुन्हा प्रश्न विचारला, 'याहून कांही श्रेष्ठ आहे काय?'

शुक्र म्हणाला, 'या प्रश्नाचें उत्तर तुला प्रल्हादाकडे मिळेल, तोच तुझें समाधान करूं शकेल.'

इंद्राने प्रल्हादाकडे जावयाचें ठरविलें. वेष पालटला आणि तो प्रल्हादाकडे गेला. प्रल्हादाने त्या अतिथीचें यथायोग्य आतिथ्य केलें आणि विचारलें, 'हे द्विजश्रेष्ठा, मी आतां आपल्या कार्याला लागतों.' इंद्राने त्याला क्षणभर थांबविलें आणि विचारलें, 'राजश्रेष्ठा, मला सर्वश्रेष्ठ असें काय आहे तें समजून घ्यावयाचें आहे. आपणच माझें समाधान करूं शकाल.' प्रल्हादाने तत्काळ उत्तर दिलें, 'त्रैलोक्याचें राज्य करण्यांत मी मग्न झालों आहे. त्यामुळे तुझ्या प्रश्नाचें उत्तर देण्यास मला मुळीच वेळ नाही.'

अतिथि– आता नसलें तरी, तुला जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तूं मला प्रश्नाचें उत्तर दे.

प्रल्हाद– मग ठीक आहे.

कालांतराने अतिथि इंद्र आणि प्रल्हाद यांची चर्चा झाली. इंद्राने प्रल्हादाला अनेक प्रश्न विचारले. आणि प्रल्हादानेहि त्याचें समाधान करण्याच्या दृष्टीने उत्तरें दिलीं.

इंद्राची ज्ञानजिज्ञासा, सेवाबुद्धि आणि विनयसंपन्नता पाहून प्रल्हादाला अत्यानंद झाला. तो प्रसन्न चित्तानें इंद्राला म्हणाला, 'हे पांथस्था, तूं योग्य प्रकारें गुरुसेवा केली आहेस. त्यामुळे मी संतुष्ट झालों आहे. तुझें कल्याण असो. तूं माझ्याकडून कोणताहि वर मागून घे. मी तो अवश्य पूर्ण करीन.'

इंद्र म्हणाला, 'मला कांही नको.' पण प्रल्हादाने त्याला खूपच आग्रह केला. त्यावर इंद्र म्हणाला, 'राजा तूं खरोखर प्रसन्न झाला असशील आणि माझें कल्याण व्हावें अशीच इच्छा असेल तर मला फक्त

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
७३७..३९

एकच वर दे. तुझें शील मला मिळावें अशी इच्छा आहे. तेव्हा एवढें वरदान दे.'

प्रल्हादाने तथास्तु म्हटलें.

प्रल्हादानें तथास्थु म्हटलें खरें, पण नंतर त्याला अतिशय दुःख झालें.

प्रल्हाद चिंतामग्न बसला होता. तेवढ्यांत एक धिप्पाड तेजस्वी मूर्ति त्याच्या शरीरांतून बाहेर पडली. प्रल्हादाने त्या मूर्तीला विचारलें, 'तूं कोण आहेस?' त्यावर मूर्तीनें उत्तर दिलें, 'माझें नांव शील. तूं माझा त्याग केल्यामुळे मी तुझ्याजवळून निघून जात आहे. ज्या पांथस्थाने तुझी मनोभावें सेवा केली त्याच्या शरीरांत मी प्रवेश करणार आहे.'

एवढे शब्द त्या प्रकाशमूर्तीने उच्चारले आणि लगेच ती अंतर्धान पावली.

एक प्रकाशमूर्ति निघून गेली आणि लगेच त्याच्या पाठोपाठ प्रल्हादाच्या शरीरांतून आणखी एक पुरुष बाहेर पडला.

प्रल्हाद – तूं कोण?

पुरुष – मी धर्म. जिकडे शील तिकडे मी. शील आणि धर्म एकरूपच असतात.

प्रल्हादाने आपल्या शरीराकडे पाहिलें. आणखी एक प्रज्वलित आकृति शरीरांतून बाहेर पडूं लागली. त्याने पुन्हा तोच प्रश्न त्या आकृतीला विचारला. प्रकाशाकृतीने उत्तर दिलें, 'माझें नांव सत्य. मी धर्माचाच अनुयायी असल्यामुळे आज जिकडे धर्म गेला तिकडेच मी जात आहे!'

सत्याच्या पाठोपाठ एक धिप्पाड पुरुष प्रल्हादाचें शरीर सोडून जाऊं लागला. प्रल्हादाने त्यालाहि विचारलें, 'अरे बाबा, तुझें नांव काय? आणि तूं मला सोडून कां जात आहेस?'

त्याला उत्तर मिळालें, 'मला सदाचार म्हणतात. जेथे सत्य तेथे सदाचार.'

सदाचाराच्या प्रयाणापाठोपाठ आणखी एक मूर्ति प्रल्हादाला सोडून जाऊं लागली. तिने आपलें नांव सांगितलें, 'बल.' बलाने सांगितलें, 'जिकडे सत्य आणि सदाचार तिकडेच माझें वास्तव्य.'

वरीलप्रमाणे चार महापुरुषांनी प्रल्हादाचें शरीर सोडलें आणि ते सर्व दूर दूर निघून गेले. प्रल्हाद भयचकित होऊन पुढे काय घडतें, याकडे पाहूं लागला. तोंच त्याच्या शरीरांतून एक तेजोमय देवी बाहेर पडली. तिचें सौंदर्य अवर्णनीय होतें आणि तिचा प्रकाश दिपवून टाकीत होता. प्रल्हादाने तिला प्रश्न विचारण्यासाठी तोंड उघडलें तोंच ती म्हणाली, 'मी लक्ष्मी आहें. हे अमोघ पराक्रमी वीरा, मी आपण होऊनच तुझ्या ठिकाणी वास्तव्य करीत होतें. पण यापुढे मला तुझ्या सान्निध्यांत राहतां येणार नाही. बलाने तुला सोडलें. मग मी तरी कशी राहणार ? अरे, जेथे सामर्थ्य तेथेच संपत्ति.'

प्रल्हाद म्हणाला, 'हे कमलवासिनी लक्ष्मी, तूं चाललीस तरी कोठें? तूं या लोकाची मुख्य अधिदेवता असून सत्यनिष्ठ आहेस. तेव्हा तूं मला असें सांग की, ज्या पांथस्थाच्या शरीरांत शील, धर्म, सत्य, सदाचार आणि बल यांनी प्रवेश केला आणि आता तूंहि प्रवेश करीत आहेस, तो आहे तरी कोण ? आणि तुम्ही सर्वच त्याच्याकडे कां जात आहांत ?'

लक्ष्मी – तो पांथस्थ दुसरा कोणी नसून प्रत्यक्ष इंद्रच आहे. हे धर्मज्ञा, शीलाच्याच साहाय्यानें तूं त्रैलोक्य हस्तगत केलें होतेस, हें इंद्राला तुझ्याकडूनच समजलें. त्याने तुझें शीलहरण केलें. तें गेल्याबरोबर त्याचे अनुयायीहि त्याच्या मागे निघून गेले. धर्म, सत्य, सदाचार, बल आणि मी या सर्वांचें मूलकारण शील हेंच होय.

प्रल्हाद – पण हें शील म्हणजे तरी काय?

लक्ष्मी – कोणाहि प्राण्याचा द्रोह न करणें, दान करणें आणि अनुग्रह करणें हें प्रशंसनीय असें शील होय. ज्याच्या योगानें लज्जा उत्पन्न होईल, असें कोणतेंहि कर्म करतां कामा नये. तर, जनसमुदायामध्ये ज्याच्या योगाने प्रशंसा होईल तेंच कर्म करावें. हे नराधिपते, शीलावांचूनहि एखाद्या ठिकाणी एखाद्याला संपत्ति मिळते. पण ती संपत्ति चिरकाल उपभोगतां येत नाही. एवढेंच नव्हे, तर अशा द्रव्याने समूळ नाशच होतो. म्हणूनच मी म्हणतें, शील हीच राजाची सर्वश्रेष्ठ संपत्ति आहे, हें चिरंतन लक्षांत ठेव.

## राजसेवक

धर्मराज – पितामह ! राजसेवक अनेक असतात. त्यांत कांही सेवातत्पर तर कांही स्वार्थी; कांही तोंडपुजे तर कांही दुतोंडी. कांही राजसेवकांचें वर्तन रुकृत्‌दर्शनीं अत्यंत नम्र असतें, पण पोटांत मात्र कांही निराळाच कावा असतो. अशा विविध वृत्तींच्या आणि प्रकृतीच्या राजसेवकांची पारख कशी करावयाची हा एक विलक्षण प्रश्न माझ्यापुढे उभा आहे.

भीष्म – तूं म्हणतोस तसा प्रश्न अवघड आहे यांत शंका नाही. कांही दुष्ट लोक सज्जनासारखे दिसतात, तर कांही सज्जनांचें बाह्यरूप मनाला अप्रिय वाटण्यासारखें असतें. त्यामुळे त्यांच्या अंतरंगाची खरी परीक्षा होणें कठीण असतें. राजाला सेवकांच्या साहाय्याने अनेक कार्यें पार पाडावीं लागतात. त्यांच्यावर विश्वास ठेवून अनेक घटना घडवून आणाव्या लागतात. अमात्यापासून गुप्तहेरापर्यंत अनेक अधिकाराच्या जागीं काम करणाऱ्या राजसेवकांवर विसंबून राजा कारभाराचीं सूत्रें चालवीत असतो. त्यांतील कोणीहि विश्वासघात केला किंवा कपटी वर्तन केलें तरी राजाच्या सत्तेला आणि

राज्याच्या अस्तित्वाला धोका उत्पन्न होण्याची भीति असते. म्हणूनच योग्य राजसेवकांची निवड करणें अतिशय अवघड काम आहे.

धर्मराज – अशी निवड करण्यांत चूक झाली तर किती घोर परिणाम होतात हें मला समजावून घ्यावयाचें आहे.

धर्मराज – या संदर्भांत मी तुला एक कथाच सांगतों.

* * *

अनेक वर्षांपूर्वी पौरिक नांवाचा राजा होऊन गेला. तो वैभवसंपन्न होता. पण तितकाच क्रूरहि होता. आपल्या वैभवाच्या सिद्धीसाठी त्याने प्रजेचा अत्यंत छळ केला. पुढे तो निधन पावला आणि कोल्ह्याच्या जन्माला गेला. गोमायु त्याचें नांव. त्याला पूर्व जन्माच्या वैभवाची व वर्तनाची आठवण होऊन अतिशय दुःख झालें. त्या गतस्मृतींनी त्याचें मन व्याकुळ होऊं लागलें. त्याला पश्चात्ताप झाला. आणि तेव्हापासून त्याने आपल्या जीवनाला अगदी निराळें, अगदी नवें वळण देण्याचा मनांत निश्चय केला. त्याने मांसाहार सोडला. झाडावरून आपोआप पडणाऱ्या फळावर तो उदरनिर्वाह करूं लागला. अहिंसा आणि सत्य यांचें पालन करण्याचा त्याने दृढनिश्चय केला. त्याच्या जातींतील इतर प्राण्यांना त्याचें असें शुचिर्भूत वर्तन सहन होईना. त्याचा निश्चय ढळावा म्हणून ते प्रयत्न करूं लागले. ते म्हणत असत, अरे! तूं जात्याच मांसाहारी असतांना अशीं भलतींच व्रतवैकल्यें पाळण्याचा खटाटोप कां करीत आहेस? तुझा निवास स्मशानांत असतांना वर्तन मात्र साधूसारखें ठेवण्याचा अट्टाहास कां? तुझा जन्म कोल्ह्याचा. त्याप्रमाणेच तुझें वर्तन झालें पाहिजे. तेव्हा तूं आमच्यासारखा हो. हा शुद्धपणा टाकून दे. आणि आपलें नेहमीचें खाद्य सेवन कर.

गोमायूने आपल्या जातिबांधवांचें म्हणणें शांतपणे ऐकून घेतलें. आणि मग तो त्यांना म्हणाला, "अरे, माझा जन्म कोठे झाला यावरून माझा मोठेपणा किंवा लहानपणा ठरूं शकत नाही. जन्म हें कांही कुल ठरविण्याचें प्रमाण होऊं शकत नाही. उच्च कुल किंवा नीच कुल हें

प्रत्येकाच्या आचरणावरून ठरविलें जातें. शीलानेंच एखाद्याचें उच्चत्व ठरतें. म्हणूनच मी स्मशानांत जन्मलों आणि स्मशानांतच वास करीत असलों तरी, माझ्या मनाला कधीहि असमाधान वाटत नाही.

गोमायूची अशी वृत्ति त्याच्या सभोवती असलेल्या सर्व प्राण्यांना चांगली माहीत झाली, आणि हळूहळू ते त्याच्याविषयी आदर व्यक्त करूं लागले. त्या प्रदेशांतील एका व्याघ्राला गोमायूची कीर्ति समजली. त्याला वाटलें, गोमायूसारखा महामंत्री आपल्याला लाभला तर आपलें राज्य आदर्श बनेल. आपल्या मनांतील ही इच्छा व्यक्त करण्यासाठी तो व्याघ्र गोमायूकडे गेला. व्याघ्राने गोमायूचा योग्य सत्कार केला आणि त्याला आपला महामंत्री होण्याची विनंति केली.

वनाचा सर्वाधिपति असा तो व्याघ्र आपल्याकडे मुद्दाम येऊन महामंत्री होण्याची विनंति करीत आहे या गोष्टीचा गोमायूला अभिमान वाटला. महापराक्रमी व्याघ्राने एवढें थोर अधिकारपद देऊं केल्याबद्दल त्याने कृतज्ञताहि व्यक्त केली.

व्याघ्र – हे सौम्या ! तुझा स्वभाव आणि विचार मला आदरणीय वाटतात. म्हणूनच मी तुला माझ्या राज्याचा महामंत्री हो असें विनवीत आहे. तूं माझ्याबरोबर चल. तुला इष्ट वाटेल त्याच वस्तूंचा उपभोग घे. तुझ्या आदर्श आचरणामुळे माझें राज्यहि आदर्श होईल. आणि राजसेवकांनाहि तुझें वर्तन कित्त्यासारखें पुढें ठेवतां येईल.

गोमायु – हे मृगराज ! माझ्यासंबंधी आपण काढलेले उद्‌गार म्हणजे आपल्याच थोर मनाचे निदर्शक आहेत. धर्म आणि अर्थ यांमध्यें निष्णात असलेल्या अमात्याचा शोध आपण करीत आहात. अमात्यावांचून राजाला आपलें आणि राज्याचें संरक्षण करणें कठीण असतें. म्हणूनच योग्य अमात्य लाभणें म्हणजे राजाच्या दृष्टीने सद्‌भाग्यच समजावयाचें. अमात्य दुष्ट असेल तर राज्याला अपाय घडेल. चांगल्या अमात्याची नेमणूक करण्यासाठी चाललेली तुझी धडपड मला समजूं शकते. पण या पदावर आरूढ होण्याची माझी मात्र इच्छा नाही. तुझ्या पूर्वीच्या सेवकाशीं माझा स्वभाव जुळणार नाही. माझ्या निःस्पृह वर्तनामुळे त्यांना अडचण वाटूं लागेल. तें

तुझ्या अंतःकरणांत माझ्याविषयी भिन्न भाव उत्पन्न करतील. शिवाय मी कधीहि कोणाचा सेवक बनलों नाही. सेवा करावयाचें ज्ञान मला नाही. स्वतंत्रवृत्तीने अरण्यांत फिरणें मला अधिक आवडतें. राजाच्या आश्रयाला राहणाऱ्या लोकांना किती तरी विधिनिषेध पाळावे लागतात. त्याची मर्जी सांभाळण्यासाठी आपल्या मनाची ठेवण बदलावी लागते. मला या सर्व गोष्टी जमतील असें वाटत नाही. निर्भयता, स्वतंत्रवृत्ति आणि सरळपणा या गुणांचा त्याग करण्याची माझी इच्छा नाही, म्हणून तूं इतर कोणाला महामंत्रिपदाच्या जागीं नमणें अधिक चांगलें.

व्याघ्र – तुझें सर्व म्हणणें मी ऐकलें. म्हणूनच तुझ्यासारख्या व्यक्तीकडे अमात्यपद सोपवावें असा मी निश्चय केला आहे. तूं माझ्या विनंतीचा अव्हेर करूं नको.

गोमायु – ठीक आहे. तुझी एवढी श्रद्धा आणि आग्रह असेल तर मी हें अधिकारपद स्वीकारतों. पण त्यासाठी प्रथम तूं माझ्याशीं कसें वागावें यासंबंधी आपला कांही करार झाला पाहिजे. माझें हिताचें भाषण तूं ऐकलें पाहिजे. तुझ्या दुसऱ्या मंत्र्यांशीं मी कधीहि मसलत करणार नाही. तुझ्याभोंवती असलेल्या गोतावळ्यांत एका दृष्टीने मी परका आहें. म्हणून तुझे जुने राजसेवक माझ्यासंबंधी तुला खोटेंनाटें सांगतील. ते माझा मत्सर करूं लागतील. या सर्व संभाव्य गोष्टींचा तूं विचार कर आणि मगच मला अमात्यपद द्यावयाचें किंवा नाही तें ठरव.

व्याघ्र – तूं सांगितलेल्या सर्व अटी मला मान्य आहेत. मी त्यांचा पूर्वीच विचार केला आहे.

या संभाषणानंतर गोमायु त्या मृगराजाचा महामंत्री झाला. गोमायूचें वर्तन आणि कारभार व्याघ्राला अतिशय आवडूं लागला. तो त्याच्या सल्ल्यानें वागूं लागला. त्याची प्रशंसा आणि बहुमान करून व्याघ्राने आपली पसंती व्यक्त केली.

पण नेमकी हीच गोष्ट पूर्वीच्या राजसेवकांना अप्रिय वाटूं लागली. ते गोमायूचा द्वेष करूं लागले. त्यांच्यापैकी कांही जण प्रथम मधुर

भाषणें करून त्याच्या मनाला भुरळ पाडण्याचा प्रयत्न करूं लागले. धन आणि मान देऊन आपल्या बाजूला त्याला वळवूं लागले. आपल्या दुष्कृत्यांमध्ये गोमायूने सहभागी व्हावें अशी त्यांची इच्छा होती. ते परद्रव्याचा अपहार करीत असत. आणि आपल्या कर्तव्यांतहि चुकारपणा दाखवीत असत. पण गोमायूने अशा सर्व अयोग्य प्रथा बंद पाडण्याचें धोरण स्वीकारलें होतें. त्यामुळे जुन्या राजसेवकांचीं सर्व कारस्थानें निष्फल ठरूं लागलीं. त्यांच्या कोणत्याहि मोहाला बळी न पडण्याची गोमायूने खबरदारी घेतली होती. तो आपल्या वर्तनापासून ढळला नाही. त्याचें शुद्ध आचरण, निस्वार्थ वृत्ति आणि सचोटी जुन्या राजसेवकांना अधिकच जाचक होऊं लागली. त्या सर्वांनी मिळून गोमायूचा नाश करण्याचें ठरविलें.

एके दिवशीं मृगाधिपति व्याघ्रासाठी तयार करून ठेवलेले त्याच्या आवडीचें मांस, भोजनगृहांतून काढून राजसेवकांनी गोमायूच्या घरांत नेऊन ठेवलें. व्याघ्र नेहमीप्रमाणे आपल्या भोजनगृहांत गेला. तेथें त्याला मांस कोठेच दिसेना. तें कोणी तरी चोरून नेलें असावें असें त्याला एका राजसेवकाने सुचविलें. यावर संतापून व्याघ्र म्हणाला, 'तो चोर कोण आहे, त्याला शोधून काढा.' लगेच एक राजसेवक तोंडावर नम्रतेचा भाव आणून म्हणाला, 'महाराज हा चोर कोण आहे तें सर्वांना माहीत आहे. आपल्या आवडीचें मांस आपल्याच आवडत्या महामंत्र्याने चोरून नेलें आहे.'

व्याघ्र अधिकच संतापला. गोमायूच्या निंदेची ती अपूर्व संधि हेरून जुने राजसेवक म्हणूं लागले, "या गोमायूनें असाच आमचा छळ चालविला आहे तो जसा दिसतो तसा नाही. वाणीने धर्मनिष्ठ, पण स्वभावाने मात्र तो दुष्ट आहे. केवळ स्वार्थ साधण्यासाठी त्याने नम्रतेचें ढोंग चालविलें आहे. आमचें म्हणणें आपणास विश्वासार्ह वाटत नसेल तर आताच आपणास गोमायूच्या लबाडीचा पुरावा आम्ही देतों." त्या राजसेवकांनी गोमायूच्या घरांतून मांस आणून राजापुढे ठेवलें, आणि सांगितलें, "हा पाहा आपल्या महामंत्र्याचा प्रामाणिकपणा आणि राजनिष्ठा."

व्याघ्राचा संताप अनावर झाला. गोमायूशीं केलेला करार तो विसरला. 'गोमायूचा वध करा,' अशी त्याने आज्ञा केली.

सर्व प्रकार एवढ्या थराला पोहोंचल्याचें राजमातेला समजल्यावर ती तेथे आली, आणि तिने व्याघ्राला चार हिताच्या गोष्टी सांगितल्या. ती म्हणाली, "गोमायूची तुला नीट पारख झाली नाही, म्हणून तूं त्याच्यावर चोरीचा आरोप करीत आहेस. मला मात्र या सर्व प्रकारामागे कांही तरी कारस्थान असावें असें वाटतें. वाईट लोक मत्सरामुळे भल्यांना दोष देतात. लोभी लोकांना शुद्ध आचरण आवडत नाही. मूर्खांना शहाणे आणि दरिद्रयांना श्रीमान् आवडत नाहीत. कुरूप सुंदरांचा आणि मूर्ख पंडितांचा द्वेष करीत असतात. गोमायूवर आळ घेण्यापूर्वी तूं या गोष्टीचा विचार केला नाहीस. असभ्य लोकहि सभ्यासारखे दिसतात आणि सभ्यहि दिसण्यांत असभ्यासारखे असतात. आकाशाला तळ आहे असें दिसतें आणि काजवा अग्नीच्या ठिणगीप्रमाणें भासतो; पण वस्तुतः आकाशाला तळ नाही आणि काजव्यामध्येहि अग्नी नसतो. सत्ताधीशानें दुसऱ्याचा घात करण्यापूर्वी वस्तुस्थिति समजून घेतली पाहिजे. तूं गोमायूला महामंत्री केलें. त्याच्या प्रभावामुळे मांडलिक राजांमध्ये तुझा लौकिक वाढला. अशा व्यक्तीचा वध करण्यापूर्वी अनेकदा विचार करण्याची गरज आहे."

मृगराज आणि राजमाता यांचा संवाद चालला असतांना गोमायूच्या शत्रुसमुदायांतूनच एक पुरुष धिटाईने पुढे आला आणि त्याने गोमायुविरुद्ध रचलेल्या कपटकारस्थानाची साद्यंत माहिती सांगितली.

व्याघ्राला आपली चूक लक्षांत आली. त्याने गोमायूचें वर्तन शुद्ध असल्याचें घोषित केलें. त्याचा बहुमान केला. आणि जुन्या राजसेवकांना शिक्षा करण्याचें ठरविलें.

गोमायूच्या मनाचें मात्र समाधान झालें नाही. व्याघ्राच्या चंचल बुद्धीचा त्याने धिक्कार केला. यापुढे अधिकारपदावर राहावयाचें नाही असें ठरवून तो परत आपल्या निवासस्थानाकडे निघाला. व्याघ्राने पुष्कळ आग्रह केला तरी गोमायु आपल्या निश्चयापासून ढळला नाही.

गोमायु म्हणाला, "राजा तूं माझा पूर्वी बहुमान केलास आणि

नंतर अपमानहि केला. मला दुसऱ्याच्या निंदेस पात्रहि केलें. अशा स्थितींत मी यापुढे या ठिकाणी राहणें योग्य नाही. तुझ्याभोवती जे राजसेवक आहेत त्यांची तुला परीक्षा झालेली नाही. भ्रष्टाचारी, सन्मानाला हपापलेले, द्रव्याचा अपहार करणारे, अत्यंत लोभी, क्रुद्ध, लोकनिंदेला पात्र ठरलेले, प्रतारणा करणारे, असे अनेक राजसेवक तुझ्याभोवती गर्दी करून उभे आहेत. त्यांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून आणि आपला करार मोडून तूं माझा अपमान केला. माझ्यावर अविश्वास दाखविला. मलाहि तुझ्या या चंचल वर्तनाची भीति वाटूं लागली. थोडक्यांत, तूं शंकित, मी भयभीत आणि इतर राजसेवक असंतुष्ट अशी आहे एकंदर अवस्था. आपल्या विश्वासाचा भंग झाला आहे. एकदा ज्याचा भंग झाला तें पुन्हा जोडण्यास फार प्रयास पडतात. आपल्या व परकीयांच्या हिताकडे न पाहतां केवळ राजाचेंच हित पाहणारा सेवक एखादाच. स्वकार्याची अपेक्षा करणारे आणि स्वार्थ साधू इच्छिणारेच अधिक. त्यांची पारख झाली नाही तर राजाची सुरक्षितता कशी टिकणार ! माझ्यापुरतेंच सांगावयाचें तर, चंचल वृत्तीच्या राजाचा सहवास जीवघेऊ ठरण्याचा संभव असतो हें माझ्या अनुभवाला आलें आहे. कितीहि सामर्थ्यसंपन्न आणि निर्भय राजसेवक असला तरी, अशा राजाच्या सेवाकार्यांत त्याचा निभाव लागणार नाही. म्हणूनच मी अधिकाराचा त्याग करून वनांत जावयाचें ठरविलें आहे."

राजानें गोमायूची अनेक प्रकारें मनधरणी केली. पण तिचा कांही उपयोग झाला नाही.

गोमायु वनांत निघून गेला. राज्याचा कारभार पूर्वी होता तसाच पुढे चालू राहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 36308 विः निबंध
क्रमांक 9018188 नों. दि. 27.5.58

# प्रजा

धर्मराज – हे भारता, राजा आणि प्रजा यांचे संबंध कशा प्रकारचे असावेत हें समजून घेण्याची माझी तीव्र इच्छा आहे. राजाने अयोग्य वर्तन केलें; तो मद्यपान, द्यूत, स्त्रिया आणि मृगया यांत आसक्त राहूं लागला तर, प्रजेने त्याच्याशीं कसें वागावें? क्रोध आणि अधर्म यांच्या आहारीं गेलेल्या राजाविषयी प्रजेची दृष्टि कशी असावी?

भीष्म – राजा, प्रजा हेंच राज्याचें मूळ आहे. ज्याच्या राज्यांत आणि राजधानींत लोक धनधान्यसंपन्न असतात, त्याच राजाची सत्ता दृढ आहे असें समजावें. जो राजा आपल्या प्रजेशीं असत्याने वागतो त्याची शक्ति क्षीण होत असते. प्रजापालन, न्यायदान, संग्राम, धर्मसंरक्षण आणि योग्य वेळीं शत्रूविरुद्ध कारस्थान करणें या पांच गोष्टींच्या योगानेच राजा आपल्या राष्ट्राची अभिवृद्धि करूं शकतो. ज्या राजाचें वर्तन प्रजेच्या हिताविरुद्ध असेल त्याची प्रजा क्रुद्ध होते आणि प्रसंगी ती राजाचाहि नाश करते. प्रजेला कधीहि दुर्बल समजूं नये. कारण, दुर्बळ समजल्या जाणाऱ्यांच्या दृष्टिपातानेहि राजा दग्ध होऊन जातो.

ध्रुव वंशांत वेन नांवाचा राजा होऊन गेला. तो प्रजेचें हितरक्षण करण्यास समर्थ नव्हता. आपल्या प्रजेला गुलामाप्रमाणे वागविण्यांत त्याला आनंद होत असे. अत्याचार करणारा राजा आणि असंतुष्ट मनाची प्रजा यामुळे राज्यांत चोर आणि लुटारू यांचें थैमान सुरू झालें. सर्वत्र अराजक माजलें. प्रजेची सुरक्षिततेची भावना नष्ट झाली. मोठ्या माशाने लहान माशांना खाऊन टाकावें, त्याप्रमाणे समाजांतील सबल लोक दुर्बलांचा नाश करूं लागले. त्या भयभीत अवस्थेंतून बाहेर कसें पडावें हें लोकांना कळेना. धनधान्य नाही, उपजीविकेचें साधन नाही, सुरक्षिततेची शाश्वति नाही आणि राजाच्या वर्तनाविषयी अनुमानहि करतां येत नाही. अशा विपरीत परिस्थितींत प्रजा सापडली.

वेन राजा आपल्या विलासांत दंग होता. त्याला दंडनीतीचें ज्ञान नव्हतें आणि प्रजेच्या क्लेशाचीहि कल्पना नव्हती.

राजाच्या अशा वर्तनाने सर्व प्रजा संतप्त झाली. सर्व आचार्य आणि अमात्य क्रोधाविष्ट झाले. राजा नष्ट झाल्याशिवाय प्रजेला सुख लाभणार नाही याविषयी त्यांची खात्री होऊन चुकली. ते म्हणूं लागले, “प्रजेवर दोन्हीकडून मोठें संकट ओढवलें आहे. लाकूड दोन्ही टोकांकडून पेटूं लागलें असतां, मध्ये सापडलेल्या किडेमुंग्यांची जी अवस्था होते तीच अवस्था प्रजेची झाली आहे. एकीकडून दुष्ट, चोर आणि दुसरीकडून स्वतः राजा यांच्यामध्ये प्रजा सापडली आहे. काय चमत्कारिक प्रसंग आहे पाहा! कोणी राजा नसला म्हणजे राष्ट्राला भय उत्पन्न होते. म्हणून आम्हीच या वेनाला, तो अयोग्य असतांहि राजा केलें. आणि तोच आता प्रजेला भय दाखवूं लागला आहे. तेव्हा प्रजेला सुख कसें मिळावें? दूध पाजून सर्पाचें पोषण करणें जसें पोषकाला घातक होतें, तसा स्वभावतःच दुष्ट असलेला हा सुनीथा राणीचा पुत्र वेन आम्हाला घातक झाला आहे.”

अशा प्रजाघातक्याचा वध करण्याशिवाय दुसरा मार्गच उरला नाही.

प्रथम ब्रह्मवादी मुनींनी अभिमंत्रण केलेल्या दर्भांचा वेन राजावर मारा केला. त्यापाठोपाठ प्रक्षुब्ध प्रजेनेहि अनेकविध प्रहार केले.

संतप्त प्रजेपुढे राजा हतबल झाला. त्याची प्रतिकारशक्तीच नष्ट झाली. शेवटी त्यांतच त्याचा अंत झाला. प्रजेच्या क्षोभाला तो बळी पडला. ◆

# राज्य

वेनपुत्र पृथूच्या राज्याभिषेकाचा तो भव्य समारंभ.

राजा पृथु सुवर्णमय आसनावर पूर्वाभिमुख बसला होता. सर्व आयुधांनिशीं सिंहासनावर आरूढ झालेली त्याची देदीप्यमान मूर्ति प्रजेच्या आकांक्षा वाढवीत होती. अमात्य आणि आचार्य यांनीहि यथायोग्य आसनें भूषविलीं होतीं. राजकुलांतील स्त्री-पुरुष, कोणी रत्नमय तर कोणी हस्तिदंती आसनांवर विराजमान झालेले होते. महर्षि आणि महामुनि, कवि आणि कलावंत, मांडलिक आणि मुखंड अशी विविध मंडळी आपापल्या योग्यतेनुरूप स्थानापन्न झाली होती.

राजप्रासाद प्रजाजनांच्या उत्साहाने फुलून गेला होता. मंगल वाद्यांचे सुस्वर सुरू झाले. राजपुरोहितांनी मंत्रघोष सुरू केला. सुगंध आणि सुस्वर यांनी सर्व वातावरण चैतन्यमय बनलें.

पृथूचें राजसिंहासन अग्नीप्रमाणे तेजस्वी दिसत होतें. त्याचे पाय बळकट होते आणि त्यावर व्याघ्रचर्म आच्छादलें होतें. ज्ञानसंपन्न आचार्यांनी पृथूला त्या शुभ्रवर्ण आसनावर बसवून मंत्रोच्चारपूर्वक अनेक विधि केले. पवित्र सरितांच्या जलाने त्याला अभिषेक केला. पणव, आनक,

दुंदुभि इत्यादि विविध वाद्यांचा घोष चालूच होता आणि 'तुझें कल्याण होवो,' 'तुझा जय होवो,' अशीं आशीर्वादपर वचनें ऐकूं येत होतीं. त्या वेळीं पृथूचें मुख तेजस्वी आणि आल्हादकारक दिसूं लागलें.

राज्याभिषेकाचा समारंभ पार पडला. त्या वेळीं प्रजा प्रसन्न होती आणि राजा प्रजापालनाचीं अनेक कल्पनाचित्रें पाहत होता. तेवढ्यांत राजाला मानपत्र अर्पण करण्याची कल्पना कांही मुत्सद्द्यांनी व्यक्त केली. प्रथम त्या कल्पनेला पृथूने विरोध दर्शविला. पण नंतर प्रजेच्या अग्रहास्तव तें स्वीकारण्याचें मान्य केलें.

मानपत्र अर्पण करतांना स्तुतिस्तोत्रें गाण्यांत येऊं लागलीं. प्रशंसापर उद्गारांची गर्दी झाली. 'हे राजा, तूं महाप्रतापी आहेस. तुझी प्रजाहितदक्षबुद्धि, तुझें शौर्य, तुझें .....'

'थांबा,' पृथूनें एकदम आज्ञा केली. 'आचार्यांनो आणि मुत्सद्द्यांनो, ही प्रशंसा थांबवा. तुम्ही ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहा, पण अशीं स्तुतिस्तोत्रें तुम्ही कां गात आहांत हें मात्र मला समजत नाही. माझा नुकताच राज्याभिषेक झाला. प्रजेसाठी कोणतेंहि कार्य करण्याची अद्याप मला संधि मिळालेली नाही. त्यामुळे प्रजाहितदक्ष अशी बिरुदावलि मला लावणें योग्य ठरणार नाही. ही प्रशंसा थांबवा. थोर गुण संपादण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं आहे; पण त्यांचा प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय स्तुति करून घेणें मला योग्य वाटत नाही. आता गुण नाहीत, पण पुढे केव्हा तरी ते लाभतील अशा खोट्या कल्पनेने अल्पबुद्धि माणूस सहज फसूं शकेल. आपली अधिकाधिक प्रशंसा व्हावी अशीहि तो अपेक्षा करील. अशा खोट्या प्रशंसेने आपला उपहास होतो, हेंहि त्याला कळत नसते. पण, जे समर्थ असतात, ते प्रसिद्ध असले तरी त्यांना स्वतःची स्तुति आवडत नाही. आपल्या निंदेस पात्र होईल असें कृत्य ते करीत नाहीत. म्हणून, मुत्सद्द्यांनो, माझी प्रशंसा करूं नका.'

प्रथुराजाची ही धीरोदात्तता आणि निःस्पृहता प्रजेला अत्यंत आदरणीय वाटली.

प्रथूने पृथ्वीचें विषम स्वरूप नाहीसें केलें. भूमीवरील उंचवटे आपल्या तीक्ष्ण बाणांनी छेदून टाकले. पृथ्वीचें दोहन करून अनेक

धान्यांचीं बीजें उत्पन्न केलीं. कृषिव्यवसाय सुरू केला. नगरें आणि ग्रामें यांची स्थापना केली. त्याचा महापराक्रम पाहून पृथ्वी त्याला शरण गेली. सागर आणि हिमालय यांनीहि आपली संपत्ति त्याच्या स्वाधीन केली. धनधान्याची समृद्धि झाली. प्रथूने अश्व, गज, रथ आणि पुरुष यांची चतुरंग सेना उभारली. त्याच्या ध्वजाचा भंग कधीच झाला नाही. त्याच्या राज्यांत दुर्भिक्ष पडलें नाही. प्रजेला परस्परांची भीति वाटली नाही.

पृथूने प्रजेचें संकटापासून संरक्षण केलें म्हणून त्याला क्षत्रिय असें म्हणतात. त्याने प्रजेचें रंजन केलें म्हणूनच त्याला राजा असें म्हणतात. त्याने दंडनीतीच्या साहाय्याने राज्य केलें, तसेंच हेरांच्या मदतीने प्रजेच्या वर्तनावर लक्ष ठेवलें. त्याने शत्रूच्या सर्व मार्गांवर आपल्या सैन्याने तटबंदी केली. त्याने यज्ञ केले आणि संग्रामामध्ये जय मिळविला.

पृथुराजाच्या पराक्रमाचा पृथ्वीला चांगलाच प्रत्यय आला होता. ती पृथूला म्हणाली, 'हे राजा, प्रजापालन करणे हेंच राजाला कल्याणकारक आहे. प्रजेचें रक्षण न करतां तिच्यापासून कर मात्र घेतो, अशा राजाला त्याच्या कृतकर्मांचीं फळें तर भोगावीं लागतातच, पण प्रजेने केलेल्या दुष्कर्मांचींहि फळें त्यालाच भोगणें अपरिहार्य असतें. हे शूर राजा, प्रजेचें कल्याण करणें हा जो तुझा धर्म, तो तूं नष्ट होऊं देऊं नको.'

पृथूच्या राज्यांत भूमि नांगरल्यावांचून पीक देत होती. आणि धेनु विपुल दूध पुरवीत होत्या. प्रजा निरोगी होती, तशीच निर्भयहि होती.

पृथूच्या संबंधामुळेच या विस्तीर्ण भूमीला पृथ्वी असें नांव मिळालें.

मनुष्याने स्थापन केलेलें तेंच पहिलें राज्य.

# क्रान्ति

धर्मराज– पितामह, राजधर्मांचीं अनेक तत्त्वें आपण मला निवदन केलीं. सर्वसामान्य परिस्थितींत आपलीं तत्त्वें आणि आपण सुचविलेले मार्ग निःसंशय फलदायक ठरतील! पण जीवनांत कांही आपद्प्रसंगहि येतात. राजाच्या जीवनांत तर असे किती तरी प्रसंग येतील! राज्यांत अराजक माजलें आणि लोक अधर्माने वागूं लागले; तसेच प्रजेचा एकमेकांवरील विश्वास उडाला आणि सर्व लोक भीतिग्रस्त झाले, तर अशा वेळीं चांगल्या लोकांनी कसें वागावें हें मला समजून घ्यावयाचें आहे. राज्यांत असे आपद्प्रसंग कांही वेळां उद्भवतात. सर्व देश असंतोषाने पेटून जातो. लोक अधर्माला धर्म मानूं लागतात. विद्या नष्ट होऊं लागते. उपजीविकेचीं साधनें दस्यूंच्या हातीं जातात. पाऊस पडेनासा होतो. लोकांची दानत बिघडून जाते. अशा वेळीं विद्यासंपन्न लोकांनी उपजीविकेसाठी कोणता मार्ग पत्करावा? तसेंच सर्व लोक कलुषित होऊन गेले असतां राजाने आपलें वर्तन कसें ठेवावें? धर्म आणि अर्थ ह्यांचें रक्षण करण्यासाठी अशा आपद्कालीं कोणता धर्म स्वीकारावा?

भीष्माचार्य– तुझा प्रश्न महत्त्वाचा आहे. नेहमीच्या परिस्थितींतील धर्म आणि आपद्धर्म यांत फरक केला पाहिजे. वस्तुतः प्रजेच्या व्याधींचें आणि भीतीचें मुख्य कारण राजाच असतो. वर्षाकालीं निसर्ग प्रफुल्लित राहणें राजाच्या पुण्याईवरच अवलंबून असतें. तरी पण प्रजेमध्ये दोष उत्पन्न करणारा अराजकाचा काळ उत्पन्न झाला तर मनुष्याने अशा वेळीं बुद्धि आणि सामर्थ्य यांचा उपयोग करून प्रथम आपले प्राण वांचवावेत. हा आपद्धर्म आहे. पण आपत्कालीं त्याचेंच पालन केलें पाहिजे. यासंबंधीं तुला विश्वामित्र आणि चांडाल यांची कथा सांगतों. त्यावरून आपद्धर्म कशाला म्हणावयाचें हें तुझ्या लक्षांत येईल !

* * *

फार प्राचीन काळीं एकदा सतत बारा वर्षें भयंकर अवर्षण पडलें. सर्वत्र प्रलयकालच ओढवला. पर्जन्यवृष्टि झाली नाही. नद्यांचीं पात्रें शुष्क झालीं. सरोवरांचें सौंदर्य नष्ट झालें. पाणपोया बंद पडल्या. यज्ञकुंडें थंडावलीं. ऋषींचे आश्रम उध्वस्त झाले. अध्ययन आणि अध्यापन बंद पडलें. मंगलकार्यें संपलीं. लोकांचे देह अस्थिपंजर दिसूं लागले. भूक आणि तहान यांनी सर्वत्र थैमान घातलें. मग शेती आणि गोरक्षण कोण करणार? आणि वस्तूंचा क्रयविक्रय तरी कसा होणार ? ग्राम आणि नगरें ओस पडलीं. उत्सवसमारंभ नाहींसे झाले. सारांश, पृथ्वीवर जिकडे तिकडे मृत्यु आणि भीति, व्याधि आणि अराजक यांनीच आपली सत्ता प्रस्थापित केली. समाजांतून देवता निघून गेल्या. अनुभवी लोक गेले. गाई नष्ट झाल्या. विद्वानांचा वध झाला. कोणी कोणाचा संरक्षणकर्ता उरला नाही. जणूं काय समाजांतील संरक्षणक्रियाच नष्ट झाली. लोक एकमेकांना खाऊं लागले. ऋषि देखील नीतिनियमांचा त्याग करून इतस्ततः भटकूं लागले.

अशा त्या भयदग्ध आणि प्रक्षुब्ध कालखंडांत महर्षि विश्वामित्र भुकेने व्याकुळ होऊन वाट फुटेल तिकडे फिरूं लागले. त्यांनी आपली कुटुंबीय मंडळी एका जनसमुदायांत सोडून दिली. अग्नि आणि आश्रम या

दोन महान् साधनांचा त्यांनी त्याग केला. पोटाला दोन घास मिळविण्यासाठी अरण्यांत त्यांची भ्रमंती सुरू झाली. भक्ष्य आणि अभक्ष्य यांतील तारतम्य सुटलें.

असेंच भटकत भटकत विश्वामित्र चांडालांच्या एका वस्तीजवळ पोंचले. तेथील दृश्य अतिशय भयानक होतें. चांडालांच्या झोंपड्यांभोवती अनेक प्राण्यांचे छिन्नविच्छिन्न तुकडे विखुरलेले होते. त्यांतच मातीच्या भांड्यांचे आणि हाडांचे तुकडे मिसळलेले होते. प्राण्यांच्या कवट्या आणि जबडे यामुळे तें दृश्य अधिकच भेसूर बनलें होतें.

चांडालांच्या झोपड्यांना सर्पांच्या कातीच्या माळा लावलेल्या होत्या. कुक्कुटांचा कचकच होणारा आवाज आणि गर्दभांचें कर्णकटु ओरडणें यांनी त्या वस्तीचें वातावरण अनेक पटींनी भेसूर बनविलें होतें. वस्तींत राहणारे चांडाल एकमेकांशीं अद्वातद्वा बोलत होते. आणि त्यांच्या स्त्रियांचा कठोर कलकलाट चालू होता. कुत्र्यांचें भुंकणें आणि दिवाभितांचे घूत्कार यामुळें तें स्थान अवर्षणाचें प्रतीक बनलें होतें.

अशा या भेसूर चांडाल वस्तीजवळ भुकेमुळे बेभान बनलेला महर्षि विश्वामित्र पोहोंचला. त्याला भुकेशिवाय कांहीहि सुचत नव्हतें. तो भक्ष्याचा शोध करूं लागला. त्याने त्या चांडाल वस्तींत भिक्षाहि मागितली. पण त्याला कांहीहि मिळालें नाही. एवढा ज्ञानसंपन्न ऋषि पण क्षुधेपुढे शरणागत झाला. आता आपल्यावर मृत्यूचें संकट कोसळणार अशी त्याला भीति वाटूं लागली. त्याचें शरीर दुर्बल बनलें आणि मनानेहि तो दुर्बल झाला. तशाच विकल मनःस्थितींत त्याने एका चांडालाच्या झोपडींत चोरून प्रवेश केला. तो एका कोपऱ्यांत लपून बसला. त्या वेळीं त्याच्या मनांत नाना प्रकारचे विचार येऊं लागले. 'आता आपण काय करावें ? काय केलें असतां आपणांस व्यर्थ मृत्युमुखीं पडावें लागणार नाही ?' त्याच्या मनांत विचारांचा कल्लोळ उठला. एकीकडे क्षुधेने त्याच्या पोटांतील आंतडी तुटत होती आणि दुसरीकडे त्याच्या डोक्यांत नीति-अनीतीच्या विचारांचा संघर्ष चालू होता. कोणत्याच मार्गांनी त्याला अन्न मिळण्याची शक्यता उरली नाही. भूमीवर पडल्यापडल्या त्याचे उलटसुलट विचार चालू होते.

रात्रीची वेळ होती. सर्वत्र सामसूम झाली. चांडालाच्या झोपडींत अंधार पसरला होता. विश्वामित्राचें डोकें विचारांनी भणाणून गेलें. एवढ्यांत त्याला त्या झोपडींत श्वानाचें मांस बांधून ठेवलेली एक लांब दोरी दिसली. त्या मांसाची चोरी करावी काय ?

पुन्हा त्याच्या मनांत झगडा सुरू झाला. 'मांसाच्या तुकड्यासाठी आपल्यासारख्या महर्षीला चोरी करणें कितपत शोभेल ?' शेवटी त्याने चोरी करण्याचा निर्णय घेतला. कारण त्यावांचून प्राणरक्षणाचा दुसरा मार्गच राहिला नाही. आपद्‌कालीं चोरी करणें विहित आहे. विशेषतः पंडितांनी प्राणसंरक्षणासाठी तें अवश्य करावें असा सिद्धान्त आहे. त्याने प्रथम खालच्या जातींतील पुरुषाकडून द्रव्यग्रहण करावें. त्याच्याकडून न मिळाल्यास आपल्याहून अधिक योग्यतेच्या अशा धार्मिक पुरुषाकडून तें मिळवावें. तेव्हा पहिला मार्ग स्वीकारावयाचा म्हणजे या चांडालाच्या घरांत असणारें हें श्वानाचें जांघाड हरण केलें पाहिजे.

चोरी करून भक्ष्य मिळविण्याचा विश्वामित्राचा निश्चय कायम झाला. तोंपर्यंत झोपडींतील सर्व लोक झोपीं गेले. रात्र पुष्कळ झाली होती. चांडालहि झोपीं गेल्यासारखा दिसत होता. विश्वामित्राने हळूच हात पुढे करून ती दोरी हातांत घेतली.

तो त्या मांसखंडाला हात लावणार तोंच तो चांडाल जागा झाला. तो क्रूर आणि कुरूप चांडाल मोठ्याने ओरडून म्हणाला, 'माझ्या घरां-तील सर्व लोक झोपीं गेले असतां मांसाच्या तुकड्याला कोण चोरून नेत आहे ? पण याद राख. मी जागा आहे. त्या मांसाला हात लावलास तर तत्काल ठार करीन.'

चांडालाचें तें कठोर भाषण ऐकून विश्वामित्र मनांत चरकला. उद्विग्न झाला. लज्जेमुळे त्याचें तोंड काळवंडून गेलें. तो चांडालाला म्हणाला, 'मी विश्वामित्र आहें. भुकेनें अतिशय व्याकुल झालों आहे आणि हें मांस चोरून नेण्यास प्रवृत्त झालों आहे. योग्य कोणतें आणि अयोग्य कोणतें, याचें तुला ज्ञान असेल तर तूं माझा वध करूं नकोस. तूं सुहृद आहेस.'

महर्षींचें भाषण ऐकून तो चांडाल ताड्कन् शय्येवरून उठला आणि विश्वामित्रापुढे जाऊन उभा राहिला. विश्वामित्राबद्दल त्याच्या मनांत

आदर होता. अश्रु ढाळीत व हात जोडून तो म्हणाला, 'हे ब्रह्मनिष्ठ ! एवढ्या काळोख्या रात्रीं आपण काय करूं इच्छितां !'

विश्वामित्र – मी अत्यंत भुकेला आहे. माझे प्राण जाऊं पाहात आहेत. म्हणून मी श्वानाची ही जांघ हरण करणार आहे. भुकेच्या पोटीं मला हें पापकर्म करावें लागत आहे. भक्ष्याच्या मोहामुळे माझी लज्जा नाहीशी झाली आहे. सारांश, ही क्षुधाच माझ्याकडून हा दोष घडवीत आहे. माझी श्रवणशक्ति नाहीशी झाली, बल नाहीसें झालें आणि बुद्धीचाहि नाश झाला. त्यामुळे मला भक्ष्य आणि अभक्ष्य यांचा विचार राहिला नाही म्हणूनच चोरी करणें हा अधर्म आहे, हें मला कळत असूनहि श्वानाची तंगडी हरण करीत आहे. मी प्रथम तुमच्या वस्तींतून भिक्षा मागत फिरलों, पण कोणीहि भिक्षा घातली नाही. तेव्हा हें पाप करण्याचें माझ्या मनांत आलें. अशा वेळीं जें मिळेल तें ग्रहण करणें हें धर्मदृष्ट्या योग्य आहे असें तूं समज.

चांडाल – महर्षि, माझें थोडें ऐका आणि ज्या योगाने धर्महानि होणार नाही तेंच करा. मी आपणाला धर्म सांगतों तो ऐका. चांडालाची वस्तु आणि तीहि अभक्ष्य. ती हरण करणें धर्मदृष्ट्या निंद्य आहे. त्यांतहि श्वानाची तंगडी ही एक अत्यंत निकृष्ट प्रतीची वस्तु आहे. तेव्हा तुम्ही स्वीकारलेला मार्ग योग्य नाही. तो सोडून द्या. आणि प्राणसंरक्षणाचा दुसरा एखादा मार्ग स्वीकारा. मांसाच्या लोभामुळे आपल्या तपश्चर्येचें तेज नष्ट होईल. आपल्यासारख्या ज्ञानसंपन्न माणसाने धर्माचें आचरण केलें पाहिजे. आपण धर्मश्रेष्ठ आहांत तेव्हा असा धर्मत्याग करूं नका.

विश्वामित्र – मी उपाशी आहें आणि जीव वांचविण्याचा दुसरा मार्ग मला सुचत नाही. अशा प्रसंगीं जो मार्ग सांपडेल त्याचा अवलंब करून मनुष्याने आपले प्राण वांचवावे व सामर्थ्य आल्यानंतर धर्माचें आचरण करावें. वेदरूपी अग्नि हेंच माझें सामर्थ्य आहे. अर्थात् त्याच्या साहाय्याने मला या पापाचा नाश करतां येईल. पण त्यासाठी प्रथम क्षुधा थांबविण्यासाठी जें जें करणें शक्य आहे तें उपेक्षा न करतां मी करीन. कारण मरणापेक्षा जिवंत राहणें आधिक श्रेयस्कर

आहे. प्राण वांचला तरच धर्म संपादन करतां येईल. जिवंत राहण्याच्या इच्छेनेच मी बुद्धिपुरस्सर हा मार्ग स्वीकारला आहे. याला तूं अनुमति दे. नंतर मी तपश्चर्या आणि विद्या यांच्या साहाय्याने सर्व पातकांचा नाश करीन. प्रकाशाने महाभयंकर अंधारहि तत्काळ नष्ट होतो.

चांडाल – हें मांस भक्षण केल्याने आयुष्य वाढणार नाही, बलप्राप्ति होणार नाही आणि मनाची तृप्तीहि होणार नाही. म्हणून आपण हा मोह आवरा. श्वान भक्षण करणें ब्राह्मणाला योग्य नाही व क्षत्रियालाहि योग्य नाही. आपण कोणती तरी दुसरी इच्छा सांगा.

विश्वामित्र – अशा दुर्भिक्षामध्ये दुसरें मांस मिळणें शक्य नाही. माझ्याजवळ द्रव्यहि नाही. मी क्षुधाक्रान्त झालों आहे. निराश आणि निरुपाय झालों आहे. म्हणूनच या कुत्र्याच्या जांघेंत उत्कृष्ट रसपूर्ण मांस आहे असें मला वाटतें.

चांडाल – पण अजूनहि आपण अधर्म स्वीकारीत आहां असें मला वाटतें.

विश्वामित्र – पूर्वी अगस्त्य मुनीने क्षुधाक्रान्त असतां वातापि नांवाचा राक्षसहि भक्षण केला होता. त्याचप्रमाणे मी या आपत्तींत श्वानाचें मांस खाणार !

चांडाल – हें कृत्य करणें आपणाला योग्य नाही. एवढ्यावरहि तसें योग्य वाटत असेल तर ही कुत्र्याची तंगडी घेऊन खुशाल जा. पण हा धर्म नव्हे एवढें मात्र खास.

विश्वामित्र – चांडाला, धर्म आणि अधर्म हें कोण ठरवितो ? तें ठरविण्याचें साधन समाजांतील शिष्ट लोकच असतात. मीहि त्यांचाच मार्ग अनुसरत आहे. क्षुधेच्या काळीं हेंच करणें योग्य आहे असें मला वाटतें.

चांडाल – असज्जनांनी जो मार्ग स्वीकारला असेल तो कांही सनातन मार्ग होऊं शकत नाही. प्रसंग कसाहि असो आणि काळ कितीहि खडतर येवो; दुष्कर्म करणें कधीच समर्थनीय ठरत नाही. म्हणून कोणत्याहि मिषाने असो आपण हा मार्ग पत्करूं नये.

विश्वामित्र – खरें पाहतां, ऋषि पातक करूं शकत नाहीत. शिवाय पशुत्वाच्याच दृष्टीने पाहिलें तर श्वान आणि मृग यांत तरी तरतम

बाळगण्याची काय गरज असावी ? माझ्या दृष्टीने दोन्हींची पातळी एकच.

चांडाल – तुमच्यासारख्या ज्ञानसंपन्नाला मी अधिक काय सांगणार ? जीविताचा त्याग झाला तरी तो खुशाल होऊं द्यावा, पण अभक्ष्य भक्षण करावयाचें मनांत येऊं नये असें मला वाटतें. तेव्हा भुकेलेल्या अवस्थेंत तुम्ही प्राण सोडा. पण असलें दुष्कर्म मात्र करूं नका.

विश्वामित्र– मृत्यूच येणार तर तो अभक्ष्य भक्षण न करतां येणें अधिक श्रेयस्कर. पण जिवंत स्थितींत असतां उपाशी राहण्याने मात्र धर्मलोप होईल. शिवाय तुझ्या म्हणण्याप्रमाणे या घटनेने पाप होतच असेल तर तें नाहींसें करणें केव्हाहि शक्य आहे. पण शरीरच नष्ट झालें तर मग कसलें पाप आणि कसलें पुण्य ! उपाशी राहिल्यास ज्ञान नष्ट होईल. आणि तसें होऊं देणें हेंच मुळी पापजनक आहे. मन हें अन्नमय आहे. अन्न भक्षण न केल्यास अध्ययन केलेल्या विद्यांचेंहि स्मरण होत नाही.

चांडाल– आपल्या म्हणण्याचा आशय मी समजूं शकतों. पण आपण केलेलें समर्थन मात्र मला पटूं शकत नाही.

चांडालाने एवढें निक्षून सांगितल्यावर विश्वामित्राने आपल्या प्रतिपादनाचा रोख बदलला. त्याने आपल्या उच्चाधिकाराचा आश्रय घेऊन चांडालास दमदाटी द्यावयास सुरुवात केली.

विश्वामित्र- अरे जा ! तुझ्या ओरडण्याने मी आपल्या निश्चयापासून मुळीच ढळणार नाही. तुला धर्माविषयी विचार करण्याचा कांहीहि अधिकार नाही. तूं स्वतःची प्रशंसा करूं नकोस.

चांडाल– मित्र या नात्याने आपणास उपदेश करीत आहे. मला आपली फार कींव येते. आपणाला माझें म्हणणें श्रेयस्कर वाटलें तर तें आपण अवश्य करा. पण केवळ लोभामुळे कांही तरी अयोग्य करण्यास तयार होऊं नका.

विश्वामित्र– माझे धर्म कोणते आहेत याची मला चांगली कल्पना आहे. तेव्हा ही श्वानाची जांघ सोडून दे.

चांडाल– पण तसें केल्यानें देणारा मी व घेणारे आपण असे दोघेहि दोषी ठरूं.

विश्वामित्र– आज मी हें पापकर्म केलें आणि जगलों तर पुढे अधिक पुण्यकारक आचरण करीन. अधिक सत्कर्में करीन. त्यामुळे माझें अन्तःकरण शुद्ध होऊन मला धर्मप्राप्ति होईल. मग आता तूंच सांग पाहूं की अभक्ष्य भक्षण करुन जगणें श्रेष्ठ कीं मरणें श्रेष्ठ?

चांडाल– इतक्या थराला गोष्टी गेल्यानंतर मी काय सांगणार? श्वानाचें मांस भक्षण करावयास योग्य आहे असें जो समजतो त्याला या जगांत त्याज्य असें कांहीहि राहिलेलें नाही, असें मला वाटतें.

विश्वामित्र– जी गोष्ट स्वीकारणें अयोग्य आहे अशा गोष्टीचा अंगीकार करणें, आणि जी वस्तु भक्षण करण्यास अयोग्य आहे ती भक्षण करणें यांत दोष आहे हें खरें, पण प्राणरक्षणासाठी तो दोष पत्करणेंहि अपवादभूत आहे. म्हणूनच अशा प्रसंगीं केलेली हिंसा ही हिंसा होत नाही. आणि असत्य भाषणहि असत्य ठरत नाही.

चांडाल– प्राणसंरक्षण करणें हाच केवळ आपला एकमेव हेतु असेल तर आपल्याला धर्म समजला नाही असेंच म्हटलें पाहिजे.

विश्वामित्र- अशा प्रसंगीं अभक्ष्य भक्षण करणें हें महापातक आहे असें मला वाटत नाही. मद्य प्राशन करणारा पतित होतो असें शास्त्र आहे. पण ती केवळ आज्ञा आहे. प्रसंगविशेषीं एखादें पातक केलें म्हणून त्यापूर्वी केलेल्या धर्माचरणाचा नाश होतो असें नाही.

चांडाल– ठीक आहे तर! मी या पातकांतून मुक्त आहें. मला त्याचा कांहीहि दोष लागणार नाही. त्याची सर्व जबाबदारी आपणावरच आहे. मला मात्र निश्चित असें वाटतें की अभक्ष्य व तेंहि निंद्य प्रदेशांतून, निंद्य कर्माने आणि निंद्य मनुष्याकडून मिळविल्यास तें सदाचारसंपन्न आणि विद्वान् यांना पीडा देतें.

चांडाल एवढें बोलला आणि खिन्न होऊन स्तब्ध बसला. त्याच्या मनांतील वेदना चेहऱ्यावर स्पष्ट उमटल्या होत्या.

आणि त्याच वेळीं महान् बुद्धिसंपन्न आणि सामर्थ्यशाली पण भुकेनें पिडलेल्या त्या महर्षि विश्वामित्राने श्वानाची जांघ हरण केली. आणि तो तडक तेथून निघून गेला.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 36308 वि: निबंध
क्रमांक 9018188 नों दि 2858

# शान्तिपर्वांतील राजधर्म

**विषयांचा अनुक्रम**

उदात्त राजनीति– निवेदनपद्धतींतील गुणदोष– राजसत्तेचें समर्थन– राजधर्म म्हणजे प्रजापालन– सामर्थ्याचें प्रतीक : दण्ड– राजाची उत्पत्ति– देवतास्वरूप राजा– राजा आणि प्रजेचा करार– अराजक अवस्था– राजसत्तेची अपरिहार्यता– राजा आणि प्रजा– कोष आणि कोषवृद्धि– राष्ट्राचें सामर्थ्य आणि कोष– कराचें ओझें– राजा आणि राजनीति– राजांचा सनातन धर्म– राजाचे गुणधर्म– आपत्कालांतील राजनीति– शत्रुपक्षाविषयीं धोरण– परकीय प्रजेशीं वर्तन– अनेक शत्रूंशीं सामना– राजा आणि राजसेवक– अमात्याचे गुणदोष– गुप्त हेरांचें महत्त्व– सेवकांशीं वागणूक– शासनव्यवस्था– राजानेच न्याय द्यावा– परराज्यविषयक धोरण– धर्मापेक्षा सामर्थ्य श्रेष्ठ– मूल्यमापन.

● ●

### उदात्त राज्यनीति

भारतीय राज्यनीतीच्या इतिहासांत शांतिपर्वाचें स्थान अद्वितीय आहे. त्यांतील राजधर्माचें विवेचन उदात्त, व्यापक आणि विविध स्वरूपाचें आहे. राजकीय तत्त्वज्ञानाचीं मूलभूत तत्त्वें त्यांत प्रतिपादन केलीं आहेत, तशींच प्रत्यक्ष राजकीय व्यवहाराचीं आणि राज्यकारभाराचीं अनेक महत्त्वाचीं सूत्रेंहि सांगून ठेवलीं आहेत. त्यामुळे राज्यनीतिविषयक साहित्यांत शांतिपर्वाचें वैशिष्ट्य अनन्यसाधारण आहे. त्यांतील केवळ विषयांची विविधता लक्षांत घेतली तरी हें विधान सहज पटण्यासारखें आहे.

### निवेदनपद्धतींतील गुणदोष

राजधर्माच्या चर्चेंत, राजाला महत्त्वाचें स्थान दिलेलें आहे. किंबहुना सर्व चर्चेंचा केंद्रबिंदु राजाच आहे. त्याच्याभोंवतीच विचारांचीं सर्व सूत्रें विणलेलीं आहेत. राजाची उत्पत्ति, आवश्यकता, प्रतिष्ठा, कर्तव्यें, वैयक्तिक गुणावगुण इत्यादि विषयांना प्राधान्य दिलेलें आहे. अर्थात् याच विषयांना पूरक व पोषक होतील अशा विषयांचें विवेचन होणेंहि अपरिहार्य आहे. या विषयांत राजधर्माच्या चर्चेला प्रमुख स्थान मिळालें आहे. तसेच दण्ड आणि दण्डनीति अमात्य आणि राजसेवक, करपद्धति आाणि कोषसंचय राष्ट्राचें रक्षण आणि संवर्धन राजधानीची रचना आणि शासनपद्धति प्रजेचे गुणधर्म आणि कर्तव्यें इत्यादि विषयांचा परामर्शहि घेतलेला आहे. हें सर्व विवेचन सुसूत्र झालेलें आहे असें मात्र म्हणतां येणार नाही. अनेक ठिकाणी मूळ विषयाचें स्पष्टीकरण करीत असतांनाच त्याला अगदी भिन्न दिशा लागल्याचींहि उदाहरणें आहेत. त्यामुळे अनेकदा विसंगति, पुनरुक्ति, पाल्हाळ यांसारखे दोष उत्पन्न झाले आहेत. अनावश्यक फाफटपसारा तर त्यामुळे वाढलाच, पण कांही ठिकाणी विषयाचें गांभीर्यहि कमी झालें आहे. एखादें महत्त्वाचें सूत्र सांगत असतांना अत्यंत क्षुल्लक असा प्रसंगहि त्यांत वर्णन केला जावा आणि मग मूळ विषयाची पकड ढिली पडावी असे प्रसंगहि पुष्कळ आढळतात. पण निवेदनपद्धतींतील

हे दोष बाजूला सारून विवेचनाचें मुख्य उद्दिष्ट शोधण्याचा प्रयत्न केला तर मात्र राज्यनीतीचीं सुंदर सूत्रें हातीं लागतात यांत शंका नाही.

## राजसत्तेचें समर्थन

शांतिपर्वांतील राजधर्मांत राजा आणि राजसत्ता यांच्यासंबंधीच्या विवेचनावरच मुख्य भर दिलेला आहे, असें वर म्हटलेंच आहे– आणि शांतिपर्वाच्या रचनेचा काळ लक्षांत घेतां, त्याची संगति लागणें कठीण नाही. शांतिपर्वाचा रचनाकाळ इ. पूर्व पांचवें किंवा चौथें शतक मानला जातो. त्या काळांत, किंबहुना त्यापूर्वीच गणराज्यांना ओहोटी लागली होती. अंतर्गत फाटाफूट आणि दुही यांच्यामुळे गणराज्यें दुर्बल आणि विस्कळीत बनूं लागलीं. त्यांतच परकीय आक्रमणाच्या तडाख्यामुळे त्यांचें सामर्थ्य अधिकच नष्ट होऊं लागलें. या दोहींचा परिणाम म्हणजे परक्यापुढे शरणागति आणि अंतर्गत अराजक. गणसत्तेला या दोन व्याधींनी दुर्बल केलेलें होतें. अशा परिस्थितींत सत्तेचें केंद्र एकतंत्रीय असावें आणि प्रजेने या सत्तेच्या अधीन राहावें अशी विचारसरणी बळावत जाणें स्वाभाविक होतें. एकहाती कारभार अधिक कार्यक्षम ठरतो असा सर्वसामान्य अनुभवहि येऊं लागला. त्यामुळे गणसत्तेचा अस्त आणि राजसत्तेची दृढता अशी प्रक्रिया शांतिपर्वाच्या रचनाकाळापूर्वीच सुरू झाली होती. अशा परिस्थितींत शांतिपर्वांतील राजधर्माचें निरूपण करण्यांत आलें आहे. त्याची प्रामुख्याने दोन उद्दिष्टें होतीं: राजसत्तेचें समर्थन करणें आणि त्यासाठी या सत्तेला तात्त्विक बैठक प्राप्त करून देणें. हे उद्देश शांतिपर्वाच्या विवेचनाने किती प्रमाणांत साध्य झाले आहेत हा एक स्वतंत्र चर्चेचा विषय होऊं शकेल. पण तो उद्देश साध्य करण्याच्या दिशेनें शांतिपर्वाने केलेला प्रयत्न मात्र व्यापक भूमिकेवर आधारलेला आहे, ही गोष्ट नाकारतां येत नाही.

## राजधर्म म्हणजे प्रजापालन

या भूमिकेचा विचार करण्यापूर्वी शांतिपर्वांतील शब्दांचे अर्थ तत्कालीन संदर्भांत समजून घेणें आवश्यक आहे. उदाहरणार्थ, राजधर्म

या शब्दांतील धर्म हा शब्द दोन अर्थांनी उपयोगांत आणला आहे. धर्म म्हणजे नीति आणि धर्म म्हणजे कर्तव्य. राजधर्म या एकाच शब्दांत राजनीति आणि राज्यशासन अशा दोन्ही अर्थांचा समावेश झालेला आहे. ‘राजधर्म म्हणजे प्रजापालन,’ (अ. ६६). ‘राजाने दण्डनीतीचा अवलंब करणें हाच त्याचा श्रेष्ठ धर्म (अ. ६९).’ ‘राजाने प्रजेचें संरक्षण करणें हाच त्याचा श्रेष्ठ असा धर्म,’ (अ. ७१). असें अनेक ठिकाणी धर्म शब्दाचें स्पष्टीकरण केलें आहे. त्यापुढे जाऊन, राजधर्माला इतर कोणत्याहि धर्मापेक्षा सर्वश्रेष्ठ मानलेलें आहे. भीष्माचार्य म्हणतात, ‘सर्व आश्रमधर्मापेक्षा राजधर्म श्रेष्ठ आहे. तिन्ही वर्णांचें सर्व धर्म आणि उपधर्म यांची उत्पत्ति राजधर्मापासूनच झाली. ज्याप्रमाणे हत्तीच्या पावलामध्यें सर्व प्राण्यांचीं पावलें लीन होऊन राहतात, त्याचप्रमाणें राजधर्मामध्ये सर्व धर्मांचा अंतर्भाव होतो. इतर धर्मांचें आचरण थोडें असतें आणि फलहि थोडेंच मिळतें. परंतु ज्याचें आचरणहि मोठें आणि फलहि मोठें असा एक राजधर्मच आहे. राजधर्मामुळेच सर्व वर्णांचें पालन होतें. ज्ञानाचें संवर्धन होतें आणि मनुष्याचें संरक्षणहि होतें. राजधर्माचा लोप झाला तर सर्व विद्या नष्ट होतील आणि सर्व वर्णहि नष्ट होतील (अ ६३).

राजधर्माची श्रेष्ठता शांतिपर्वांत अनेक ठिकाणी व्यक्त केली आहे. एके ठिकाणी म्हटलें आहे, ‘राजधर्म हाच सर्व लोकांचा मुख्य आधार आहे. ज्याप्रमाणे अश्वाला काढण्या अथवा हत्तीला अंकुश असतो त्याचप्रमाणे सर्व लोकांना आवरून धरण्याचें राजधर्म हेंच एक साधन आहे. सूर्य उगवतांच अंधाराचा नाश होतो, त्याप्रमाणे राजधर्माचा उदय होतांच समाजांतील विपरीत घटना नाहीशा होतात,’ (अध्याय ५६ ).

### सामर्थ्याचें प्रतीक : दण्ड

धर्म आणि राजधर्म या शब्दांप्रमाणेच दण्ड आणि दण्डनीति या शब्दांनाहि शांतिपर्वांत एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. दण्ड या शब्दाचा शस्त्र असा रूढ अर्थ. पण राजाच्या सामर्थ्याचें प्रतीक म्हणूनहि या शब्दाचा उपयोग केलेला आहे. दण्डनीति याचा अर्थ, अशा सामर्थ्याचा उपयोग करण्याचीं तत्त्वें. ‘सैन्य हेंच राजाचें मुख्य अंग

असून दण्ड उत्कर्षाचें साधन आहे,' (अ. १२१). म्हणून, 'दण्डाचा योग्य प्रकारें उपयोग करून जो उत्कृष्ट पद्धतीनें प्रजेचें संरक्षण करतो तो राजा केवळ आदर्श होय,' (अ. १२१), असें म्हटलें आहे. दण्डाची उत्पत्ति, सामर्थ्य आणि कार्य यांचें विवेचन करतांना म्हटलें आहे, 'दण्ड हाच राजाचा मुख्य आधार.' कांही ठिकाणी दंडाचें स्वरूप दैवी मानलेलें आहे, तर काही ठिकाणी त्याचा अर्थ व्यावहारिक स्वरूपाचाहि केलेला आहे. पण त्याची उत्पत्ति कशीहि झालेली असो, त्याचें सामर्थ्य मात्र अद्वितीय मानलेलें आहे. 'दण्डनीतीचा योग्य उपयोग केला तरच राजा आणि राज्य सुरक्षित राहूं शकेल. लोकांत स्वास्थ्य उत्पन्न होईल. प्रजेला कोणाचीहि भीति वाटणार नाहीं. याच्या उलट, दण्डनीतीचा त्याग केल्यास द्रव्यप्राप्ति आणि त्याचें संरक्षण होऊं शकणार नाही. वर्णसंकर होईल. वैदिक कर्मे चालणार नाहीत. कोणताहि ऋतु सुखाचा होणार नाही. व्याधि उत्पन्न होतील. लोकांचें आयुष्य कमी होईल. कोठे तरी आणि केव्हा तरी पर्जन्यवृष्टि होईल. भूमि पीक देणार नाहीं.' म्हणून 'राजाने सदैव दण्डनीतीलाच सर्वश्रेष्ठ स्थान देऊन तिच्या अनुरोधानेच द्रव्याचें संपादन आणि संरक्षण करावें. लोकांचा अभ्युदय करणारी मूर्तिमंत दण्डनीति योग्य प्रकारें आचरणांत आणली तर ती मातापित्या-सारखी श्रेष्ठ ठरते. तिचें अस्तित्व असेल तरच प्राण्यांचें अस्तित्व राहील. दण्डनीति हाच सर्वश्रेष्ठ धर्म होय,' (अ. ६९).

### राजाची उत्पत्ति

शांतिपर्वांत राजाची उत्पत्ति, कर्तव्यें आणि प्रतिष्ठा यांविषयी विस्तारपूर्वक चर्चा केली आहे. 'राजा कालस्यकारणम्'– राजा हाच काल-मान परिस्थितीचा निर्माता असल्याने (अ. ६९) त्याच्या इच्छेने, कर्तृत्वाने आणि श्रेष्ठतेने महत्त्वाच्या घटना घडतील अथवा मोडतील, अशी ही भूमिका आहे. एवढ्या सर्वसमर्थ राजसत्तेची उत्पत्ति कशी झाली, कोणत्या कारणामुळे झाली, तिला एवढें सामर्थ्य कसें प्राप्त झालें, यासंबंधी शांतिपर्वांत प्रामुख्याने दोन सिद्धान्त आढळतात: दैवी सिद्धान्त आणि प्रजा व राजा यांच्या कराराचा सिद्धान्त.

### देवतास्वरूप राजा

दैवी सिद्धान्ताप्रमाणे राजा हा प्रत्यक्ष परमेश्वराचा अंश मानलेला आहे. त्याची आज्ञा पालन करणें म्हणजे प्रत्यक्ष विष्णूची आज्ञा पालन करण्याइतकें महत्त्वाचें मानलें आहे. राजा हा देवतास्वरूप आहे, ही कल्पना अनेक ठिकाणी व्यक्त झालेली आहे आणि त्याच अनुषंगाने म्हटलें आहे, 'राजाला मनुष्य समजून कोणीहि वागतां कामा नये. त्याचा कधीहि अवमान करूं नये. कारण मनुष्यरूपाने राजा पृथ्वीवर वावरत असला तरी, त्याचें खरें स्वरूप देवतेचें आहे. राजा ज्या वेळी लोकांस शिक्षा करतो त्या वेळी तो यमधर्मरूपी आहे. पापी लोकांना तो दग्ध करतो त्या वेळी तो अग्निस्वरूपी आहे. त्याचा पृथ्वीवर संचार चालू असतो त्या वेळी त्याला सूर्यरूप प्राप्त झालेलें असतें; आणि दुष्ट लोकांची संपत्ति हरण करून तो इतर लोकांना देतो त्या वेळीं त्याला कुबेर-स्वरूपी मानलें पाहिजे,' (अध्याय ६८ ). 'राजाला कोणीहि आणि केव्हांहि दोष देण्यास उद्युक्त होऊं नये. मनुष्याने राजाच्या द्रव्याचा अपहार करणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराशींच अप्रामाणिकपणा करण्यासारखें आहे.' राजसत्तेच्या या सिद्धान्ताप्रमाणे राजाचे दैवी स्वरूप सर्वश्रेष्ठ तर मानलें आहेच, त्याबरोबरच अशा राजाच्या वर्तनासंबंधीं प्रजेला कांही अधिकार ठेवलेला नाही. ही गोष्ट राजसत्तेसंबंधीच्या दुसऱ्या सिद्धान्ताशीं विसंगत आणि विरोधी असल्याचें दिसून येतें.

### राजा आणि प्रजेचा करार

राजसत्तेसंबंधीचा दुसरा सिद्धान्त राजा आणि प्रजा यांच्या करारा-सारखा आहे. या कराराची पार्श्वभूमि सांगतांना भीष्माचार्यांनी समाजाच्या अराजक अवस्थेचें मोठें मार्मिक वर्णन केलें आहे. 'एक काळ असा होता की ज्या वेळी राजा नव्हता आणि राज्यहि नव्हतें. शिक्षा नव्हती आणि शिक्षेस पात्र असा मनुष्यहि नव्हता. कारण सर्व प्रजा परस्परांच्या साहाय्याने आपलें संरक्षण करीत असे. पण कालांतराने लोकांच्या मनांत मोहाची भावना उत्पन्न झाली. लोक मोहाच्या अधीन झाल्याने ज्ञानाचा

लोप झाला. धर्माचा नाश झाला. लोभामुळे एकमेकांच्या वस्तूविषयी अभिलाषा उत्पन्न झाली. कर्तव्य आणि अकर्तव्य कळेनासें झालें. भक्ष्य आणि अभक्ष्य, योग्य आणि अयोग्य यांतील मर्यादा नाहीशा झाल्या. ती परिस्थिति अत्यन्त भयानक होती. लोक एकमेकांचा नाश करूं लागले. लहान माशांना मोठ्या माशाने खाऊन टाकावें, त्याप्रमाणे समाजांतहि मात्स्यन्याय सुरू होऊन दुर्बलांना प्रबळांकडून उपद्रव पोचूं लागला. जीविताची शाश्वति नाहीशी झाली. यज्ञ बंद पडले. लोक भीतीने त्रस्त झाले, (अ. ५९). वरील अराजकाच्या परिस्थितींत जगणें अशक्य झाल्यामुळे सर्वांनी मिळून असा नियम केला की 'जो कोणी दुसऱ्यास कठोर भाषण करील, इतरांना उपद्रव पोचवील, दुसऱ्यांचें द्रव्य हरण करील त्याचा आम्ही त्याग करूं. हा नियम सर्व वर्णांना सारखाच लागू आहे,' (अ. ६७). पण या नियमाचीहि अंमलबजावणी होईना. तेव्हा मनूला राजा होण्याची ब्रह्मदेवाने आज्ञा केली. मनूने सांगितलें, 'अनीतीने वागणाऱ्या मनुष्यावर राज्य करण्याची माझी इच्छा नाही.' लोक म्हणाले, 'तुला आम्ही आपल्या पशूंचा पन्नासावा हिस्सा, सुवर्णाचा पन्नासावा हिस्सा आणि धान्याचा दहावा हिस्सा अर्पण करूं. तुला एक कन्या देऊं. शस्त्र, अस्त्र आणि वाहनें यांनी युक्त असे आमचे लोक तुझ्याबरोबर राहतील. तूं आनंदाने राज्य कर. आम्ही आपल्या धर्माचरणाचा चौथा हिस्सा तुला देऊं.' प्रजेने एवढें आश्वासन दिल्यावर मनूने राज्य करण्याचें मान्य केलें, ( अध्याय ६७ ).

या सिद्धान्तांत राजा आणि प्रजा यांनी परस्परांना एका कराराने बांधून घेतलें होतें अशी भूमिका आहे. प्रजेने आपल्या संपत्तीचा आणि सामर्थ्याचा कांही अंश राजाला द्यावयाचा आणि राजाने प्रजेच्या संरक्षणाची हमी घ्यावयाची, असें या कराराचें स्वरूप आहे. समाजांतील दुष्प्रवृत्ति नष्ट करण्याच्या हेतूने हा करार झाला; तसेच समाजांतून भीतीची भावना नाहीशी व्हावी यासाठीहि असा करार करण्यांत आला. राजाच्या अस्तित्वाशिवाय प्रजेला सुरक्षितता लाभत नाही आणि प्रजेच्या सहकार्याच्या आश्वासनाशिवाय राजाचें स्थान स्थिर होऊं शकत नाही, असाहि

या कराराचा अर्थ होतो. राजसत्तेची उत्पत्ति अशा करारांतून झाली आहे असें सांगण्यांत भीष्माचार्यांनी राजनीतीचें एक महान् तत्त्व विशद केलें आहे. राजसत्तेच्या भोवती असलेलें धार्मिक कल्पनांचें गूढ वलय या सिद्धान्ताने नाहीसें झालें व राजसत्ता प्रजेच्या भौतिक गरजांतून निर्माण झाली ही गोष्ट निःसंदिग्धपणे वरील सिद्धान्तांत व्यक्त झालेली आहे.

### अराजक अवस्था

अराजकाची अवस्था प्रजेच्या स्वैर वर्तनाला कारणीभूत ठरते, ही गोष्टहि शांतिपर्वांत पुनःपुन्हा सांगितली आहे. 'राजा नसेल तर अमुक वस्तु माझी आहे असें कोणालाहि सांगतां येणार नाही, स्त्री, पुत्र, द्रव्य हीं सर्व नाहीशीं होतील. दुसऱ्यांचीं वाहनें, वस्त्रें, अलंकार, दुष्ट लोक अत्याचार करून हरण करतील. कोणावरहि कोणाचा अधिकार राहणार नाही. धर्माचरण करणाऱ्या लोकांवर शस्त्रप्रहार होऊं लागतील. हिंसेचें साम्राज्य माजेल. बलवान लोक दुर्बलांचें सर्वस्व हरण करतील. अकालीं वृष्टि होऊं लागेल. सर्वच लोक चोर बनतील. व्यभिचाराला दोष मानणार नाहीत. धर्म रसातळाला पोचेल. वेदांचें अस्तित्व नाहीसें होईल. विवाहाचें अस्तित्वहि नष्ट होईल. गौळीवाड्यांचा नाश होईल. सर्व लोकांचीं मनें त्रस्त आणि उद्विग्न होतील. विद्या आणि व्रतें यांची समाप्ति होईल. सर्व मर्यादा सुटतील. सारांश, सर्वत्र हाहाःकार माजेल,' (अ. ६८). अशा 'अराजकाच्या' अवस्थेंतून समाजाला मुक्त व्हावयाचें असेल, तर त्याने राजाचा अंगीकार केला पाहिजे ही गोष्ट ओघानेच येते. एवढेंच नव्हे तर, 'अराजकापेक्षा परकीय राजाहि बरा,' (अ. ६८). असेंहि म्हटलेलें आहे.

### राजसत्तेची अपरिहार्यता

राजसत्तेची अपरिहार्यता अनेक प्रकारांनी पटवून देण्याचा प्रयत्न शांतिपर्वांत अनेक ठिकाणीं केलेला आहे. 'मनुष्याने प्रथम राजा मिळविला पाहिजे. त्यानंतर स्त्री व नंतर द्रव्य. कारण राजा नसेल तर स्त्री आणि द्रव्य यांचें संरक्षण कसें करता येईल ' ( अध्याय ५७ ), असा प्रश्न

उपस्थित करून राजसत्तेचें महत्त्व विशद केलें आहे. कुटुंबव्यवस्था, संपत्तीची निर्मिति आणि संरक्षण या सर्व गोष्टी राजसत्तेच्या अस्तित्वावर आणि सामर्थ्यावर अवलंबून असतात, असाच या कल्पनेचा स्पष्ट अर्थ होतो. सामाजिक जीवनांतील स्वास्थ्य आणि समाजांतील सर्व वर्गांचे परस्पर संबंध या गोष्टीहि राजसत्तेच्या अस्तित्वावरच अवलंबून असतात, ही गोष्ट निक्षून सांगितली आहे. राजसत्तेला प्रतिष्ठा प्राप्त करून देणें, या सत्तेचा समाजांत दरारा उत्पन्न करणें आणि प्रजेच्या इच्छा राजसत्तेशीं एकवटून टाकणें या सर्व कल्पना वरील सिद्धान्तांत व्यक्त झालेल्या आहेत. राष्ट्राला कोणी नियंता नसेल तर तें दुर्बल होईल, शत्रु त्याला सहज जिंकूं शकेल, ही कल्पना सहज मान्य होण्यासारखी आहे. अराजकाच्या परिस्थितींत प्रजेची प्रतिष्ठा राहणार नाही, या कल्पनेविषयीहि दुमत असण्याचें कारण नाही.

### राजा आणि प्रजा

मनुष्य आणि मनु किंवा प्रजा आणि राजा यांच्या परस्पर संबंधाची भूमिका भारतीय राजनीतीच्या संदर्भात महत्त्वाची आहे. लोकांच्या संमतीने राज्यपद स्वीकारण्यास मनु तयार झाला, त्याचप्रमाणे मनूला सहकार्य देऊन लोकांनी आपल्या संरक्षणाची व्यवस्था करून ठेवली. या कल्पनेंत राजा आणि प्रजा या दोघांच्याहि इच्छा, अपेक्षा, गरज आणि कर्तव्य यांचा स्पष्ट आविष्कार झालेला आहे. याच कल्पनेच्या संदर्भात भीष्माचार्यांनी म्हटलें आहे, 'ज्याला मनुष्याच्या कल्याणाची उत्कट इच्छा वाटत असेल त्याने प्रजेवर अनुग्रह करण्यासाठी राज्यपद स्वीकारलेंच पाहिजे.' तसेच, 'एखाद्या शिष्याने गुरूशीं अत्यंत नम्रपणे वागावें, त्याप्रमाणे प्रजेनेहि राजाशीं लीनतेचें वर्तन ठेवावें.' राजाशीं निष्ठा आणि प्रेम ठेवणारी प्रजाच आपला उत्कर्ष करून घेऊं शकते. प्रजेने राजाविषयी आदर दाखवावा, यांत एका अर्थाने प्रजा स्वतःचाच आदर करीत असते. ज्या राजाला त्याची प्रजा आदराने वागविते त्याचा इतर ठिकाणीहि आदर झाल्याशिवाय राहात नाही. म्हणून प्रजेने आपल्या राजाचा बहुमान केला पाहिजे.

* * *

**कोष आणि कोषवृद्धि**

राजाच्या कल्याणासाठी राजाने प्रजेपासून कर घ्यावा व तो मुख्यतः भूमीवर व व्यापारावर बसविला जावा, असेंहि शांतिपर्वांत म्हटलें आहे. 'शहाण्या राजाने प्रजेपासून तिच्याच रक्षणाकरिता एक षष्ठांश कर घ्यावा, (अ. ६९). शेतांत धान्य उत्पन्न होईल त्यापैकी एक षष्ठांश भाग ग्रामाधिपतीने लोकांकडून वसूल करावा आणि अशा धान्याचीं कोठारें ठिकठिकाणी भरून ठेवावींत. धान्याप्रमाणेच गोपालन करणारे गवळी आणि पशुधन बाळगणारे धनगर यांनी आपल्या पशूंपैकीं एक पन्नासावा भाग राजाला द्यावा आणि अशा प्रकारें राजाचीं खिल्लारें भरलेलीं असावींत. व्यापारी वर्गावरहि त्याच्या उत्पन्नाच्या एक पन्नासांश एवढा कर घ्यावा. माल विकत घेण्याची किंमत, वाहतुकीचा खर्च, नोकराचा खर्च व व्यापाऱ्याचा स्वतःचा योगक्षेम, एवढ्या सर्व गोष्टींचा विचार करून व्यापारी लोकांवर कर बसविण्यांत यावा समाजांतील कारागीर वर्गावरहि कर बसविले जावेत किंवा त्यांच्याकडून राज्याच्या कामासाठी वेठ घेतली जावी, ( अध्याय ८७ ).

राजाच्या कोषवृद्धीचीं तीन साधनें सांगितलेलीं आहेत : शष्ठांशरूपी कर, अपराधी लोकांनी दिलेला दंड आणि व्यापारी वगैरे लोकांकडून त्यांच्याच संरक्षणाचा मोबदला म्हणून घेतलेलें द्रव्य. कोषसंपादनाच्या या कार्यामागे एक विशिष्ट दृष्टि असली पाहिजे, असा शांतिपर्वांत खास उल्लेख केलेला आहे. 'प्रजेकडून न्याय्य तेवढाच कर घेऊन राष्ट्राचें नीतीच्या अनुरोधाने यथाविधि पालन करावें आणि एवढा कर दिल्यावरहि प्रजेचा चरितार्थ वर्षभर चालू शकत नसेल तर, राजाने तिचा योगक्षेम चालविला पाहिजे. लोभाच्या तावडींत सापडून अधर्माने द्रव्य संपादन करण्याची इच्छा राजाने करतां कामा नये. राजा केवळ द्रव्यसंपादनाच्या कामांतच गढून गेला तर त्याच्याकडून इतर कार्यें पार पडूं शकणार नाहीत. अशा स्थितींत त्याला द्रव्य मिळालें तर तें अस्थानीं पडून नष्ट होऊन जाईल. म्हणून राजाने केवळ अर्थसंपादनाची तत्परता दाखवून शास्त्रांत न सांगितलेले कर घेतले व प्रजेला पीडा दिली तर अशा

कृत्याने तो स्वतःचीच हिंसा करवून घेत आहे असें समजावें, (अध्याय ७१). दुधाची इच्छा असणाऱ्या मनुष्याने गायीच्या कासेचा छेद केला तर त्याला दूध मिळूं शकणार नाही. ज्याप्रमाणे गायीची जोपासना करणाऱ्या मनुष्याला सदैव दूध प्राप्त होतें, त्याप्रमाणेच योग्य उपायाने राष्ट्राची जोपासना करणाऱ्या राजालाहि त्याचें फळ मिळतें. अशा मार्गानेच कोष-वृद्धि होऊं शकते. तृप्त असलेली माता मुलालाच दूध देते. त्याच तत्त्वावर तृप्त असलेली पृथ्वी राजाला धान्य व द्रव्य देते, (अध्याय ७१). कर वसूल करण्याच्या कार्यांत राजाने माळ्यासारखें वर्तन ठेवावें. माळी ज्याप्रमाणे वृक्षाची जोपासना करून व त्याला कायम ठेवून त्यावरील फुलें व फळें तेवढीं काढून घेतो, त्याप्रमाणेच राजाने प्रजेचें संरक्षण करुन तिला पीडा होणार नाही, अशा पद्धतीने तिच्यापासून कर घ्यावा, (अ. ७१) राजाने कोळसेवाल्याप्रमाणे वर्तन करूं नये. कोळसे विकणारा मनुष्य वृक्षाचा समूळ नाश करून त्याला जाळून टाकतो. त्याप्रमाणे राजाने प्रजेचा उच्छेद होईल अशी कोणतीहि कृति करूं नये, ( अ. ७१ ).

प्रजेपासून कर घेतांना त्यासंबंधी राजाने प्रजेला योग्य कल्पना द्यावी असेंहि सुचविलें आहे. 'मी या कठीण संकटांत सापडलों आहे. या संकटाने भीति निर्माण केली आहे. अशा वेळीं तुमच्याच संरक्षणाकरिता तुमच्या-पासून धन मागीत आहे. हें संकट आणि भीति नष्ट झाल्यावर मी तें धन तुम्हांला परत करीन, असें राजाने सांगावें, ( अ. ८७ ).

### राष्ट्राचें सामर्थ्य आणि कोष

आपल्या राष्ट्राप्रमाणेच शत्रूच्या राष्ट्रांतूनहि द्रव्य संपादन करून राजाने आपला कोष वाढवावा, (अ. १३३). 'राष्ट्राचें सामर्थ्य आणि राष्ट्राचा कोष या दोन्ही गोष्टी एकमेकांशीं अत्यंत निगडित आहेत' ही कल्पना भीष्माचार्यांनी स्पष्ट केली आहे, (अ. १३३). 'राष्ट्रामध्ये जे श्रीमंत आहेत पण तितकेच कृपणहि आहेत, अशा लोकांकडून दण्डाच्या स्वरूपांत द्रव्य मिळवावें,' (अ. १३२). कोषसंचय करतांना केवळ क्रूर मार्गाचा अवलंब करूं नये; तसेच केवळ साधुत्वाच्या वृत्तीनेहि वागूं नये. दुर्बळ राजाला कोण द्रव्य देणार ? ज्या राजाजवळ द्रव्य नाही तो समर्थ तरी

कसा होणार ? आणि सामर्थ्य नसेल तर राज्य कसें टिकणार ? राज्य नाहीसें झालें म्हणजे उरलीसुरली संपत्तीहि नाश पावणार. सारांश, राजाने कोषसामर्थ्य आणि मित्र यांची सतत वाढ केली पाहिजे. राजाचा कोष रिता झाला म्हणजे लोक त्याचा अवमान करूं लागतात. त्याची आज्ञा पालन करण्यास उत्सुक नसतात. राजाविषयीचा आदर त्याच्या कोष-सामर्थ्यावर अवलंबून असतो,' (अ. १३३).

कोष संपादन करतांना राजाने कांही विधिनिषेध पाळले पाहिजेत अशी महत्त्वाची सूचना भीष्माचार्यांनी केली आहे. 'राजाने यज्ञशील पुरुषांचें आणि देवांचें द्रव्य हरण करूं नये. दस्यु आणि कर्मशून्य लोकांचें द्रव्य हरण करावें. राज्यांतील सर्व द्रव्यांचा उपभोक्ता राजाच असला तरी, त्या द्रव्याचा त्याने सैन्याचें सामर्थ्य वाढविण्यासाठी आणि यज्ञ-कर्मासाठी उपयोग करावा. दुर्जनांकडून द्रव्य हरण करून तेंच द्रव्य जो सज्जनांना अर्पण करितो तो राजा खऱ्या अर्थाने धर्मवेत्ता असतो, (अध्याय १३६).

**कराचें ओझें**

राजाने कर वाढवितांना प्रजेला त्याचें ओझें एकदम लादल्यासारखें वाटतां कामा नये याची काळजी घ्यावी. म्हणजे कर क्रमाक्रमाने वाढवीत जावेत, (अ. ८७). ज्याप्रमाणे बैलाच्या पाठीवर ओझें क्रमाक्रमाने वाढवीत गेल्यास बैलाची ओझें वाहण्याची शक्ति वाढवितां येते, त्याचप्रमाणे प्रजेवर हळूहळू कर वाढविल्यास प्रजेची कर देण्याची शक्ति वाढवितां येते, (अ. ८७). राजा फार खादाड (प्रजेकडून मोठ्या प्रमाणांत कराच्या रूपाने द्रव्य घेणारा) आहे असें प्रसिद्ध झालें म्हणजे प्रजा त्याचा द्वेष करूं लागते, (अ. ८७).

करपद्धति आणि कोषसंचय यांच्या बाबतींत शांतिपर्वांत एक महत्त्वाचें सूत्र सांगितलें आहे. तें असे, 'प्रजा एक वत्स आहे असें समजून कराच्या रूपाने राष्ट्राची धार काढावी. प्रमाणापेक्षा अधिक दूध काढलें, तर वत्सासाठी काहीहि शिल्लक राहणार नाही. अशा स्थितींत वत्स

कार्यहि करूं शकणार नाही. राष्ट्रापासूनहि कररूपी दूध अधिक प्रमाणांत काढलें तर राष्ट्र निःसत्त्व होऊन जाईल, (अ.८७). याच धर्तीवर आणखी कांही उपमांच्या साहाय्याने कोषसंचयामागील हेतु आणि कार्यपद्धति सांगितलेली आहे. उदाहरणार्थ, 'भुंगा फुलांतून मध काढून घेतो, त्या पद्धतीने राजाने, राष्ट्राला पीडा होणार नाही अशा पद्धतीने, कराच्या रूपाने द्रव्य घ्यावें. वाघीण आपल्या छाव्याला दातांत धरून दुसरीकडे नेऊन ठेवते. तितक्याच अलगद पद्धतीने राजाने राष्ट्राकडून कर घ्यावा. ज्याप्रमाणे अणकुचीदार दातांनी उंदीर, झोपलेल्या मनुष्याच्या पायाचें मांस भक्षण करतो आणि तरीहि त्याचा उपद्रव तत्काळ लक्षांत येत नाही, त्याप्रमाणे राजाने राष्ट्रास त्रास होणार नाही, अशा रीतीने कर ग्रहण करावा,' (अ. ८८). या सर्व उदाहरणांमागील दृष्टि सारखीच आहे. प्रजेला उपद्रव पोचणार नाही अशा सौम्य मार्गांनी आणि वाजवी प्रमाणांत कर मिळवावा आणि कोषवृद्धि करावी हीच ती दृष्टि होय.

* * *

### राजा आणि राजनीति

राजाचें वर्तन नीतीला अनुसरून असावें, असा शांतिपर्वातील विवेचनाचा मुख्य रोख आहे. 'राजाने शत्रूला फसवूं नये, त्याच्या राज्याचा उच्छेद करूं नये,' अशी स्पष्ट कल्पना केली आहे. 'अधर्माने पृथ्वी जिंकून घेण्याची अभिलाषा राजाला असतां कामा नये. असा अधर्माने मिळविलेला विजय अस्थिर असतो. त्यामुळे राजा आणि भूमि या दोघांनाहि हीन दशा प्राप्त होते. शरण आलेल्या आणि शस्त्रत्याग केलेल्या शत्रूला धरावें पण त्याचा वध करूं नये. आपल्या सामर्थ्याने ज्याचा पराजय केलेला असेल त्याच्याशीं पुन्हा युद्ध करूं नये. एक वर्षपर्यंत त्याला ताळ्यावर आणण्यासाठी निरनिराळे उपाय करावेत. या अवधींत तो अर्धमेला झालेला असतो. म्हणून त्यानंतर त्याला सोडून द्यावें. पराक्रमाने हरण करून आणलेल्या कन्येला एक वर्षपर्यंत विवाहासंबंधाने प्रश्न विचारूं नयेत. तसेच युद्धांत हरण केलेलें द्रव्य आणि दासदासी एक वर्षानंतर ज्याचे त्यास परत करावेत,' (अ. ९६).

राजाच्या उदात्त वर्तनाच्या अशा अनेक कल्पना आणि विचार मांडल्यानंतर महत्त्वाचें सूत्र म्हणून सांगितलें आहे; 'राजाने राजाशींच युद्ध करावें. दुसऱ्या राज्याच्या प्रजेशीं राजाने युद्ध करूं नये. एखाद्या नामधारी राजाने मर्यादेचें उल्लंघन केलेंच तर त्याला योग्य तें शासन दिलें जावें. युद्धांत ज्या लोकांवर अत्याचार झाले असतील अशा लोकांची मनःस्थिति प्रक्षुब्ध असते. अशा लोकांना मधुर भाषणाने शांत करण्याचा सतत प्रयत्न केला जावा. शत्रूला अविश्वासाने उपद्रव करूं नये. जिंकलेल्या राज्यांत जे शास्त्रसंपन्न आणि सन्माननीय असतील त्यांचा बहुमान करावा. मायावीपणाने अथवा दांभिकपणाने ऐश्वर्य संपादन करण्याची राजाने कधीहि इच्छा करूं नये,' (अ. ९६).

**राजांचा सनातन धर्म**

राजाने सदैव उद्योगांत असलें पाहिजे, या गोष्टीवर भीष्माचार्यांनी अनेक ठिकाणीं भर दिला आहे. त्यांनी म्हटलें आहे, 'बिळामध्ये घोरत पडणाऱ्या प्राण्याला ज्याप्रमाणे सर्प भक्षण करतो, त्याप्रमाणे शत्रूशीं विरोध न करणारा राजा व प्रवास न करणारा ब्राह्मण यांनाहि पृथ्वी ग्रस्त करून टाकते,' (अ. ५७). 'राजाच्या अंगीं अनेक गुणांचा संग्रह असला पाहिजे तरच त्याचें राज्य यशस्वी होऊं शकेल,' हा मुद्दा विशद करतांना भीष्माचार्य म्हणतात, 'प्रजेला आनंदांत ठेवणें, सत्याचें पालन करणें आणि व्यवहारामध्यें सरळपणा असणें हाच राजांचा सनातन धर्म आहे. ज्याच्या राज्यामध्ये प्रजा आपल्या पित्याच्या घरामध्ये असल्याप्रमाणे निर्भयपणे संचार करून शकते; ज्याच्या देशांतील अथवा राजधानींतील लोकांना नीति-अनीतीचें ज्ञान असतें व ज्याला चोरादिकांच्या भीतीमुळे आपलें वैभव गुप्त ठेवावें लागत नाही, तोच श्रेष्ठ राजा होय. असा राजा हिमालय पर्वताप्रमाणे लोकांच्या विश्वासास प्राप्त होतो. हिमालयापासून पीडा होणार नाही, अशी लोकांची खात्री पटली आहे, तशीच खात्री राजाविषयी वाटली पाहिजे. जो ज्ञानाला मान देतो आणि दानशूर असतो, तसेच ज्याचे गुप्त विचार शत्रूला कळूं शकत नाहीत, तोच राजा

राज्य करण्यास योग्य आहे. प्रजापालन हेंच त्याच्या जीविताचें आधारभूत सूत्र झालें पाहिजे, (अ. ५७).

**राजाचे गुणधर्म**

राजाच्या उद्योगशीलतेची महती सांगतांना भीष्म म्हणतात, 'कार्यासक्त असणें हें राजधर्माचें मूळ आहे. उद्योगानेच देवांना अमृताची प्राप्ति झाली. उद्योगशून्य असलेला राजा बुद्धिमान असला तरी निर्विष सर्पाप्रमाणे शत्रूंच्या अवमानाला पात्र होतो,' (अ. ५८).

राजाच्या वर्तनाविषयीं विधिनिषेध सांगतांना म्हटलें आहे, 'राजाने दैन्य न दाखवितां लाघवी भाषण करावें, त्याच्याजवळ शौर्य असावें पण आत्मश्लाघा नसावी. तो दानशूर असावा पण त्याने द्रव्याचा वर्षाव करूं नये. त्याने अकारण वैर करूं नये, तसेच आपल्यावर भक्ति नसलेल्या व्यक्तीला हेरगिरीसाठी नेमूं नये. सर्व बाजूंनी विचार केल्यावाचून दंड करूं नये. आपलें कारस्थान जाहीर होऊं देऊं नये. अपकार करणाऱ्यावर विश्वास ठेवूं नये. राजा हा संरक्षण करणारा, दाता, धर्मनिष्ठ, उद्योगरत असा असेल तरच लोक त्याच्यावर प्रेम करतात; प्रजेचें संरक्षण करणें हाच त्याचा सर्वश्रेष्ठ धर्म,' (अ. ७०).

**आपत्कालांतील राजनीति**

वर उल्लेखिलेल्या राजनीतीपेक्षा कुटिल राजनीतीचाहि शांतिपर्वांत पुरस्कार केला आहे. पण ही कुटिल नीति आपत्प्रसंगी उपयोगांत आणावी असेंहि म्हटलेलें आहे. याचा अर्थ, सर्वसामान्य परिस्थितीचा राजधर्म आणि आपत्प्रसंगीचा राजधर्म असे दोन वेगळे प्रकार मानलेले आहेत. अशा आपत्प्रसंगीं राजाने सदैव पराक्रम गाजवावा. आपल्या वर्तनांत आणि राज्याच्या परिस्थितींत कोणत्याहि प्रकारचें छिद्र ठेवूं नये. शत्रूचें छिद्र दिसतांच तत्काळ त्याच्यावर स्वारी करावी. सर्वसामान्य लोक दण्डाला भीत असतात. म्हणून त्यांना दण्डाच्याच आधाराने ताळ्यावर आणावें. सामदामादि चार उपायांमध्ये दण्ड हाच श्रेष्ठ होय. त्याच्या साहाय्यानेच शत्रूचा नाश करावा. आपत्तीच्या प्रसंगीं योग्य प्रकारची

मसलत करावी. योग्य प्रकारें युद्ध करावें. आणि प्रसंग पडला तर योग्य रीतीने पलायनहि करावें. त्यासंबंधी अधिक विचार करूं नये. शत्रूचें आणि आपलें सारखेंच हित होत असेल तर अशा प्रसंगीं त्या कार्यासाठी शत्रूशीं संधि करावा. पण त्याच्यावर विश्वास मात्र ठेवूं नये. कार्य झालें की तत्काल शत्रूपासून दूर व्हावें. मित्राप्रमाणेच शत्रूचेंहि मधुर भाषणाने सांत्वन करीत राहावें. पण साप असलेल्या घराची जशी भीति बाळगा-वयाची, तशीच शत्रूची सदैव भीति बाळगावी. प्रसंगानुसार शत्रूपुढे हात जोडावे, शपथ घ्यावी. पण वेळ आली की खांद्यावरच्या मडक्याप्रमाणे खाली आपटून दगडावर त्याचा चुराडा करून टाकावा. काळ प्रतिकूल असेल तोवर सामोपचाराचें धोरण स्वीकारावें. किंबहुना शत्रूला आपल्या खांद्यावर देखील बसवावें. पण त्याच वेळी अनुकूल वेळ हेरण्याची सतत खटपट चालू ठेवावी. क्षणभरच का होईना, पण प्रज्वलित होऊन जावें. जळत घातलेल्या कोंड्याप्रमाणे चिरकाल धुमसत राहूं नये. उद्योग करण्याविषयी सदैव तत्पर असावें. आपल्याकडून कांही अपेक्षा असेल तोवरच दुसरा मनुष्य आपल्याशीं विनयाने वागतो. पण एकदां त्याचें काम झालें की तो अवमान करूं लागतो. म्हणून कोणतेंहि काम पूर्णपणे न करिता त्याचा अवशेष कायम ठेवावा,' (अ. १४०).

या कुटिल राजनीतीला कणिकनीति असें नांव दिलेलें आहे. कणिक नांवाच्या एका सल्लागाराने धृतराष्ट्राला अशाच स्वरूपाचा उपदेश केला होता. शत्रूचा पराक्रम पाहून आणि त्याच्या उणीवांचा उपयोग करून कपटाने त्याचें राज्य आणि वैभव हस्तगत करण्यासंबंधीची ही नीति आहे. राजाने या नीतीचा अवलंब करण्यासाठी निरनिराळ्या वेळी निरनिराळीं सोंगें-ढोंगें करावींत, विविध गुणधर्मांच्या प्राण्यांच्या स्वभावा-चेंहि अनुकरण करावें, (अ. १४०). राजाने नटाप्रमाणे प्रसंगाच्या अनुरोधाने नाना प्रकारचीं स्वरूपें धारण करावींत. कूर्म ज्याप्रमाणे आपले अवयव आपल्या शरीरामध्येच गुप्त करून ठेवतो, त्याप्रमाणे राजाने राज्याचीं सर्व अंगें गुप्त ठेवावींत. बगळ्याप्रमाणे इच्छित वस्तूचें चिंतन करीत असावें. सिंहाप्रमाणे पराक्रम गाजवावा. बाणाप्रमाणे शत्रूवर तुटून पडावें. द्यूत, स्त्रिया आणि मृगया यांचाहि वेळप्रसंगी उपयोग करावा.

मृग ज्याप्रमाणे सावधपणे झोपतो, त्याप्रमाणे राजाने सावध असावें. प्रसंगी बधिर व्हावें किंवा अंधाप्रमाणेहि वागावें. जोपर्यंत शत्रूची भीति उत्पन्न झाली नाही तोपर्यंत भ्यालेल्यासारखें वागावें. पण भीति दिसून येतांच निर्भयतेने शत्रूवर प्रहार करावा. शत्रूशीं संधि केल्यावर त्याच्यावर विश्वास टाकून जो सुखाने घोरत पडतो तो झाडाच्या फांद्यांवर झोपलेल्या मनुष्या-प्रमाणे खाली पडतो. शत्रूचे जे शत्रु असतील त्या सर्वांशीं मैत्री ठेवावी. शत्रूच्या गुप्तहेरांची माहिती मिळवावी. शत्रूच्या राष्ट्रामध्ये नास्तिक, तपस्वी यांसारख्या लोकांचा प्रवेश करावा. आपल्या राज्यांत जे समाज-कंटक किंवा हेर येतील त्यांना ओळखून काढावें. परीक्षा पाहिल्यावांचून कोणावरहि विश्वास टाकूं नये. शत्रूला अगदी खऱ्या हेतूने विश्वास दाखवावा. पण त्याची सत्ता डळमळूं लागली की संधि साधून त्याच्यावर आघात करावा. जन्मतः कोणीहि कोणाचे मित्र वा शत्रु नसतात. ते केवळ आपल्या सामर्थ्याच्या प्रमाणांत बनत असतात. अग्नि आणि शत्रु यांचे अवशेष ठेवूं नयेत. लोभी मनुष्यास द्रव्य देऊन वश करावें. बरोबरीच्या शत्रूशीं युद्ध करावें. आपल्या मित्रमंडळांत आणि मंत्रिमंडळांतहि भेद उत्पन्न होऊं देऊं नये; तसेंच त्यांचें एकमतहि होऊं देऊं नये. ज्ञानसंपन्न पुरुषाशीं वैर करूं नये. राजा मृदु असेल तर लोक त्याचा अवमान करतात आणि कठोर असेल तर त्याचा द्वेष करतात. म्हणून राजाचें वर्तन प्रसंगानुसार सौम्य किंवा कठोर असावें, (अ. १४०). कुटिल राजनीतीचीं अशीं सर्व सूत्रें सांगितल्यानंतर शेवटीं म्हटलें आहे, 'या राजनीतीचा पातकाशीं संबंध आहे. म्हणून या नीतीचें आचरण सदैव करूं नये. शत्रूने कुटिल नीतीचा प्रयोग केला तर अर्थात्च आपणहि तसेंच वर्तन करावें. आपद्धर्म म्हणून या नीतीचा अवलंब करावा.'

* * *

### शत्रुपक्षाविषयी धोरण

विजयाची इच्छा करणाऱ्या शूर राजाने कसें वागावें, यासंबंधी शांतिपर्वांत स्वतंत्र विवेचन केलेलें आहे. विजय मिळविण्यासाठी त्याने कोणती तयारी करावी, प्रत्यक्ष युद्धाच्या वेळीं शत्रुपक्षाशीं त्याचें वर्तन

कसें असावें आणि युद्ध संपल्यानंतर जित राष्ट्रांतील प्रजेविषयी त्याने कोणतें धोरण स्वीकारावें या सर्वांचें भीष्माचार्यांनी निवेदन केलें आहे.

'शक्य तोवर राजाने युद्ध न करतांच आपला उत्कर्ष साधावा. कारण युद्ध करून विजय मिळविणें हें एक कमी प्रतीचें कृत्य आहे. परंतु युद्ध करण्याचा प्रसंगच आला तर सैन्य, प्रजा आणि हेर यांचें प्रथम साहाय्य मिळवावें.' (अ. ९४). 'जो राजा स्वतःचें व संरक्षण करण्यास योग्य अशा दुसऱ्याहि लोकांचें संरक्षण करतो त्याच्या प्रजेचा उत्कर्ष होतो आणि त्यालाहि श्रेष्ठ पदाची प्राप्ति होते. शेजारच्या राजांपैकी आपले हितचिंतक कोण, यासंबंधी आपल्या हेरांकडून माहिती मिळवावी. आपल्यापेक्षा बलवान अशा शत्रूला त्रास दिल्यानंतर केवळ आपण त्याच्यापासून दूर आहोंत एवढ्याच समजुतीवर स्वस्थ राहूं नये. अशा आत्मसमाधानी राजावर शत्रु ससाण्यासारखी एकदम झडप घालतात. राजाने स्वतःच्या बलाचा विचार करून आपल्यापेक्षा कमी बल असेल अशाच शत्रूवर स्वारी करावी. जे अत्यंत बलवान असतील त्यांच्यावर स्वारी करूं नये. अशा प्रकारें पराक्रम करून पृथ्वी मिळविल्यानंतर न्यायाने प्रजेचें पालन करावें,' (अ. ९३).

'प्रजापालन, न्यायदान, संग्राम, धर्मरक्षण आणि योग्य वेळीं कारस्थान करणें या पांच साधनांच्या साहाय्याने राष्ट्राचें सामर्थ्य वाढतें.' 'या पांच गोष्टी एकट्या राजालाच पार पाडतां येणार नाहीत. म्हणून त्याने इतरांचेंहि साहाय्य घ्यावें. अर्थात् असें साहाय्य घेतांना कोणावरहि अति विश्वास ठेवूं नये. सावधानपणाने राहावें,' (अ. ९४).

**परकीय प्रजेशीं वर्तन**

'विजय मिळवूं इच्छिणाऱ्या राजाने आपल्या सर्व सामर्थ्याविषयी शत्रुपक्षावर प्रहार केला म्हणजे त्याला अपेक्षित विजय मिळाल्याशिवाय राहात नाहीं. पण केवळ विजय मिळविल्यानेच राजाचा कार्यभाग पूर्ण होऊं शकत नाही. जिंकलेल्या राष्ट्रावर आपली सत्ता चांगल्या प्रकारें गाजविण्यासाठी राजाने धूर्तपणाचें धोरण स्वीकारलें पाहिजे. राष्ट्र जिंकून घेतल्यानंतर राजाने आपल्या बरोबरच्या कांही लोकांसह अथवा एकट्या-

नेच राजधानींत प्रवेश करावा आणि तेथील प्रजेला सांगावें, 'मी तुमचा राजा आहें. मी तुमचें सदैव पालन करीन. मला तुम्ही न्याय्य कर द्या आणि माझा स्वीकार करा!' एवढें सांगितल्यानंतर त्या लोकांनी राजाचा स्वीकार केला तर बरेंच झालें. पण तसें न करतां ते राजाच्या विरुद्ध जाऊं लागले तर राजाने त्यांचा बंदोबस्त करावा,' (अ. ९५).

प्रतिकूल असलेल्या परकीय प्रजेने किंवा त्या प्रजेच्या नेत्याने राजाला विरोध केला, तर त्याच्याशीं वागतांनाहि विजयेच्छु राजाने विशिष्ट धोरण पाळलें पाहिजे. 'विरोध करणारा क्षत्रिय कवच धारण न करितां रणांगणांत आला असेल, तर त्याच्याशीं युद्ध करूं नये. तो युद्धाच्या तयारीने आला असेल, तर आपणहि तयार व्हावें. तो बरोबर सैन्य घेऊन आला तर आपणहि सैन्यासह जाऊन त्याला आव्हान द्यावें. त्याने कपटाने युद्ध चालविलें तर आपणहि त्याच्याशीं कपटाने युद्ध करावें. तो धर्मयुद्ध करीत असेल तर आपणहि त्याच नीतीचा अवलंब करावा. दुःखी मनःस्थितींत असलेल्यावर प्रहार करूं नये. भयभीत झालेल्या आणि पराभूत केलेल्या शत्रूवर शस्त्र उचलूं नये. ज्याचें शस्त्र मोडलें आहे, जो घायाळ झाला आहे, ज्याचा प्रत्यञ्चा तुटलेला आहे किंवा वाहन उध्वस्त झालें आहे अशा शत्रूवर प्रहार करूं नये. जखमी झालेल्या शत्रूला आपल्या राष्ट्रामध्ये ठेवून घेऊन औषधोपचार करावे किंवा त्याला आपल्या घरीं नेऊन पोंचवावें. औषधोपचारानंतर त्याला सोडून द्यावें, (अ. ९५).

शरण आलेल्या शत्रूशीं वागतांना राजाचें वर्तन उदार असावें कवचभग्न झालेला, 'मी शरण आलों' असें म्हणणारा, हात जोडून शस्त्रत्याग करून उभा राहिलेला शत्रु आपल्या ताब्यांत घ्यावा. पण त्याला ठार करूं नये. राजाची ही नीति त्याला जित प्रजेचें अंतःकरण अनुकूल करून घेण्यास उपयोगीं पडते. विजयी राजाचें जित प्रजा स्वागत करते. अशा राज्याची सत्ता राजाला कायम टिकवितां येते, (अध्याय ९५)

**अनेक शत्रूंशीं सामना**

एकाच वेळीं अनेक शत्रूंनी वेढल्यावर राजाने कसें वागावें, असा युधिष्ठिराने प्रश्न विचारला (अ. १३८), त्या वेळीं भीष्माचार्यांनी दिलेलें

उत्तर त्यांच्या परराज्यविषयक धोरणाचें मर्म व्यक्त करतें. युधिष्ठिरानें विचारलें, ‘राजा संकटांत सापडला म्हणजे त्यानें पूर्वी ताप दिलेले अनेक शत्रु त्याच्यावर उलटतात व त्याचा समूळ नाश करण्यासाठी प्रयत्न करतात. बलाढ्य शत्रु लहान राष्ट्रावर आक्रमण करून आपल्या सामर्थ्याच्या जोरावर तें जिंकू इच्छितो अशा वेळीं लहान राष्ट्रानें कसें वागावें ? मित्र आणि शत्रु यांच्यासंबंधी कोणतें धोरण स्वीकारावें ? अशा वेळीं त्यानें कोणाशीं संग्राम करावा आणि कोणाशीं संधि करावा ? बलाढ्य शत्रूच्याहि तावडींतून सुटण्यासाठी कसें वर्तन करावें ?

भीष्माचार्यांनी या प्रश्नांच्या उत्तरादाखल एक प्रदीर्घ कथा सांगितली आहे. ती संपूर्ण कथा याच संग्रहांत ‘परचक्र’ या शीर्षकाखाली दिली आहे. त्या कथेचा प्रारंभ करण्यापूर्वी भीष्माचार्यांनी म्हटलें आहे, ‘कार्याचें स्वरूप आणि महत्त्व लक्षांत घेऊनच शत्रु मित्र बनतात आणि मित्रहि शत्रु होतात. कोणतीहि स्थिति कायमची नसते. म्हणून देश व काल पाहून आणि कर्तव्य व अकर्तव्य यांचा निश्चय ठरवून ज्यांच्यावर विश्वास ठेवणें आवश्यक आहे त्यांच्याशीं विश्वास ठेवावा आणि प्रसंगी संग्रामहि करावा. सुज्ञ पुरुषानें प्रयत्नपूर्वक संधि करणें अधिक चांगलें. कारण संधि केल्यामुळे हानि टळते. पण तसें करणें शक्य नसेल तर संग्रामाचा मार्ग स्वीकारणें योग्य ठरतें,’ (अध्याय १३८) याच कथेच्या शेवटी मूषकानें शत्रूशीं वागण्याचें जें मर्म सांगितलें आहे तें महत्त्वाचें आहे: ‘अंतःकरणांत भीति असली तरी ती वाटत नसल्याप्रमाणे आणि विश्वास नसला तरीहि तो वाटत असल्यासारखें दाखवावें. प्रसंगानुसार शत्रूशीहि संधि करावा व मित्राशींहि संग्राम करावा. आपली मसलत कोणालाहि सांगूं नये. संकटप्रसंगी निर्भयपणानें पण तितक्याच सावधगिरीनें वागावें. बलाढ्य शत्रूशीं संधि करावा. पण कार्य झालें म्हणजे मात्र त्याच्यावर विश्वास ठेवूं नये. हें सूत्र सर्वकाल आणि सर्व परिस्थितींत लक्षांत ठेवण्यासारखें आहे. राजानें शत्रु व मित्र ओळखणें आणि त्यांच्याशीं आवश्यक तेव्हा संधि किंवा विग्रह करणें यांतच त्याच्या यशाचें रहस्य साठविलें आहे,’ (अ. ११८).

* *

**राजा आणि राजसेवक**

'राजा कितीहि पराक्रमी असला तरी त्याला एकट्याला राज्य करतां येत नाही. अनेकांचें साहाय्य मिळवूनच त्याचें राज्य यशस्वी होऊं शकतें,' असें शांतिपर्वांत अनेक ठिकाणी म्हटलें आहे. राजाच्या अशा साहाय्यकर्त्यांत अमात्याचें स्थान सर्वश्रेष्ठ मानलें आहे. अष्टमंत्र्यांची कल्पना आणि त्या आठ मंत्र्यांची निरनिराळ्या कामांसाठी करावयाची योजना यासंबंधीहि तपशील दिलेला आहे. 'आठ मंत्र्यांमध्ये बसून राजाने त्यांच्याशीं सल्लामसलत करावी, त्यांच्याकडून विचार ऐकूण घ्यावेत आणि अशा विचारविनिमयांतून जो निर्णय घेतला जाईल तो आपल्या अधिकाऱ्यास सांगावा आणि नंतर राष्ट्रामध्ये प्रसिद्ध करावा,' (अ. ८५). 'अमात्य, राजपुत्र किंवा इतर सेवक योग्य प्रकारें कार्य करीत नसल्यास ते स्वतः आणि राजा सर्वच जण अधोगतींत जातात,' असें प्रतिपादन करून म्हटलें आहे, 'राजाने सर्व सेवकवर्गावर अतिशय बारकाईने लक्ष ठेवलें पाहिजे.'

'अमात्यावांचून राजाला तीन दिवसहि राज्य चालवितां येणें शक्य नाही. अमात्य शूर आणि ज्ञानसंपन्न असला पाहिजे. कारण शौर्य आणि ज्ञानसंपन्नता यांच्या योगानेच राज्याची योग्य व्यवस्था ठेवतां येते,' (अ. १०६). राजाला अमात्याचें महत्त्व लक्षांत आलें पाहिजे. म्हणून अमात्याच्या गुणधर्मांची चर्चा व्याघ्र आणि गोमायु यांच्या संवादांत केली आहे. गोमायु म्हणतो, 'राजाला अमात्यावांचून राज्याचें संरक्षण करतां येणें शक्य नाही. पण अमात्य दुष्ट असेल तर त्याच्यापासूनहि राज्याचें रक्षण होणार नाही. अमात्य राजावर प्रेम करणारा असावा. तसेच, नीतिवेत्ता आणि सर्वांशीं मिसळून वागणारा असावा. शत्रूचा पराभव करण्याची ईर्षा बाळगणारा, निर्लोभी, विचारशील आणि राज्यकारभारांत आपल्या आप्तादिसंबंधांना हस्तक्षेप करूं न देणारा असावा. अशा अमात्याचा राजाने गुरूप्रमाणे अथवा पितराप्रमाणे आदर करावा,' (अ. १११).

**अमात्याचे गुणदोष**

अमात्याचे अनेक गुण सांगितले आहेत. त्या सर्वांची लांबलचक यादी देऊन म्हटलें आहे, 'राजाने परीक्षा केल्यावांचून कोणालाहि अमात्य करणें योग्य नाही. दुष्कुलांत उत्पन्न झालेल्या अमात्याकडे राज्य सोपवून राजाला सुख मिळणार नाही,' (अ. ११८). अमात्य राष्ट्राशीं योग्य प्रकारचें आचरण ठेवणारा, संधि आणि विग्रह यांमध्ये निष्णात असणारा, नगरवासी आणि राष्ट्रवासी लोकांत प्रिय असलेला, परकीय सैन्याचे डावपेच जाणणारा, आपल्या सैन्यांत उत्साह निर्माण करणारा, शत्रूवर केव्हा आणि कशी स्वारी करावी याची माहिती असलेला, देश आणि काल यांची योग्यायोग्यता जाणणारा असा अमात्य नेमला तर 'राज्य चंद्राच्या प्रकाशाप्रमाणे विस्तार पावतें.'

राजाच्या मंत्रिमंडळांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यांच्याप्रमाणेच शूद्रांचाहि समावेश करावा, असें म्हटलें आहे. भीष्माचार्य, अमात्य योजनेसंबंधी विचार सांगतांना म्हणतात, 'विद्यानिष्ठ, प्रौढ, अध्ययन पूर्ण झालेले आणि शुचिर्भूत असे चार ब्राह्मण, शूर आणि शस्त्रयुक्त असे आठ क्षत्रिय, द्रव्यसंपन्न असे एकवीस वैश्य आणि विनयसंपन्न व नित्य कर्माचरण करून शुचिर्भूत झालेले असे तीन शूद्र यांचें मंत्रिमंडळ असावें,' (अ. ८५).

**गुप्तहेरांचें महत्व**

अमात्याप्रमाणेच गुप्तहेरांचें महत्त्वहि अनेक ठिकाणी वर्णन केलें आहे. हेराचे गुणधर्म सांगतांना म्हटलें आहे, 'गुप्तहेर राज्यरूपी वृक्षाचें मूळ असून राष्ट्राविषयींचे गुप्त विचार हेंच त्यांचें बळ आहे,' (अ. ८३). हेरांनी निरनिराळ्या प्रसंगी आवश्यकतेप्रमाणे आपलीं रूपें बदलून शत्रुपक्षाची माहिती चातुर्याने मिळवावी. शत्रुपक्षांत बुद्धिभेद करावा. परराज्यांत गोंधळ निर्माण होईल व एकमेकांशीं अविश्वास वाढेल असें धोरण अमलात आणावें. आपल्या राज्याच्या आणि राजाच्या चांगल्या गुणांचा प्रसार करावा. परराज्यांतील सर्व घटनांची नोंद घेऊन तत्परतेने

राजाला कळवाव्या. आणि हें सर्व करीत असतां आपलें खरें स्वरूप उघड होणार नाही याची दक्षता घ्यावी,' (अ. ८३).

**सेवकांशीं वागणूक**

अमात्य आणि हेर यांच्याप्रमाणेच इतर निरनिराळ्या कामांसाठी अधिकाऱ्यांची नियुक्ति केली जावी. त्यांच्या गुणधर्माला साजेसें काम त्यांना द्यावें. अशा अधिकारी वर्गात प्रतिहारी आणि शिरोरक्षक हे दोघे अधिकारी अतिशय विश्वासू व कुलशीलवान असावेत. राजाच्या गुप्त-मसलतीची माहिती प्रतिहारीला ( चिटणीस ) मिळालेली असते आणि राजाचें शरीरसंरक्षण शिरोरक्षक ( बॉडीगार्ड ) करीत असतो. म्हणून या दोन्ही अधिकाऱ्यांचें महत्त्व विशेष सांगितलें आहे.

राजसेवकांशीं वागण्याचेंहि एक विशिष्ट तंत्र शांतिपर्वांत सांगितलें आहे : 'राजाने सेवकांशीं सलगीने वागूं नये. तसेच, त्यांच्या मनांत आपल्याविषयी अढी निर्माण होणार नाही याचीहि काळजी घ्यावी. सलगीने वागल्यास राजसेवक त्याचा दुरुपयोग करतील आणि राज-सेवकाच्या मनांत अढी निर्माण झाल्यास त्याचा राजाला उपद्रव होण्याचा संभव असतो. स्थान व मर्यादा यांचा अतिक्रम करून श्वानास उच्च स्थानावर चढवूं नये. कारण त्यामुळे त्याच्याकडून प्रमाद होतात. अस्थानी बहुमान करणें योग्य नाही. वाघाच्या ठिकाणी वाघ आणि चित्त्याच्या पदावर चित्त्याचीच योजना केली पाहिजे,' (अ. ११९). राजाच्या सन्निध असणारे लोक सौजन्यसंपन्न, शूर, कुलीन, ज्ञानी, थोर मनाचे आणि कार्यदक्ष असावेत. तसेच आपल्या अधिकारावर असतांना लोकापवादास पात्र झालेले ते नसावेत. धान्याचे कोठार चांगल्या लोकांच्या अधीन ठेवलें पाहिजे,' (अ. ११९). राजसेवकासंबंधी ज्या गुणांची अपेक्षा केली आहे ते सर्व एकाच व्यक्तीच्या अंगीं सापडणे शक्य नाही. त्यामुळे ज्या व्यक्तीच्या ठिकाणी जो गुण प्रामुख्याने दिसत असेल तो लक्षांत घेऊन त्याला अनुरूप अशी सेवा त्याच्याकडे सोपवावी,' (अ. ११९).

* *

**शासनव्यवस्था**

शांतिपर्वांत राजाची शासनव्यवस्था विशेष तपशिलाने सांगितलेली नसली तरी, त्यासंबंधीचे एक-दोन उल्लेख महत्त्वाचे आहेत. कांही गांवांचा समुदाय, प्रांत, विभाग अशा निरनिराळ्या स्वरूपांत राज्याची विभागणी करण्याची पद्धत प्राचीन कालींहि अस्तित्वांत होती. या निरनिराळ्या घटकांची व्यवस्था कशी करावी याचें विवेचन करतांना म्हटलें आहे, 'राजाने प्रत्येक गांवासाठी एक अधिपति नेमावा तसेच, दहा, वीस, शंभर आणि हजार गांवांचे विभाग पाडून त्या प्रत्येकाचा एक-एक अधिपति नेमण्यांत यावा. ग्रामाधिपतीने आपल्या गांवांतील घटनांचा वृत्तान्त दशग्रामाधिपतीस कळवावा. दशग्रामाधिपतीने वीस ग्रामाधिपतीस कळवावा आणि असेंच वरच्या अधिपतींनी क्रमाने उच्च अधिपतीस आपल्या विभागांतील माहिती कळवावी. ग्रामाधिपतीने आपल्या गांवांतील वस्तूंचा उपभोग घ्यावा आणि दशग्रामाधिपतीचेंहि पोषण करावें. दशग्रामाधिपतीने आपल्या वरच्या अधिकाऱ्याकडे वस्तूंचा पुरवठा करावा. शंभर गांवांच्या कारभारासाठी ज्याची नेमणूक झालेली असेल त्याच्या पोषणासाठी एक गांव बहुमानपूर्वक त्याला द्यावा. हजार गांव ज्याच्या अधिकाराखाली आहेत अशा सहस्राधिपतीने धान्य, सोनें इत्यादींच्या स्वरूपांत वेतन रूपाने मिळवावें. युद्धाच्या वेळीं सहस्राधिपतीने जय्यत तयारीनिशीं राजाला मदत करावी. या सर्व अधिकाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी राजाने एका सचिवाची नेमणूक करावी. नगरासाठी एक निराळा मंत्री नेमावा. सचिवाने आपल्या अधिकाराखालील प्रदेशांत वरचेवर जाऊन देखरेख ठेवावी. तसेच, आपल्या हेरांकडूनहि ग्रामाधिपतींच्या वर्तनासंबंधी माहिती मिळवावी, (अ. ८७).

**राजानेच न्याय द्यावा**

राज्याच्या कारभाराची विभागणी कशी करावी यासंबंधीची वरील माहिती सामान्यतः शांततारक्षणाच्या कामीं उपयोगीं पडणारी आहे. न्यायदानाची व्यवस्था कशी ठेवावी याचींहि कांही सूत्रें भीष्माचार्यांनी सांगितलेलीं आहेत. त्या कालीं राज्याचें क्षेत्र मर्यादित असल्यामुळे न्याय-

दान स्वतः राजाने करावें असें म्हटलें आहे. 'राजाने विवादांचा न्याय करण्याचें काम दुसऱ्यावर सोपवूं नये,' (अ. ८५). तसेच, न्याय देण्याच्या कामीं मदत करण्यासाठी एक राजसभा असावी, (अ. ८५). असेंहि म्हटलेलें आहे. 'न्याय करतांना कोणाच्याहि वतीने राजाने अंतस्थ द्रव्य घेऊं नये,' असा उल्लेख करून पुढे म्हटलें आहे, 'राजा असें करील तर, गरुडापासून पक्षी पळतात त्याप्रमाणे राजापासून प्रजा दूर जाईल व राष्ट्राचा नाश होईल. बलिष्ठाने पीडा केल्यामुळे दुर्बल मनुष्य न्याय मिळविण्यासाठी आक्रोश करीत राजाकडे येतो, त्याला राजाने न्याय द्यावा. प्रतिवादी आपल्यावरील आरोप अमान्य करील तर साक्षी-पुरावा घेऊन निकाल द्यावा. साक्षी नसतील तर मोठ्या युक्तीने निर्णय करावा. अपराधाच्या मानाने शिक्षा करावी. श्रीमंत मनुष्यास दंड करावा, गरिबास कैदेची शिक्षा सांगावी आणि दुर्वृत्त असतील त्यांना फटके मारावेत. राजाचा खून करण्यासाठी कट करणारे, आग लावणारे, चोर आणि जाति भ्रष्ट करणारे यांचा वध करावा. जी शिक्षा न्याय्य व योग्य आहे ती दिल्यामुळे राजाला पाप लागत नाही. पण जो राजा केवळ आपल्या इच्छेने व लहरीने शिक्षा करतो त्याची अपकीर्ति होते व त्याला पापहि लागतें. कोणत्याहि मनुष्यास दुसऱ्याच्या अपराधाबद्दल शिक्षा भोगावी लागूं नये ही गोष्ट पूर्णपणे लक्षांत ठेवली पाहिजे,' (अ. ८५).

* * *

**परराज्यविषयक धोरण**

साधनसामग्री प्रभावी नसलेल्या दुर्बल राजाने आपलें अस्तित्व टिकविण्यासाठी काय करावें, असा प्रश्न धर्मराजाने शांतिपर्वांत विचारला आहे. दुर्बल राजाच्या अनेक दोषांची आणि उणीवांचीहि त्याने एक यादीच दिली आहे. अमात्यांच्या कार्याविषयी शंका वाटणारा, धान्य, कोष इत्यादिकांचा संग्रह नसलेला, दीर्घसूत्री, ज्याची मसलत लोकांना समजली आहे आणि ज्याची राजधानी व राष्ट्र कसें विभागून घ्यावयाचें हेंहि शत्रूंनी ठरवून टाकलें आहे, असा राजा सर्व बाजूंनी दुर्बलच ठरतो. त्याच्याजवळ धनधान्य नाही म्हणून त्याचे मित्र त्याला सन्मानाने

वागवीत नाहीत. अशा राजाचा आपल्या अमात्यावरहि दरारा राहूं शकत नाही. त्यामुळे अमात्यांत फाटाफूट होऊं लागते. शत्रुसैन्याला चालून येण्यासाठी अशी परिस्थिति अतिशय उपकारक ठरण्यासारखी असते. इतकी प्रतिकूल अवस्था असलेल्या राजाने कसें वागावें, असा धर्मराजाचा प्रश्न आहे. भीष्माचार्यांनी त्यावर अनेक उपाय सुचविले आहेत. विजय-संपादनासाठी चाल करून येणारा शत्रु आपल्या राष्ट्रांत कायमचा राहणार नसेल, तर त्याच्याशीं तावडतोब संधि करावा आणि आपल्या राज्यांतील जीं गांवें आणि नगरें त्याने ताब्यांत घेतलीं असतील तीं त्याच्याकडून सोडवून घ्यावींत. मग असा शत्रु दुष्ट असो अथवा सुष्ट असो, कुशल असो अथवा आडदांड असो, त्याच्याशीं संधि करणें आणि आपला प्रदेश मुक्त करून घेणें यांतच राजाचें हित असतें. कांही वेळां प्रसंग अधिक गंभीर उद्भवण्याचाहि संभव असतो. राजाच्या जीवावर बेतण्याची शक्यता असते. अशा प्रसंगी राजाने राजधानी सोडून निघून जावें. आपल्याजवळ असलेल्या सर्व संपत्तीचाहि उपयोग करावा आणि आलेल्या संकटांतून बाहेर पडावें. कारण जीवित सुरक्षित राहिलें तर पुन्हा राजपद प्राप्त होईल आणि द्रव्यहि संपादन करतां येईल. शत्रूच्या हातीं पडून जीव गमावण्यापेक्षा त्यांतून जिवंत राहण्याचा मार्ग स्वीकारणें अधिक श्रेयस्कर ठरतें, (अ. १३१).

कांही प्रसंगी शत्रूवर चालून जाऊन पराक्रम गाजविण्याचीहि आवश्यकता असते. आपलें सैन्य संख्येने थोडें असलें तरी तें राजनिष्ठ असेल तर त्याच्या साहाय्याने राजाला पृथ्वीहि जिंकून घेतां येईल. अशा प्रसंगी राजा समरांगणावर पडला तर तो स्वर्गास जाईल आणि त्याने शत्रूला रणांगणावर लोळविलें, तर तो पृथ्वीचें राज्य करील. सारांश, बलाढ्य शत्रूशीं प्रथम संधि करण्याची युक्ति योजावी. पण त्यांत यश आलें नाही तर सर्व पणाला लावून युद्ध करावें. सौम्यपणाने वागून हेतु साध्य होत असेल त्या वेळीं शपथ घेऊनहि शत्रूला विश्वास दाखवावा. पण सौम्यपणाचा उपयोग होत नसेल तर दुसरा मार्ग पत्करावा. आपलेच अमात्य आपल्याला प्रतिकूल असतील व त्यामुळे युद्ध किंवा संधि करणें शक्य नसेल तर सामदामादि उपायांपैकी शत्रूवर साम उपायांचा प्रयोग

करीत करीत पलायन करावें. आणि कांही देश ओलांडून दूर जावें. मध्यन्तरीचा काळ अज्ञातवासांत घालविल्यावर पुन्हा आपलें राज्य परत मिळविण्याची ईर्षा बाळगावी, (अ. १३१). अशा प्रसंगी विज्ञानबलाचा उपयोग होतो ही गोष्ट राजानें विसरूं नये. कोष आणि सामर्थ्य यांची प्राप्तिहि विज्ञानबलानेच होते. मित्रहि त्यामुळेच लाभतात आणि राज्यहि त्याच्या साहाय्यानेच मिळूं शकतें, (अ. १३३).

**धर्मापेक्षा सामर्थ्य श्रेष्ठ**

संकटाच्या वेळीं धर्म आणि अधर्म यांचा विचार करीत बसणें म्हणजे अरण्यांत एखाद्या पशूच्या पावलाची खूण पाहिल्यानंतर तें पाऊल लांडग्याचें आहे, चित्त्याचें आहे कीं वाघाचें आहे, याचा विचार करीत बसण्यासारखेंच आहे. अशा वेळीं धर्म आणि अधर्म यांची चर्चा करीत बसण्याऐवजी सामर्थ्यप्राप्ति करून घेणें हेंच सर्वश्रेष्ठ कार्य ठरतें. धर्माचें आणि अधर्माचेंहि फळ कधीच कोणी प्रत्यक्ष पाहिलें नाही. म्हणून त्याकडे विशेष लक्ष देऊं नये. ज्याच्याजवळ सामर्थ्य आहे तोच संपत्ति, सैन्य आणि अमात्य संपादन करूं शकतो. सामर्थ्यशील राजाला कोणाकडूनहि उपद्रव पोचूं शकत नाही. सामर्थ्य आणि धर्म दोन्हींचा सत्तेमध्ये खऱ्या अर्थानें आविष्कार झालेला असेल तर त्या सत्तेला कशाचीच भीति नाही तथापि धर्माहून सामर्थ्याची योग्यता अधिक आहे. कारण सामर्थ्यामुळेच धर्मप्रवृत्तीलाहि अर्थ येतो. ज्याप्रमाणे जंगम वस्तु पृथ्वीवर अवलंबून असते, त्याप्रमाणे धर्महि सामर्थ्यावर अवलंबून असतो. ज्याप्रमाणे धूम्र वाऱ्याच्या अधीन असतो, त्याप्रमाणे धर्महि सामर्थ्याच्याच अनुरोधाने चालत असतो. वृक्षाचा आश्रय करून राहणाऱ्या वेलीची वृक्षावर सत्ता चालत नाही; त्याप्रमाणे सामर्थ्यावर धर्माची सत्ता चालत नाही. सामर्थ्यसंपन्न लोकांना कांहीहि असाध्य नाही. त्यांचें सर्व वर्तन शुचिर्भूतच असतें. सामर्थ्यशून्य राजाला अवमान आणि अपकीर्ति सोसावी लागते, (अ. १३४).

* * *

# मूल्यमापन

शांतिपर्वांतील विविध विषयांचें विवेचन येथे संपलें. शेवटीं त्यांचें संक्षेपाने मूल्यमापन केल्यास तें अस्थानीं ठरणार नाही. प्रथम कांही निवडक कथांचा मला प्रतीत झालेला अर्थ विशद करून नंतर त्यामागील राजनीतीचें वैशिष्ट्य निवेदन करतों.

'परचक्र' या कथेंत परराष्ट्र धोरणाचें सारें मर्म व्यक्त झालें आहे. अखंड सावधानता आणि समयज्ञता हीं राजनीतीचीं दोन महान् सूत्रें आहेत. त्यांचें विस्मरण होऊं दिलें नाही तर, परचक्राच्या कितीहि मोठ्या संकटांतून मुक्त होण्याचा मार्ग शोधतां येतो. अर्थात् त्यासाठी, मूषकाने म्हटल्याप्रमाणे, 'राजकारणांत कोणतीच परिस्थिति कायमची नसते. प्रसंगानुसार शत्रूचे मित्र आणि मित्राचे शत्रु बनत असतात. आणि म्हणूनच, राज्यकर्त्यांनी मित्रावरहि अतिविश्वास ठेवूं नये आणि कारणावांचून शत्रूजवळ जाण्याचाहि धोका पत्करूं नये. आत्मरक्षणासाठीं सदैव सुसज्ज असावें.'

मराठी ... ग्रंथ
दा. क. .........

एकदा सत्ता मिळूं लागली की तिचा लोभ मर्यादेत राहात नाही. आणि अमर्याद सत्ता हातीं आली की सत्तामद चढूं लागतो. अशा वेळीं सत्ता कशी प्राप्त झाली याचाहि विसर पडतो. या संदर्भात 'सत्ता' ही कथा अतिशय बोलकी आहे. प्रथम लोकमताची याचना करून सत्तेवर आरूढ व्हावयाचें आणि मग त्याच लोकमताला लाथाडून सर्वाधिकारी बनावयाचें, असे प्रकार आपल्या काळांत घडले आणि घडत आहेत. पण लोकप्रक्षोभ झाला तर...... तर त्यापुढे सामर्थ्यशाली सर्वाधिकारीहि धुळीला मिळतात. 'ज्याने श्वानाला शरभाचें सामर्थ्य मिळवून दिलें तोच पुन्हा त्याला मूळ पदावरहि आणून बसवूं शकतो.'

भ्रष्ट अमात्य आणि राजसेवक काय करूं शकतात ? कोषाचा अपहार करतात. राज्ययंत्रणा पोखरून टाकतात. लांच खातात. फितुरी करतात. सर्व बाजूंनी राजाचें आणि राज्याचें सामर्थ्य क्षीण करीत असतात. प्रसंगी त्यांचें अस्तित्वहि नष्ट करतात. अशा अमात्यांना आणि राजसेवकांना सत्यवक्ता कसा आवडेल ? ते त्याला विविध आमिषें दाखवून वश तरी करून घेतील, नाही तर, विविध मार्गांनी ठार तरी करतील. 'अमात्य' आणि 'राजसेवक' या दोन्ही कथांत हें सत्य स्पष्ट झालें आहे.

'प्रजा' आणि 'राज्य' या दोन कथा एकाच विषयाचीं दोन अंगें आहेत. राजा कसा नसावा आणि कसा असावा याचीं तीं परस्परविरोधी व्यक्ति-चित्रेंच आहेत. पृथूचें कर्तृत्व फार मोठें होतें. पण तें व्यक्त होण्यापूर्वी आपली प्रशंसा होऊं नये असें त्याला वाटतें. म्हणूनच त्याने अशा दांभिक स्तुतिपाठकांना ऐकविलेले बोल मननीय आहेत. वेन राजाचें वर्तन त्याच्या नाशाला कारणीभूत ठरलें.

भुकेच्या पोटीं क्रांति होते, हें एक कठोर सत्य आहे. 'क्रांति' या कथेंत तें स्पष्ट झालें आहे. अध्यात्मवादी म्हणविणाऱ्या भारतीय तत्त्वज्ञांनाहि तें नाकारतां आलेलें नाही. क्षुधेने पीडलेल्या प्रक्षुब्ध मनःस्थितींत महान् तपस्व्याचाहि विवेक नष्ट होतो, मग सामान्य जनाची काय कथा ! त्या अवस्थेंत 'हिंसा-अहिंसा, सत्य-असत्य, भक्ष्य-अभक्ष्य यांतील तारतम्य समजूं शकत नाहीं. प्राणरक्षण हाच धर्म आणि तेंच सत्य.' अशा प्रक्षुब्ध भावनांची परिणति कोणत्याहि विध्वंसक घटनेंत होऊं शकते.

अशा सामुदायिक भावनांचा प्रक्षोभ तर सामर्थ्यशाली सत्तेची सिंहासनेंहि उलथून पाडूं शकतो. कोणत्याहि राजकीय क्रांतीचा इतिहास हेंच सांगतो.

सर्वच कथांचा अन्वयार्थ सांगण्याची आवश्यकता नाही. वस्तुतः या कथा स्वतःच बोलक्या आहेत. त्यांचा अर्थ वाचकांना आपापल्या प्रकृति-धर्माप्रमाणे कदाचित निरनिराळाहि प्रतीत होऊं शकेल. मी केवळ अल्पसें दिग्दर्शन वर केलें आहे.

* * *

कथा निवेदन करणें हा शांतिपर्वाचा मुख्य हेतु नाही. राजकीय तत्त्वज्ञान अधिक स्पष्ट करण्यासाठी भीष्माचार्यांनी कथा-कथनाचा मार्ग स्वीकारला आहे. पण या कथांशिवाय विवेचनपर चर्चाहि विस्तृत आणि विविध स्वरूपाची केलेली आहे. या चर्चेत वैचारिक प्रगल्भता व्यक्त होते, तशीच राजकीय व सामाजिक दूरदृष्टीहि स्पष्ट होते. अर्थात् इतक्या उपयुक्त विवेचनांतहि विसंगतीचा आणि पुनरुक्तीचा दोष सांपडतो ही गोष्ट नाकारतां येत नाही. उदाहरणार्थ, राजसत्तेच्या उदयासंबंधीचा सिद्धान्त पहा : राजकीय तत्त्वज्ञानांत राजकीय सत्तेच्या उत्पत्तीची मीमांसा मूलभूत मानली जाते. राजकीय सत्ता कशी निर्माण झाली, कां झाली, केव्हां झाली व कोणत्या परिस्थितींत झाली, या प्रश्नांच्या चौथऱ्यावरच राजनीतीची इमारत उभारली जाते. पण शांतिपर्वांत या मूलभूत प्रश्नां-संबंधी अगदी परस्परविरोधी अशा दोन उपपत्ति मांडल्या आहेत. राजा देवतास्वरूप आहे हें जितकें आग्रहाने प्रतिपादन केलें आहे, तितकेंच, राजा व प्रजा यांनी एकमेकांना सहकार्याचें आश्वासन देऊन राजसत्ता निर्माण केली, असेंहि स्पष्टपणें म्हटलें आहे.

पहिली उपपत्ति एकदा मान्य केली म्हणजे साहजिकच, देवतास्वरूप राजाविरुद्ध बोलण्याचा प्रजेला कांहीहि अधिकार राहात नाही, हें उघड आहे. राजा कसाहि असो, त्याची आज्ञा पालन केलीच पाहिजे. त्याचे दोष, त्याने केलेले अन्याय निमूटपणे सहन करणें एवढेंच प्रजेच्या हातीं उरतें. पण करारसदृश असा जो दुसरा सिद्धान्त मांडला आहे, तो बुद्धिवादी स्वरूपाचा आहे. राजाला प्रजेचें सहकार्य मिळालें तरच तो

राज्य करू शकेल आणि प्रजेलाहि राजाकडून संरक्षणाची हमी मिळाली तरच ती राजाला सहकार्य करील, अशी या सिद्धान्तामागची भौतिकवादी भूमिका आहे. उपयुक्ततेच्या वास्तववादी कसोटीवर उतरणारा हा सिद्धान्त आहे. त्याच्या मुळाशीं शासक आणि शासित यांच्या परस्पर-संबंधाविषयी मूलभूत तत्त्व गृहीत धरलें आहे. या सिद्धान्ताचा स्वाभाविक परिपाक म्हणून जी उपाययोजना शांतिपर्वांत सुचविली आहे, तीहि लक्षांत घेण्यासारखी आहे. राजाने प्रजेला संरक्षणाचें आश्वासन दिलें खरें, पण त्याने तें मोडलें तर—! तर त्याला शासन करण्याचा, पदच्युत करण्याचा अधिकारहि प्रजेला मिळाला पाहिजे. 'जो राजा प्रजेचें पालन करीत नाही तो चोरच होय.' 'असा राजा वध करण्यास योग्य आहे.'

राजसत्तेचें एवढें भौतिकवादी स्वरूप प्राचीन राजकीय तत्त्वज्ञानांत क्वचितच प्रतिपादन केलेलें असेल. 'बुद्धि हें विजयाचें साधन आहे,' 'प्रजा हें राज्याचें मूळ आहे,' 'धर्मापेक्षा सामर्थ्य श्रेष्ठ' इत्यादि विचारहि वरील विधानाला पूरक ठरणारे आहेत. तसेच, राजकीय सत्तेची अपरिहार्यता, राष्ट्राचा कोष आणि राष्ट्राचें सामर्थ्य यांचें अभिन्नत्व, प्रजेपासून कर घेण्याचे हेतु आणि मार्ग, शेजारी राष्ट्राशीं वागण्याची नीति (आजच्या परिभाषेंत परराष्ट्रधोरण) इत्यादि विचारहि बुद्धिवादी निकषावर उतरणारे आहेत. कर्मकाण्ड आणि तत्सम धर्मकल्पनांत गुरफटलेल्या विचारांपेक्षा वरील विचार सर्वस्वीं भिन्न आहेत आणि अनेक ठिकाणी ते निःसंदिग्ध शब्दांत व्यक्त केले आहेत. भारतीय राज-नीतिविषयक ग्रंथांत शांतिपर्वाचें हें वैशिष्ट्य मानलें पाहिजे.

● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२३०८ वि: निबंध
क्रमांक १०१४६६ नों: दि: १४.८

REFBK-0013131

REFBK-0013131

# मराठवाडा साहित्य परिषदेचीं

## संग्राह्य प्रकाशनें

### कवितासंग्रह

| | |
|---|---|
| पुन्हा नभाच्या लाल कडा<br>बी. रघुनाथ | ३.०० |
| मेनका<br>यशवंत कानिटकर | १.५० |
| साद<br>राम पिंगळीकर | १.०० |
| गंधवेणा<br>गजमल माळी | १.५० |
| रावसाहेबांची कविता<br>कै. र. लु. जोशी | ४.०० |
| अपर्णा<br>शिवाजी गऊळकर | २.०० |

### कथा-संग्रह

| | |
|---|---|
| महाराणी व इतर कथा<br>दिवाकर कृष्ण केळकर | २.०० |
| तृणाची वेदना<br>तु. शं. कुळकर्णी | २.५० |
| 'सिनिक'च्या कथा<br>सिनिक | ३.५० |
| शांतिपर्वातील कथा<br>स. मा. गर्गे | ३.५० |